Registered No. B. 1.

# THE Bombay Government Gazette.

Published by Authority

THURSDAY, 17TH NOVEMBER 1898.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## मुंबई सरकार.

मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजाह् गव्हर्नरसाहेब यांनीं तारीख ११ माहे एप्रिल सन १८९८ रोजीं आणि बाली जनाब व्हाइसराय व गव्हर्नर जनरल यांनीं तारीख १३ माहे आगस्ट सन १८९८ रोजीं मंजूर केला, तो, सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९८ चा मुंबईचा आक्ट ४ था.

### सन १८९८ चा मुंबई शहर सुधारण्याबाबत आक्ट.

(ह्या आक्टास हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांनीं दिलेली मंजुरी मुंबईचे गव्हर्नर यांनीं तारीख ३० माहे आगष्ट सन १८९८ रोजीं प्रसिद्ध केली.)

अनुक्रमणिका.


| | कलम. | | कलम. |
|---|---|---|---|
| बाब १.—प्रारंभीचे ठराव. | | बाब २.—ट्रस्टींच्या बोर्डाविषयीं. बोर्डाची रचना. | |
| सरनामा, व्याप्ति व सुरुवात. ... ... | १ (१) | हा आक्ट अमलांत आणण्याचें काम बोर्डाकडे सोंपविलें आहे ... .. ... | ३ |
| हिंदुस्थानचा टेलिग्राफ आक्ट व हिंदुस्थानचा रेलवेबाबत आक्ट यांचे ठराव कायम ठेवणें. | " (२) | बोर्डाची रचना ... ... ... | ४ |
| | | निवडावयाचे ट्रस्टी, कार्पोरेशननें, चेंबर आफ् कामर्सनें, मुंबई बंदरच्या ट्रस्टींनीं आणि मिल-ओनर्स असोसिएशननें निवडणें ... | ५ |
| संज्ञांच्या व्याख्या ... ... ... | २ | | |

| | कलम. |
|---|---|
| **बाब २.—ट्रस्टींच्या बोर्डाविषयीं—(पुढें चालू).** | |
| **बोर्डाची रचना—(पुढें चालू).** | |
| निवडणुकीची रीत ... .... .. | ६ |
| निवडणुकीचा रिपोर्ट करणें ... ... | ७ |
| निवडणूक न केल्यास काय करावें. ... | ८ |
| नेमावयाचे ट्रस्टी व चेअरमन यांची नेमणूक. | ९ |
| पहिल्या ट्रस्टींच्या हुद्दयाची मुदत केव्हां सुरू होते ... ... ... ... | १० |
| ट्रस्टींची निवडणूक व नेमणूक ... ... | ११ |
| ट्रस्टींच्या हुद्दयाची मुदत. ... .. | १२ |
| प्रसंगोपात रिकाम्या झालेल्या जागा ... | १३ (१) |
| तीन महिन्यांहून जास्त मुदतीपर्यंत ... | ,, (२) |
| जरूर असेल तेव्हां आक्टिंग नेमणूक तीन महिन्यांहून कमी मुदतीसाठीं करण्याबाबत विशेष ठराव ... ... ... | ,, (३) |
| **ट्रस्टींची नालायकी.** | |
| नालायकीचीं कारणें.... ... ... | १४ (१) |
| विशेष ठराव ... ... ... | ,, (२) |
| ट्रस्टींची जागा ज्या कारणांवरून रिकामी होईल तीं कारणें ... ... ... | १५ (१) |
| ट्रस्टींचा ज्यांत हितसंबंध असेल त्या बाबतींत त्यांना मत देण्याचा अगर वाद करण्याचा अधिकार नाहीं ... ... ... | ,, (२) |
| चेअरमनाचा पगार सरकारानें ठरविणें ... | १६ |
| चेअरमन खेरीज करून इतर ट्रस्टींना ज्या फी मिळण्याचा हक्क आहे त्या. ... .. | १७ |
| साधारण सभेबद्दल ... ... ... | ,, |
| विशेष सभेबद्दल ... ... ... | ,, |
| कमिटीच्या विशेष सभेबद्दल ... ... | ,, |
| विशेष ठराव ... ... ... | , |
| **बोर्डानें चालवावयाचीं कामें.** | |
| बोर्डानें चालवावयाच्या कामांसंबंधी ठराव .. | १८ |

| | कलम. |
|---|---|
| **बाब २–ट्रस्टींच्या बोर्डाविषयीं–(पुढें चालू).** | |
| **बोर्डानें चालवावयाचीं कामें–(पुढें चालू)** | |
| जागा रिकामी झाल्याच्या कारणानें काम चालविण्यास व्यत्यय येत नाहीं. ... ... | १८ (१) |
| बोर्डानें एकत्र जमून आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणें काम करण्याबद्दल तजवीज करणें. | ,, (२) |
| दर महिन्यास एकदा साधारण सभा भरलीच पाहिजे, किंवा ... ... ... | १८(२)(अ) |
| जरूर असेल तेव्हां तेव्हां विशेष सभा भरणें. | ,, ,, (ब) |
| कोरम होण्यास आठ ट्रस्टी असले पाहिजेत... | ,, ,, (क) |
| चेअरमन हजर असल्यास प्रत्येक सभेंत त्यानें अध्यक्षस्थानीं बसणें... ... ... | ,, ,, (ड) |
| सर्व प्रकरणांचा निकाल बहुमतानें केला पाहिजे ... ... ... ... | ,, ,, (इ) |
| मतें मागण्याचा अधिकार आहे ... ... | ,, ,, (फ) |
| हकीकत लिहून ठेविली पाहिजे ... ... | ,, ,, (ग) |
| बोर्डास आपला अधिकार कमिट्यांकडे सोंपून देण्याचा अख्त्यार आहे ... ... | ,, (३) |
| प्रत्येक कमिटींत चेअरमन हा अध्यक्ष असणें... | ,, ,, |
| कमिट्यांनीं केव्हां सभा भरणें ... ... | ,, (४) |
| चेअरमन हजर असल्यास त्यानें कमिटीच्या प्रत्येक सभेंत अध्यक्षस्थानीं बसणें. | ,, (५) |
| कमिटीपुढील प्रकरणांचा निकाल बहुमतानें केला पाहिजेः कोरम दोन-तृतीयांश सभासदांचा असणें ... ... ... | ,, (६) |
| गैरशिस्तपणामुळें बोर्ड वगैरेचीं कृत्यें बेकायदेशीर होत नाहींत .. ... ... | ,, (७) |
| ज्यांची किंमत १,००० रुपयांहून जास्त नसेल असे करार करण्याची रीति. ... ... | १९ (१) |
| किंमत १,००० रुपयांहून जास्त असेल तेव्हां. | ,, (२) |
| सामायिक शिक्क्याची रखवाली व उपयोग करणें ... ... ... .. | ,, (३) |
| बोर्डाकडून किंवा बोर्डावर होणाऱ्या दाव्यांबाबत तोडजोड करण्याचा अधिकार .. | २० |
| **चेअरमन.** | |
| चेअरमनचीं कामें. ... ... ... | २१ |

| | कलम. |
|---|---|
| **बाब २.-ट्रस्टींच्या बोर्डाबावत-(पुढें चालू).** | |
| **चेअरमन—(पुढें चालू).** | |
| चेअरमनास गैरहजिरीची रजा ... ... | २२ (१) |
| रजेवर गैरहजर असतांना चेअरमनास मिळावयाची नेमणूक .. ... ... | ,, (२) |
| आक्टिंग चेअरमनची नेमणूक व पगार .. | ,, (३) |
| **बाब ३.—कामें व अधिकार.** | |
| **सुधारणेसंबंधी योजनापत्रकें.** | |
| एकाद्या मोहोल्याच्या किंवा जागेच्या रोगकारक स्थितीविषयीं हुद्याच्या नात्याच्या सूचनापत्रावरून खातरी झाली असतां बोर्डानें त्याच्या सुधारणेसाठीं योजनापत्रक तयार करणें ... ... ... ... | २३ |
| हुद्याच्या नात्याचें सूचनापत्र कमिशनरानें पाठविणें ... ... ... | २४ |
| सुधारणेसंबंधी योजनापत्रकांत कोणत्या बाबतींबद्दल तजवीज करणें ... ... | २५ |
| योजनापत्रक तयार करतांना कोणत्या गोष्टींकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे ... .. | २६ |
| योजनापत्रक पुरें झाल्यावर काय करावें ... | २७ (१) |
| त्या पत्रकाच्या जाहिरनाम्याची नकल कार्पोरेशनच्या अध्यक्षाकडे पाठविणें ... .. | ,, ,, (अ) |
| जाहिरनामा प्रसिद्ध करणें ... .. | ,, ,, (ब) |
| योजनापत्रक अमलांत आणतेवेळीं घ्यावयाच्या मिळकतीच्या मालकावर नोटिसा बजाविणें | ,, (२) |
| नोटिसा कशा बजाविणें ... ... | ,, (३) |
| बोर्डानें, नोटिसा प्रसिद्ध केल्यानंतर व बजाविल्यानंतर योजनापत्रक सरकाराकडे मंजुरीसाठीं पाठविणें ... ... .. | २८ (१) |
| मंजुरीबद्दलच्या अर्जीबरोबर असावयाचा तपशील... ... ... .. | ,, (२) |
| गरीब व कामकरी लोकांकरितां राहण्याचीं घरेंवगैरे बांधण्याबद्दल योजनापत्रकांत तजवीज केली असेल तेव्हां काय करावें .. | ,, (३) |

| | कलम. |
|---|---|
| **बाब ३.—कामें व अधिकार—(पुढें चालू).** | |
| **सुधारणेसंबंधी योजनापत्रकें—(पुढें चालू).** | |
| मंजुरी मिळाल्यावर, घ्यावयाच्या जमिनीचा तपशील देऊन ठराव प्रसिद्ध करणें, आणि तो ठराव प्रसिद्ध झाल्यावर बोर्डानें योजना अमलांत आणण्याच्या कामास लागणें ... ... ... ... | २९ (१) |
| बोर्डास योजनापत्रकाच्या कोणत्याही भागांत फेरफार करण्याचा अधिकार आहे ... | ,, (२) |
| **स्ट्रीटसंबंधी योजनापत्रकें.** | |
| बोर्डास स्ट्रीटसंबंधी योजनापत्रक तयार करण्याचा अधिकार आहे ... ... | ३० |
| स्ट्रीटसंबंधी योजनापत्रकांत कोणकोणत्या बाबतींबद्दल तजवीज करणें ... ... | ३१ |
| योजनापत्रक पुरें झाल्यावर काय करावें. | ३२ |
| **जमीन नवसाध्य करण्यासंबंधी योजनापत्रकें.** | |
| बोर्डास जमीन नवसाध्य करण्यासंबंधी योजनापत्रक तयार करण्याचा अधिकार आहे. | ३३ |
| जमीन नवसाध्य करण्यासंबंधी योजनापत्रकांत कोणकोणत्या बाबतींबद्दल तजवीज करणें. | ३४ |
| योजनापत्रक पुरें झाल्यावर काय करावें ... | ३५ |
| त्या पत्रकाच्या जाहिरनाम्याची नकल कार्पोरेशनच्या अध्यक्षाकडे पाठविणें... .. | ,, (१) |
| जाहिरनामा प्रसिद्ध करणें ... ... | ,, (२) |
| बोर्डानें, जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर, योजनापत्रक सरकाराकडे मंजुरीसाठीं पाठविणें. | ३६ |
| कलम ३३ किंवा ३४ याअन्वयें केलेला कोणताही हुकूम किंवा ठराव अमलांत आणल्या कारणानें झालेल्या तोट्याबद्दल सरकार जबाबदार नाहीं ... ... ... | ३७ |
| **पोलीसच्या राहण्याच्या सोईसंबंधी योजनापत्रकें.** | |
| बोर्डास पोलीसच्या राहण्याच्या सोईसंबंधी योजनापत्रक तयार करण्याचा अधिकार आहे | ३८ (१) |

| | कलम. |
|---|---|
| **भाग ३.—कामें व अधिकार—(पुढें चालू).** | |
| **पोलीसच्या राहण्याच्या सोईसंबंधी योजनापत्रकें—(पुढें चालू).** | |
| पोलीसच्या राहण्याच्या सोईसंबंधी योजनापत्रकांत कोणकोणत्या बाबतींबद्दल तजवीज करणें ... ... ... ... | ३८ (२) |
| योजनापत्रक पुरें झाल्यावर काय करावें ... | ३९ |
| इमारत पुरी होईल तेव्हां ती बोर्डानें पोलीसच्या कारणांकरितां साठ वर्षांच्या मुदतीनें सरकारास पट्ट्यानें देणें .. ... | ४० (१) |
| "इमारतीचा भांडवलासंबंधी खर्च" याची व्याख्या ... ... ... ... | ,, (२) |
| "जमिनीचा खर्च" याची व्याख्या .. | ,, (३) |
| पट्ट्याची मुदत संपल्यावर, इमारत व तिचें घरठाण पोलीसच्या कारणांकरितां कार्पोरेशनकडे जाणें ... ... ... | ,, (४) |
| **सामान्य.** | |
| कार्पोरेशनकडे असलेली व स्ट्रीट बनविण्याकरितां व त्यांत फेरफार करण्याकरितां बोर्डास जरूर असणारी जमीन तात्पुरती बोर्डाकडे जाणें ... ... ... ... | ४१ |
| सार्वजनिक व खानगी स्ट्रीटांच्या संबधानें म्युनिसिपल अधिकाऱ्यांस दिलेले कित्येक अधिकार बोर्डास त्याकडे असलेल्या जमिनीच्या संबंधानें चालवितां येतील .. | ४२ |
| बोर्डाकडे गेलेल्या जमिनींतील ग्यासच्या नळ्यांबाबत त्याचे अधिकार व जबाबदारी .. | ४३ |
| सन १८७४ चा मुंबईचा ट्रामवेंबाबत आक्ट यावरून म्युनिसिपल अधिकाऱ्यांस दिलेले कित्येक अधिकार बोर्डास त्याकडे आलेल्या जमिनीच्या संबंधानें चालवितां येतील ... | ४४ |
| नवीन स्ट्रीटांची कमींत कमी रुंदी ... | ४५ (१) |
| स्ट्रीटच्या एका किंवा दोन्ही बाजूंस बगीच्याच्या किंवा खुल्या जागा राखल्या असतील त्या प्रसंगीं विशेष ठराव ... ... | ,, ,, |
| स्ट्रीट पुरें झाल्यावर ते कार्पोरेशनकडे जाणें व त्यानें त्यांची डागडुजी ठेवणें ... ... | ,, (२) |
| **भाग ३.—कामें व अधिकार—(पुढें चालू).** | |
| **सामान्य—(पुढें चालू).** | |
| हवा खेळण्यासाठीं राखलेल्या खुल्या जागा कार्पोरेशनकडे जाणें व त्यानें त्यांची डागडुजी ठेवणें ... ... ... ... | ४५ (३) |
| या कलमाखालील तकरारींचा निकाल सरकारानें करणें ... ... .. | ,, (४) |
| **जमीन घेणें.** | |
| बोर्डास कबुलायतीनें जमीन घेण्याचा अधिकार आहे ... ... ... | ४६ |
| जमीन घेण्याविषयींचा आक्ट, कबुलायतीखेरीज इतर रीतीनें जमीन घेण्याच्या बाबतीस कोठपर्यंत लागू होईल ... ... | ४७ |
| कोर्टाचीं कामें करण्यासाठीं अपिलाची न्यायसभा स्थापणें ... ... ... | ४८ (१) |
| कायदा व काम चालविण्याची रीति यांबाबतच्या प्रश्नाचा निकाल अध्यक्षानें करणें . | ,, (२) |
| न्यायसभेची रचना .. ... ... | ,, (३) |
| अध्यक्ष पसंत करणें ... ... .. | ,, (४) |
| हुद्द्याची मुदत ... ... ... | ,, (५) |
| सभासदांस दूर करणें... ... ... | ,, (६) |
| रिकाम्या जागा भरणें... ... ... | ,, (७) |
| सभासदांचा मुशाहिरा... ... .. | ,, (८) |
| न्यायसभेचा खर्च बोर्डानें देणें ... ... | ,, (९) |
| न्यायसभेचा निकाल अमलांत आणणें ... | ,, (१०) |
| कित्येक बाबतींत न्यायसभेच्या निकालावर हैकोर्टास अपील ... .. ... | ,, (११) |
| सरकारच्या मंजुरीनें नेमणुका व कानू करण्याचा अध्यक्षाचा अधिकार ... .. | ,, (१२) |
| नुकसानीच्या मोबदल्याच्या संबंधानें विशेष ठराव ... ... ... ... | ४९ |
| कलेक्टरानें निवाडा दिल्यानंतर जमीन कबज्यांत घेणें व ती बोर्डाकडे तबदील करून देणें ... ... ... ... | ५० |

| | कलम. |
|---|---|
| **बाब ३.—कामें व अधिकार—(पुढें चालू).** | |
| **बोर्डापासून जमिनी परत घेणें.** | |
| कलम ६०, पोटकलम (७), याअन्वयें परत घेतलेल्या जमिनीची किंमत कलेक्टरानें ठरविणें ... ... ... ... | ९१ (१) |
| कलम ६१, पोटकलम (३), याअन्वयें कबज्यांत घेतलेल्या जमिनीची किंमत कलेक्टरानें ठरविणें ... ... ... | ,, (२) |
| न्यायसभेकडे अपील करण्याबद्दल ठराव. ... | ,, (३) |
| **बाब ४.—कर्ज काढण्याचे अधिकार.** | |
| सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांकडून किंवा इतर मनुष्यांकडून कर्ज काढण्याचा अधिकार ... ... | ९२ |
| इतर मनुष्यांकडून पैसा कोणत्या रीतीनें कर्जी काढावा तें सरकारानें फर्माविणें ... | ९३ |
| डिबेंचरांच्या द्वारें काढलेल्या लोनावरील व्याजाचा बोजा, सेक्रेटरी ऑफ् स्टेट किंवा कार्पोरेशन यांना येणें असलेल्या व्याजाच्या अगोदरचा समजणें... ... ... | ९४ |
| कर्जी काढलेला पैसा फेडण्यासाठीं सिंकिंग फंडाबद्दल तजवीज ... ... ... | ९५ |
| सिंकिंग फंड पब्लिक सिक्यूरिटींमध्यें व्याजीं लावण्यासाठीं ठरविलेल्या तारखा ... | ९६ |
| लोनांची मुदत कोठपर्यंत असावयाची तें ... | ९७ |
| सिक्यूरिटींचा नमुना ... ... .. | ९८ |
| सरकारानें मंजूर केलेल्या कोणत्याही लोनाच्या यत्तेपर्यंत व्यांकांकडून पैसा घेण्याचा व गहाण लावून देण्याचा बोर्डास अधिकार असणें ... ... ... ... | ९९ |
| **बाब ५.—मिळकत व जबाबदाऱ्या.** | |
| **बोर्डास मिळकत तबदील करून देणें.** | |
| बोर्डाकडे गेलेल्या जमिनीचा तपशील ... | ६० (१) |
| मैदानें ... ... ... ... | ,, (२) |
| केनेडी सी फेस ... ... ... | ,, (३) |
| कूपरेज प्लाट व सेक्रेटेरिएट प्लाट ... ... | ,, (४) |

| | कलम. |
|---|---|
| **बाब ५.—मिळकत व जबाबदाऱ्या—(पुढें चालू).** | |
| **बोर्डास मिळकत तबदील करून देणें—(पुढें चालू).** | |
| पोट-कलमें (२), (३) व (४) यांत सांगितलेल्या जमिनींची डागडुजी व व्यवस्था बोर्डानें ठेवणें ... ...... ... | ६० (५) |
| जमिनी बोर्डाकडे किती मुदतीपर्यंत राहतील तें ... ... ... ... | ,, (६) |
| एकंदर किती मुदतीपर्यंत अशा जमिनी पट्ट्यानें देण्याचा बोर्डास अधिकार आहे त्यासंबंधानें विशेष ठराव ... ... ... | ,, ,, |
| सार्वजनिक कारणासाठीं लागणाऱ्या जमिनी परत घेण्याचा सरकारचा व कार्पोरेशनचा अधिकार ... ... ... | ,, (७) |
| बोर्डाकडे गेलेल्या जमिनी नवसाध्य करण्याबाबद्च्या हक्कांचा तपशील ... ... | ६१ (१) |
| बोर्डानें जमीन नवसाध्य करण्याचें सुरू केलें नाहीं तर ठराव ... ... ... | ,, (२) |
| सार्वजनिक कारणासाठीं लागणाऱ्या कोणत्याही नवसाध्य केलेल्या जमिनीचा कबजा घेण्याचा सरकारचा अधिकार... ... | ,, (३) |
| बोर्डानें दिलेल्या पट्ट्यांची मुदत संपल्यावर मिळकत प्रसंगाप्रमाणें मलिका माआझमांकडे व कार्पोरेशनाकडे जाणें.... ... | ६२ |
| **मिळकतीसंबंधी सामान्य अधिकार.** | |
| बोर्डास मिळकत घेण्याचा व धारण करण्याचा अधिकार ... .. ... | ६३ |
| पट्ट्यानें देण्याचा अधिकार ... ... | ,, (१) |
| विकण्याचा अधिकार.... ... ... | ,, (२) |
| बोर्डाकडे गेलेल्या जमिनींच्या किंवा इमारतींच्या विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग ... | ६४ |
| बोर्डाकडे गेलेल्या कित्येक जमिनी या आक्टाखालील कोणत्याही योजनापत्रकाच्या कारणाकडे लावण्याचा अधिकार ... ... | ६५ |

| | कलम. |
|---|---|
| **बाब ५.—मिळकत व जबाबदाऱ्या—(पुढें चालू).** | |
| **मिळकतीसंबंधी सामान्य अधिकार—(पुढें चालू).** | |
| सदर्हूप्रमाणें कामीं लावलेल्या जमिनीच्या किंमतीची व्यवस्था ... ... ... | ६६ (१) |
| न्यायसभेकडे अपील करण्याविषयीं ठराव ... | ,, (२) |
| **जबाबदाऱ्या.** | |
| सेक्रेटरी आफ् स्टेट व कार्पोरेशन यांस बोर्डानें देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जाचा तपशील ... ... ... ... | ६७ |
| न्यायसभेकडे अपील करण्याविषयीं ठराव .. | ,, |
| बोर्डानें द्यावयाच्या व्याजाचा तपशील ... | ६८ |
| सेक्रेटरी आफ् स्टेट यांस देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जांत, सरकारास झालेले कांहीं खर्च व या आक्टासंबंधाचा प्रारंभींचा खर्च यांचा समावेश होणें ... ... | ६९ |
| बोर्डानें, नवसाध्य केलेल्या जागांपासून उत्पन्न होणाऱ्या भाड्याचा व नफ्याचा पहिल्या वीस वर्षांपर्यंत मोफत उपभोग घेणें आणि त्यानंतर बाजार-किंमतींतून नवसाध्य करण्याचा खर्च वजा करून तिच्या बाकी रकमेवर व्याज देणें ... ... .. | ७० |
| सदरील शेवटल्या कलमाच्या कारणांसाठीं "बाजार-किंमत" व "नवसाध्य करण्याचा खर्च" या संज्ञांच्या व्याख्या ... | ७१ |
| **बाब ६.—महसूल व खर्च.** | |
| **म्युनिसिपल फंडांतून द्यावयाची रकम.** | |
| कमिशनरानें बोर्डास एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस द्यावयाच्या पैशाची रकम ... | ७२ |
| ह्या कलमांत उपयोग केलेल्या संज्ञांच्या व्याख्या... ... .. ... | ७३ (१) |
| "मिळकतीवरील कर." | ,, ,, (अ) |
| "जागा." | ,, ,, (ब) |

| | कलम. |
|---|---|
| **बाब ६.—महसूल व खर्च—(पुढें चालू).** | |
| **म्युनिसिपल फंडांतून द्यावयाची रकम—(पुढें चालू).** | |
| "कर आकारावयाची किंमत वाढणें." | ७३ (१) (क) |
| "कर आकारावयाची किंमत कमी होणें" | ,, ,, (ड) |
| प्रसंगाप्रमाणें, कमिशनरानें बोर्डास किंवा बोर्डानें कमिशनरास द्यावयाच्या पैशाची रकम ठरविणें ... ... ... ... | ,, (२) |
| जमा व खर्च यांमधील तफावतीचा निकाल... | ,, (३) |
| **सरकारानें द्यावयाच्या रकमा.** | |
| सन १८९७ च्या आगष्ट महिन्यानंतर कित्येक जमिनींपासून उत्पन्न झालेला नफा सरकारानें बोर्डास देणें ... ... ... | ७४ |
| **हिशोबाचे विभाग.** | |
| व्यवस्थेचा खर्च कांहीं मुदतीपर्यंत भांडवलखातीं लिहिणें आणि तदनंतर भांडवल व महसूल यांच्या दरम्यान वांटून देणें ... | ७५ (१) |
| भांडवलाच्या हिशोबांत, दरेक योजनापत्रकाबद्दलचा आणि परिशिष्ट क व परिशिष्ट ड यांत सांगितलेल्या जमिनी सुधारण्याबद्दलचा व जमीन नवसाध्य करण्याबद्दलचा खर्च निरनिराळा दाखविणें ... ... | ,, (२) |
| बोर्डाकडे आलेला सर्व पैसा सामान्य हिशोबाच्या खातीं जमा करणें ... .. | ७६ |
| सामान्य हिशोबाच्या खातीं जमा केलेला पैसा खर्चाच्या कोणत्या बाबींकडे लाविला पाहिजे तें ... ... ... ... | ७७ (१) |
| सामान्य हिशोबाच्या खातीं जमा असलेल्या रकमा, भांडवलासंबंधी चालू खर्च भागविण्यासाठीं देण्याचा अधिकार ... ... | ,, (२) |
| सामान्य हिशोबांत, परिशिष्ट क व परिशिष्ट ड यांत सांगितलेल्या जमिनींसंबंधी व नवसाध्य केलेल्या जमिनींसंबंधी रकमा भिन्न भिन्न दाखविणें ... ... ... | ७८ |

| | कलम. |
|---|---|
| **बाब ६.—महसूल व खर्च—(पुढें चालू).** | |
| **शिलकांची व्यवस्था.** | |
| जमेकडील शिलकांचा विनियोग, भांडवलासंबंधाचा चालू खर्च भागविण्याच्या कामीं किंवा लोनांसंबंधाचें कर्ज कमी करण्याच्या कामीं करणें ... ... ... | ७९ (१) |
| खर्चाकडील शिलका भांडवलखातीं लिहिणें... | ,, (२) |
| दहाव्या वर्षानंतरच्या नफ्याच्या विभागाबाबद विशेष ठराव ... ... ... | ,, (३) |
| **जबाबदाऱ्या पुऱ्या करण्याबद्दल हमी.** | |
| बोर्डानें व्याज न दिल्यास किंवा सिंकिंग फंडाच्या रकमा व्याजीं न लाविल्यास काय करावें ... ... ... ... | ८० |
| सदरील शेवटल्या कलमांत सांगितल्याप्रमाणें कमिशनरानें पैसा न दिल्यास काय करावें. | ८१ |
| बोर्डानें द्यावयाच्या रकमा न दिल्यास बोर्डाचा महसूल जत करण्याचा सरकारास अधिकार आहे ... ... ... ... | ८२ |
| **वार्षिक अंदाज.** | |
| उत्पन्नाचा व खर्चाचा वार्षिक अंदाज चेअरमननें तयार करणें ... ... ... | ८३ |
| असे अंदाज बोर्डानें मंजूर करणें किंवा दुरुस्त करणें ... ... ... ... | ८४ |
| अंदाज मंजूरीसाठीं सरकारास सादर करणें ... | ८५ |
| बोर्डाच्या रचनेच्या तारखेनंतरचे पहिले अंदाज सादर करण्याविषयीं व त्यांची व्यवस्था करण्याविषयीं तात्पुरता ठराव ... ... | ८६ |
| जरूर असेल तेव्हां पुरवणीचे अंदाज तयार करून सादर करण्याचा अधिकार आहे ... | ८७ |
| भारी निकडीच्या प्रसंगांवांचून किंवा कोर्टाच्या हुकुमनाम्याचा उलगडा करण्याचा असल्यावांचून १००० रुपयांहून जास्त अशी कोणतीही रकम कोणत्या तरी अंदाजांत सामील केलेली असल्याशिवाय न खर्चणें... | ८८ |

| | कलम. |
|---|---|
| **बाब ६.—महसूल व खर्च (पुढें चालू).** | |
| **हिशोबांची रुजुवात.** | |
| हिशोब, सरकारी हिशोबतपासनिसांनीं दरसाल दोनदां रुजू घेणें व तपासणें ... .. | ८९ (१) |
| दस्तऐवज हजर करण्यास हुकुम करण्याचा हिशोबतपासनिसांस अधिकार आहे ... | ,, (२) |
| त्यांचा मुशाहिरा सरकारानें ठरविणें ... | ,, (३) |
| त्यांचा रिपोर्ट हिशोबांच्या तेरिजासहित सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध करणें ... ... | ,, ,, |
| **बाब ७.—बोर्डाचे अमलदार व नोकर यांविषयीं.** | |
| **कामगार लोक किती असावे त.** | |
| अमलदार व नोकर आणि त्यांचा पगार व नेमणुका यांची यादी बोर्डानें मंजूर करणें . | ९० |
| कांहीं वर्गाच्या लोकांस कित्येक कारणांव्यतिरिक्त अमलदार व नोकर न समजणें. ... | |
| बोर्डानें खालील गोष्टींबाबद नियम करणें:— | ९१ |
| रजा देण्याचें नियमन करण्याबाबत ... | ,, (१) |
| रजेबद्दलच्या नेमणुका देण्याविषयीं अधिकार देण्याबाबत ... ... ... | ,, (२) |
| आक्टिंग नेमणुकांची रकम ठरविण्याबाबत... | ,, (३) |
| नोकरीच्या मुदतीचें नियमन करण्याबाबत ... | ,, (४) |
| नेमणुका देण्याची शर्त ठरविण्याबाबत ... | ,, (५) |
| प्राव्हिडेंट फंडांत वर्गणी भरण्याविषयीं अधिकार देण्याबाबत ... ... ... | ,, (६) |
| जखमांबद्दलचीं पेन्शनें किंवा कंप्याशनेट अलौवन्सें द्यावयाच्या शर्ती ठरविण्याबाबत .. | ,, (७) |
| **नेमणूक करणें वगैरेचे अधिकार.** | |
| नेमणुका वगैरे कोणीं करणें ... ... | ९२ |
| कित्येक अमलदारांचा पगारवगैरेसंबंधाचे हुकुम सरकारच्या मंजुरीस पात्र करणें ... | ९३ (१) |
| "एंजिनियर" या शब्दाची व्याख्या ... | ,, (२) |

| | कलम. |
|---|---|
| **बाब ८.—पोटकायदे.** | |
| पोटकायदे करण्याचा बोर्डास अख्त्यार आहे. | ९४ |
| पोटकायदे पसंत व प्रसिद्ध करणें ... | ९५ |
| पोटकायद्यांच्या भंगाबद्दल शिक्षा ... ... | ९६ |
| पोटकायदे प्रदर्शित करणें ... ... | ९७ |
| **बाब ९.—शिक्षा.** | |
| बोर्डाशीं केलेल्या करारांमध्यें हितसंबंध असण्याबद्दल... ... ... ... | ९८ |
| कायद्याविरुद्ध कांहीं घेण्याबद्दल ... ... | ९९ |

| | कलम. |
|---|---|
| **बाब ९.—शिक्षा.—(पुढें चालू).** | |
| हिशोबतपासनिसापुढें हजर होण्यास वगैरे नाकारण्याबद्दल किंवा हयगय करण्याबद्दल. | १०० |
| या आक्टाविरुद्ध केलेल्या अपराधांचा इन्साफ हातीं घेण्याचा अधिकार ... .... | १०१ |
| **बाब १०.—किरकोळ.** | |
| कोणत्याही कारणासाठीं नेमिलेला दिवस रविवारीं किंवा सार्वजनिक सुटीच्या दिवशीं येईल तर त्याबद्दल ठराव ... ... | १०२ |
| अंतरें मोजण्याबाबद ... ... ... | १०३ |
| दाव्यांची मुदत ... ... ... | १०४ |


## परिशिष्टें.


अ.—या आक्टाअन्वयें जमिनी घेण्याच्या कामाचें नियमन करण्याबाबदचे सन १८९४ च्या जमीन घेण्याविषयींच्या आक्टाचे अंश.

ब.—डिबेंचराचा नमुना.

क.—ज्या जमिनी मलिका माआझमांची मिळकत असून बोर्डाकडे जातात त्या जमिनी दाखविणारें.

ड.—ज्या जमिनी कार्पोरेशनची मिळकत असून बोर्डाकडे गेल्या आहेत त्या दाखविणारें.

इ.—कोणत्या हद्दींच्या आंत समुद्राचा तळ नवसाध्य करण्याचा हक्क बोर्डाकडे जातो तें दाखविणारें.

फ.—सन १८९७ च्या सप्टेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेच्या व कलम १० अन्वयें जी तारीख जाहीर केली जाईल त्या तारखेच्या दर्म्यान सरकारानें पट्टयानें दिलेल्या क परिशिष्टांतील जमिनी दाखविणारें.

## सन १८९८ चा आक्ट ४ था.

### मुंबई शहर सुधारण्याबाबत आणि त्याच्या पुढील विस्तारासाठीं जागेची तजवीज करण्याबाबत आक्ट.

ज्याअर्थी मुंबई शहराची सुधारणा व त्याचा पुढील विस्तार ह्यांबद्दल, नवीन स्ट्रीट बनवून व विद्यमान स्ट्रीटांमध्यें फेरफार करून, कांहीं जागच्या, आरोग्यास अपायकारक असणाऱ्या इमारती काढून किंवा त्यांमध्यें फेरफार करून, हवा चांगल्या रीतीनें खेळण्यासाठीं व विहारासाठीं खुल्या जागा ठेवून, सदरहू शहरांतील कित्येक वर्गांच्या रहिवाशांसाठीं व शहर पोलिसासाठीं आरोग्यकारक अशीं नवीन राहण्याचीं घरेंवगैरे बांधून, रिकाम्या जमिनी आंखून देऊन, आणि मुंबई टापूच्या अग्रकिनाऱ्यांचे कांहीं भाग नवसाध्य करून व आंखून देऊन, तजवीज करणें योग्य आहे; आणि ज्याअर्थी वरील हेतु, यांत पुढें सांगितलेल्या रीतीनें आणि त्याप्रमाणें सांगितलेल्या यत्तांस व शर्तीस पात्र राहून, सिद्धीस नेण्यासाठीं एक ट्रस्टींचा बोर्ड स्थापून त्यास विशेष अधिकार देणें योग्य आहे ; आणि ज्याअर्थी कित्येक जमिनी व जमीन नवसाध्य करण्याचे हक्क यांत पुढें दिलेल्या रीतीनें बोर्डाकडे जावे असें योजिलें आहे, आणि ज्याअर्थी अशा शेवटीं सांगितलेल्या जमिनींचे प्लान मुंबईच्या कलेक्टराकडे ठेविलेले असून त्यांस यांत पुढें 'ठेविलेले प्लान' असें ह्मटलें आहे; त्याअर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:-

### बाब १.—प्रारंभींचे ठराव.

सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) या आक्टास "सन १८९८ चा मुंबई शहर सुधारण्याबाबत आक्ट" असें ह्मणावें;

(अ) तो फक्त मुंबई शहरास लागू आहे ;

(ब) तो ठरल्यावर ताबडतोब अमलांत येईल.

हिंदुस्थानचा टेलिग्राफ आक्ट व हिंदुस्थानचा रेलवेबाबत आक्ट याचे ठराव कायम ठेवणें.

(२) या आक्टांतील कोणत्याही ठरावावरून, सन १८८५ चा हिंदुस्थानचा टेलिग्राफ आक्ट, किंवा सन १८९० चा हिंदुस्थानचा रेलवेबाबत आक्ट याच्या ठरावांस व्यत्यय येतो असें समजूं नये.

संज्ञांच्या व्याख्या.

२. विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर, या आक्टांतील शब्दांचा अर्थ, वेळोवेळीं सुधारलेला सन १८८८ चा मुंबई शहर म्युनिसिपालिटीबाबत आक्ट, ज्यास यांत पुढें "म्युनिसिपल आक्ट" असें ह्मटलें आहे, त्यांत त्या शब्दांचा जो अर्थ * केला आहे तोच आहे असें समजावें:

---

* सदहू म्युनिसिपल आक्टांतील व्याख्या येणेंप्रमाणें :—

(अ) "शहर" ह्मणजे मुंबई शहर असें समजावें:

(ब) "कार्पोरेशन" ह्मणजे मुंबई शहराचें म्युनिसिपल कार्पोरेशन असें समजावें :

(क) "कौन्सिलर" ह्मणजे ह्या आक्टाअन्वयें योग्य रीतीनें निवडलेला किंवा नेमलेला कार्पोरेशनचा सभासद असें समजावें :

(ड) "कमिशनर" ह्मणजे ५४ व्या कलमाअन्वयें नेमिलेला मुंबई शहराचा म्युनिसिपल कमिशनर असें समजावें, आणि त्यांत कलम ५९ चें पोटकलम (३) याअन्वयें नेमिलेल्या अॅक्टिंग कमिशनराचा समावेश होतो:

"स्ट्रीट." मात्र असें ठरविण्यांत येतें कीं "स्ट्रीट" या शब्दाच्या व्याख्येंत "ज्यावरून ............असा" हे, आणि "आणि जेव्हां..............असें समजावें" हे शब्द गाळावे.

"पब्लिक सिक्युरिटी." आणखी असेंही ठरविण्यांत येतें कीं "पब्लिक सिक्यूरिटी" या संज्ञेंत, या आक्टा-अन्वयें काढलेल्या सिक्युरिटींचा समावेश होतो.

---

(इ) "डेप्युटी कामिशनर" ह्मणजे ६९ व्या कलमाअन्वयें नेमिलेला डेप्युटी म्युनिसिपल कामिशनर असें समजावें, आणि त्यांत कलम ६९ चें पोट-कलम (३) याअन्वयें नेमिलेल्या अक्टिंग डेप्युटी कामिशनराचा समावेश होतोः

(फ) "पोलीस कमिशनर" ह्मणजे मुंबईचा पोलीस कमिशनर असें समजावें :

(ग) "जास्टिस" ह्मणजे, सन १८६९ चा जास्टिस आफ् थि पीस बाबत आक्ट, किंवा त्याबाबत त्या त्या वेळीं अमलांत असणारा इतर कोणताही कायदा याच्या ठरावांअन्वयें मुंबई शहराकरितां नेमिलेला जस्टिस आफ् थि पीस, असें समजावें:

(ह) "फेलो" ह्मणजे मुंबईच्या युनिव्हर्सिटीचा फेलो असें समजावें:

(ज) "जास्टिसांची निवडणूक" आणि "फेलोंची निवडणूक" ह्मणजे अनुक्रमें, जास्टिसांनीं किंवा फेलोंनीं कौन्सिलरची करावयाची निवडणूक, असें समजावें :

(के) "परवानेवाला प्लंबर" आणि "परवानेवाला सर्व्हेयर" ह्मणजे अनुक्रमें, प्लंबर किंवा सर्व्हेयर ह्मणून या आक्टाच्या कारणांसाठीं कमिशनरनें ३९९ व्या कलमाअन्वयें परवाना दिलेला मनुष्य, असें समजावें:

(ल) "स्मॉल कॉज कोर्ट" ह्मणजे मुंबईचें स्मॉल कॉज कोर्ट असें समजावें:

(म) "मालक" या शब्दाचा उपयोग कोणत्याही जागेच्या संबंधानें केला असेल तेव्हां त्याचा अर्थ, त्या जागेचें भाडें जो घेतो, किंवा ती जागा भाड्यानें दिली असतां तिचें भाडें घेण्याचा हक्क ज्यास प्राप्त होईल, तो मनुष्य असें समजावें, आणि त्यांत—

(१) त्या मालकाबद्दल असें भाडें जो एजंट किंवा ट्रस्टी घेतो त्याचा, आणि

(२) धर्मसंबंधी किंवा धर्मादायसंबंधी कारणांकडे लावलेल्या कोणत्याही जागेचें भाडें जो घेतो, किंवा ज्याकडे अशा जागेचा जिम्मा आहे, किंवा जो तिची काळजी बाळगतो त्या एजंटाचा किंवा ट्रस्टीचा, आणि

(३) सदरहू जागेचा ताबा घेण्यासाठीं किंवा तिच्या मालकाचे हक्क चालविण्यासाठीं योग्य अधिकाराच्या कोणत्याही कोर्टानें नेमलेला रिसीव्हर, जतीदार किंवा व्यवस्थापक याचा,

समावेश होतोः

(न) ज्या कोणत्याही राहण्याच्या घरवगैरेचा किंवा त्याच्या कोणत्या तरी भागाचा कोणी मनुष्य निजण्याच्या जागेदाखल, कदाचित हमेशा नाहीं तरी पण केव्हां केव्हां, उपयोग करितो, त्या घरांत तो मनुष्य "राहातो" असें समजावें :

त्याचप्रमाणें असेंही ठरविण्यांत येतें कीं या आक्टाच्या ३ ऱ्या बावींतील आणि कलमें ६०,६१ व ६२ यांतील ठरावाचा अर्थ करते वेळीं, "जमीन" या शब्दाचा अर्थ, विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर, ह्या आक्टाचें कलम ४७, पोटकलम (१), यांत त्या शब्दाचा जो अर्थ केला आहे तोच आहे असें समजावें. "जमीन."

---

आणि अशा कोणत्याही घरवगैरेंत कोणी मनुष्य गैरहजर आहे किंवा त्याचें दुसऱ्या ठिकाणीं दुसरें राहाण्याचें घरवगैरे असून तो त्यांत राहात आहे एवढ्याच फक्त कारणानें तो, त्या घरांत कोणत्याही वेळीं परत येण्याची त्याला मोकळीक असल्यास व त्यांत परत येण्याचा आपला इरादा त्यानें सोडून दिलेला नसल्यास, त्यांत "राहण्याचा" बंद झाला आहे असें समजूं नये:

(ओ) "पब्लिक सिक्युरिटी" या संज्ञेचा अर्थ, हिंदुस्थान सरकारच्या सिक्युरिटी व सरकारानें हमी दिलेल्या कोणत्याही सिक्युरिटी, मुंबईच्या पोर्ट ट्रस्टच्या सिक्युरिटी, ह्या आक्टाअन्वयें काढलेल्या सिक्युरिटी आणि आजपर्यंत काढलेले मुंबई म्युनिसिपालिटीचे कोणतेही डिबेंचर किंवा दुसऱ्या सिक्युरिटी, असा समजावा:

(प) "कर" यांत ह्या आक्टाअन्वयें घ्यावयाच्या कोणत्याही दस्ताचा समावेश होतो:

(फ) "वाहन" यांत, गाडी, खटारा, व व्हान, ड्रे व ट्रक, या नांवाच्या गाड्या, हातगाडी आणि शहराच्या स्ट्रीटांवर उपयोग करतां येण्याजोग्या, कोणत्याही प्रकारच्या चाकांच्या वाहनाचा समावेश होतो:

(र) "जमीन" यांत, जीवर कांहीं बांधलेलें आहे किंवा जी पाण्यानें आच्छादिलेली आहे, त्या जमिनीचा समावेश होतो:

(स) "इमारत" यांत, घर, उपघर, तबेला, छपरें, झोंपडी व असा दरेक दुसरा इमला, यांचा समावेश होतो, मग तीं दगडी, विटांचीं, लांकडी, मातीचीं किंवा धातूचीं असोत, किंवा दुसऱ्या कोणत्याही पदार्थांचीं असोत:

(ट) "पाणकाम" यांत, पाण्याचा पुरवठा करणाऱ्या किंवा पाण्याचा पुरवठा करण्यासाठीं उपयोग केलेल्या सरोवराचा, प्रवाहाचा, झऱ्याचा, विहिरीचा, बंबाचा, पाण्याच्या सांठ्याचा, टांकीचा, तळ्याचा, पाटाचा, मग तो आच्छादलेला असो अगर खुला असो, सांडव्याचा, मोठ्या नळाचा, कमानीच्या पाटाचा, एन्जिनचा व कोणत्याही यंत्रसामग्रीचा, जमिनीचा, इमारतीचा किंवा वस्तूचा समावेश होतो:

(यू) "मोरी" यांत, गटर, नळ, चर, पाट, आणि घाण, मलमूत्र, खराब पाणी किंवा पावसाचें पाणी किंवा जमिनीच्या सपाटीखालील पाणी काढून देण्याकरितां केलेली इतर कोणतीही योजना यांचा समावेश होतो:

(व्ह) "घराची शेरी" याचा अर्थ, मोरीदाखल कामीं पडण्यासाठीं किंवा संडास, मुत्री, टांकी किंवा वाणेरडा अगर खराब पदार्थ सांचवण्याकरितां केलेली इतर योजना यांकडे म्युनिसिपालिटीच्या नोकरांना किंवा तीं साफ करण्याच्या किंवा त्यांतून असा पदार्थ काढून नेण्याच्या कामीं लावलेल्या मनुष्यांना जाण्यायेण्यासाठीं बांधलेली, निराळी ठेविलेली किंवा वापरण्यांत येत असलेली वाट किंवा जमिनीची पट्टी, असा समजावा:

## बाब २.—ट्रस्टींच्या बोर्डाविषयीं.

### बोर्डाची रचना.

हा आक्ट अमलांत आणण्याचें काम बोर्डाकडे सोंपविलें आहे.

३. या आक्टाचे ठराव अमलांत आणण्याचें काम, यांत पुढें दिलेल्या शर्तींस व मर्यादांस पात्र राहून, एका बोर्डाकडे राहील. या बोर्डास "मुंबई शहर सुधारण्यासाठीं ट्रस्टी" असें ह्मणावें, व त्यास या आक्टांत पुढें "बोर्ड" असें ह्मटलें आहे. हा बोर्ड एक एकव्यक्तिभूत मंडळी असून त्याची परंपरा अखंड चालेल. त्याचा एक सामाईक शिक्का असला पाहिजे, आणि त्यानें व त्यावर दावा सदरील पहिल्या नांवानें केला पाहिजे.

---

(व) "स्ट्रीट" या शब्दांत, ज्यावरून किंवा ज्यांतून किंवा ज्यावर लोकांला जाण्यायेण्याचा हक्क आहे किंवा लोक वीस वर्षांच्या मुदतीपर्यंत बिनहरकत गेलेआले आहेत, असा कोणताही राजमार्ग, आणि कोणताही बांधावरील रस्ता, पूल, कमान, सडक, गल्ली, पायवाट, चौक, अंगण, आळी किंवा वाट यांचा समावेश होतो, मग त्यांवरून किंवा त्यांतून राहदारी असो किंवा नसो; आणि जेव्हां कोणत्याही स्ट्रीटमध्यें पायवाट व गाडीरस्ता अशीं दोन्ही असतील, तेव्हां, सदरहू संज्ञेंत त्या दोन्हींचा समावेश होतो असें समजावें:

(क्ष) "सार्वजनिक स्ट्रीट" याचा अर्थ, जो कोणताही स्ट्रीट कार्पोरेशननें आजपर्यंत सपाट केलेला असेल, किंवा ज्याला फरसबंदी केलेली असेल किंवा खडी घातलेली असेल, पाट केलेले असतील, गटर केलेले असतील किंवा दुरुस्ती केलेली असेल, तो स्ट्रीट, आणि ह्या आक्टाच्या कोणत्याही ठरावांअन्वयें जो कोणताही स्ट्रीट सार्वजनिक स्ट्रीट होईल तो स्ट्रीट, असा समजावा:

(य) "खासगी स्ट्रीट" ह्मणजे, जो स्ट्रीट सार्वजनिक नव्हे तो स्ट्रीट असें समजावें:

(ज्ञ) "पीडा" यांत, जेणेंकरून चक्षुरिंद्रियास, घ्राणेंद्रियास किंवा कर्णेंद्रियास इजा, धोका, त्रास किंवा उपद्रव होतो किंवा होण्यासारखा आहे, किंवा जें जीवास भयकारक किंवा प्रकृतीस किंवा मिळकतीस अपायकारक आहे किंवा होण्यासारखें आहे, अशा कोणत्याही कृत्याचा, वर्जनाचा, जागेचा किंवा वस्तूचा समावेश होतो:

(अ अ) "भयंकर रोग" याचा अर्थ, पटकी, आणि ज्याच्या योगें मनुष्याच्या जीवास धोका आहे असा कोणताही स्थलविशिष्ट, सांतीचा, किंवा सांक्रामिक रोग, असा समजावा:

(ब ब) "सरकारी साल" ह्मणजे एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस सुरू होणारें साल असें समजावें:

(क क) "सरकारी सुटीचा दिवस" याचा अर्थ, मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध झालेल्या सरकारच्या हुकुमावरून ज्या दिवशीं किंवा ज्या इतर मुदतींत शहरांतील सरकारी कचेऱ्या बंद करण्यांत येतात, तो दिवस किंवा ती मुदत असा समजावा:

(ड ड) "पोटकलम" व "रकम" ह्मणजे ज्या कलमांत तो शब्द येईल त्याचें पोटकलम किंवा रकम असें अनुक्रमें समजावें.

४. बोर्डांत चौदा सभासद असले पाहिजेत, ह्मणजे, तीन हुद्द्यापरत्वें असणारे ट्रस्टी, सात निवडलेले ट्रस्टी, तीन नेमलेले ट्रस्टी, आणि एक चेअरमन. हा चेअरमनही एक ट्रस्टीच आहे असें समजावें. बोर्डाची रचना.

हुद्द्यापरत्वें असणारे ट्रस्टी खालीं सांगितल्याप्रमाणें होत :—

(१) मुंबई डिस्ट्रिक्टची कमाण्ड असणारा जनरल आफिसर किंवा इतर लष्करी अमलदार,

(२) कलेक्टर, आणि

(३) कमिशनर.

५. निवडावयाच्या ट्रस्टींपैकीं, कार्पोरेशननें चार, मुंबई चेंबर ऑफ् कामर्स (हिला या आक्टांत पुढें चेंबर असें ह्मटलें आहे) हिनें एक, मुंबई बंदरचे ट्रस्टी (यांना या आक्टांत पुढें बंदरचे ट्रस्टी असें ह्मटलें आहे) यांनीं एक, आणि मुंबई मिल-ओनर्स असोसिएशन (हिला या आक्टांत पुढें मिल-ओनर्स असोसिएशन असें ह्मटलें आहे) हिनें एक, असे आपापल्या मंडळींतून निवडले पाहिजेत, आणि याप्रमाणें निवडलेला कोणताही ट्रस्टी पुनः निवडला जाण्यास लायक आहे असें समजावें. निवडावयाचे ट्रस्टी, कार्पोरेशननें, चेंबर आफ् कामर्सनें, मुंबई बंदरच्या ट्रस्टींनीं आणि मिल-ओनर्स असोसिएशननें निवडणें.

६. ट्रस्टींची निवडणूक— निवडणुकीची रीत.

(१) कार्पोरेशनकडून, बंदरच्या ट्रस्टींकडून आणि मिल-ओनर्स असोसिएशनकडून होणें ती, त्या त्या मंडळ्या जे नियम करतील त्यांस अनुसरून झाली पाहिजे, मात्र कार्पोरेशनकडून व्हावयाची निवडणूक उघडपणें मतें देऊन झाली पाहिजे ;

(२) चेंबरकडून होणें ती, बंदरच्या ट्रस्टींच्या निवडणुकीसाठीं चेंबरच्या कानूंत व नियमांत ठरविलेल्या रीतीनें झाली पाहिजे.

७. कोणत्याही ट्रस्टीची किंवा ट्रस्टींची निवडणूक झाल्यावर, प्रसंगाप्रमाणें, कार्पोरेशनच्या अध्यक्षानें, किंवा चेंबरच्या सेक्रेटरीनें, किंवा बंदरच्या ट्रस्टींच्या सेक्रेटरीनें, किंवा मिल-ओनर्स असोसिएशनच्या सेक्रेटरीनें, तावडतोब, सदरीं सांगितल्याप्रमाणें निवडलेल्या मनुष्याच्या नांवाचा किंवा मनुष्यांच्या नांवांचा रिपोर्ट सरकाराकडे पाठविला पाहिजे, आणि तो रिपोर्ट मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केला पाहिजे. निवडणुकीचा रिपोर्ट करणें.

८. निवडणुकीसाठीं या आक्टांत खालीं ठरविलेल्या मुदतीच्याआंत सदरील ठरावांअन्वयें कोणताही ट्रस्टी कार्पोरेशननें किंवा चेंबरनें किंवा बंदरच्या ट्रस्टींनीं किंवा मिल-ओनर्स असोसिएशननें न निवडला असतां, याप्रमाणें न निवडणाऱ्या मंडळींतील एकाद्या मनुष्यास, मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, नेमण्याचा सरकारास अधिकार आहे, आणि याप्रमाणें नेमलेला मनुष्य, प्रसंगाप्रमाणें, कार्पोरेशननें किंवा चेंबरनें किंवा बंदरच्या ट्रस्टींनीं किंवा मिल-ओनर्स असोसिएशननें योग्य रीतीनें निवडलेला एक ट्रस्टी आहे असें मानलें पाहिजे. निवडणूक न केल्यास काय करावें.

९. नेमावयाचे ट्रस्टी व चेअरमन यांना सरकारानें, मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, नेमलें पाहिजे. नेमावयाचे ट्रस्टी व चेअरमन यांची नेमणूक.

१०. पहिल्यानें नेमलेल्या व निवडलेल्या ट्रस्टींच्या हुद्द्याची मुदत, हा आक्ट अमलांत आल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्याआंतील नव्हे अशी जी तारीख सरकार या संबंधानें जाहीर करील त्या तारखेरोजीं सुरू होईल. पहिल्या ट्रस्टींच्या हुद्द्याची मुदत केव्हां सुरू होते.

११. १० व्या कलमाअन्वयें जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत आल्यावर, कार्पोरेशन, चेंबर, बंदरचे ट्रस्टी आणि मिल-ओनर्स असोसिएशन यांनीं, यांत पूर्वी ठरविल्या- ट्रस्टींची निवडणूक व नेमणूक.

प्रमाणें, आपापले ट्रस्टी निवडले पाहिजेत. पहिल्यानें निवडावयाचे ट्रस्टी, सदरहू कलमा-अन्वयें जाहीर करण्यांत येईल त्या तारखेच्या पूर्वी, निदान एक पंधरवडा अगोदर कोणत्या तरी दिवशीं निवडले पाहिजेत, आणि पहिल्यानें नेमावयाचे ट्रस्टी, सदरहू पंधरवड्यांतील कोणत्या तरी दिवशीं नेमले पाहिजेत; इतर प्रत्येक प्रसंगीं निवडावयाचे ट्रस्टी, ज्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेपासून त्यांच्या हुद्द्याची मुदत सुरू व्हावयाची त्या तारखेच्या लगत पूर्वीच्या मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेच्या अगोदरचा नव्हे व पंधराव्या तारखेच्या पुढचा नव्हे अशा कोणत्या तरी दिवशीं निवडले पाहिजेत; आणि नेमावयाचे ट्रस्टी, सदरहू मार्च महिन्याच्या बाकी राहिलेल्या मुदतींत कोणत्या तरी दिवशीं नेमले पाहिजेत.

ट्रस्टींच्या हुद्द्याची मुदत.

१२. (१) चेअरमन, तीन वर्षांहून कमी नाहीं अशा मुदतीकरितां सरकाराकडून वेळोवेळीं नेमण्यांत येईल :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं त्याच्या हुद्द्याला तो नालायक झाला आहे, किंवा त्याला हुद्द्यावरून दूर करणें इष्ट होईल अशा प्रकारची कोणतीही गैरवर्तणूक किंवा हयगई केल्याबद्दल तो अपराधी आहे, असें सरकारास दिसेल तर, त्यास कोणत्याही वेळीं हुद्द्यावरून दूर करण्याचा सरकारास अधिकार आहे.

(२) पहिल्यानें नेमलेले ट्रस्टी, व पहिल्यानें निवडलेल्या ट्रस्टींपैकीं ज्या चार ट्रस्टींची निवडणूक चेअरमन ठरवील त्या वेळीं व त्या रीतीनें चिठ्या काढून केली पाहिजे ते, सन १९०१ च्या मार्च महिन्याची ३१ वी तारीख पुरी होई तोंपर्यंत, हुद्द्यावर राहातील.

(३) पहिल्यानें निवडलेल्या ट्रस्टींपैकीं बाकी राहिलेले तीन ट्रस्टी, सन १९०० च्या मार्च महिन्याची ३१ वी तारीख पुरी होई तोंपर्यंत हुद्द्यावर राहातील.

इतर प्रत्येक प्रसंगीं, नेमलेले व निवडलेले ट्रस्टी दोन वर्षांच्या मुदतीपर्यंत हुद्द्यावर राहातील.

प्रसंगोपात रिकाम्या झालेल्या जागा.

१३. (१) चेअरमन शिवायकरून दुसऱ्या कोणा ट्रस्टीच्या हुद्द्याची जागा, अशा ट्रस्टीच्या मरणामुळें, त्यानें राजीनामा दिल्यामुळें किंवा त्याच्या नालायकीमुळें, प्रसंगोपात रिकामी होईल ती, ती नेमलेल्या ट्रस्टीची असल्यास सरकारानें, किंवा ती निवडलेल्या ट्रस्टीची असल्यास प्रसंगाप्रमाणें, कार्पोरेशननें किंवा चेंबरनें किंवा बंदरच्या ट्रस्टींनीं किंवा मिल-ओनर्स असोसिएशननें, ट्रस्टींच्या अव्वल नेमणुकांच्या व निवडणुकांच्या बाबतींत जी रीत व जे ठराव लागू आहेत त्याच रीतीनें, आणि सबेल तेथवर त्याच ठरावांस पात्र राहून, एका महिन्याच्याआंत भरली पाहिजे: मात्र ती जागा, याप्रमाणें ती रिकामी झाली नसती तर तिजवरील ट्रस्टी त्या हुद्द्यावर जेवढा वेळपर्यंत राहता तेवढाच वेळपर्यंत, याप्रमाणें पसंत केलेल्या ट्रस्टीकडे राहील.

तीन महिन्यांहून जास्त मुदतीपर्यंत.

(२) जर चेअरमन खेरीज करून दुसरा एकादा ट्रस्टी,—

(अ) तीन महिन्यांहून जास्त मुदतीपर्यंत गैरहजर राहण्याचा इरादा कळवून मुंबईतून निघून जाईल; किंवा

(ब) तीन महिन्यांहून जास्त मुदतीपर्यंत बोर्डाच्या सभांमध्यें हजर असण्यास कोणत्याही कारणामुळें असमर्थ होईल; किंवा

(क) तीन महिन्यांहून जास्त मुदतीपर्यंत मुंबईत गैरहजर असेल;

तर अशा ट्रस्टी गैरहजर किंवा असमर्थ असल्याच्या मुदतींत, किंवा ट्रस्टी असण्याचा तो बंद होई तोंपर्यंत, त्याच्याबद्दल काम करण्यासाठीं कोणा मनुष्यास निवडलें किंवा नेमलें पाहिजे, आणि याप्रमाणें काम करणारा मनुष्य हा या आक्टाच्या सर्व कारणांसाठीं एक ट्रस्टी आहे असें मानलें पाहिजे.

(३) एकाद्या गैरहजर असलेल्या ट्रस्टीच्या जागीं, तो ट्रस्टी नेमलेला ट्रस्टी असेल तर, सरकारच्या नजरेस आलें असतां, आणि तो निवडलेला ट्रस्टी असेल तर, संबंध असलेल्या निवडणूक करणाऱ्या मंडळीस केलेल्या बोर्डाच्या अर्जावरून, कोणी मनुष्य तीन महिन्यांहून कमी मुदतीसाठीं नेमला जाण्यास किंवा निवडला जाण्यास सदरील शेवटच्या पोट-कलमांतील कोणत्याही ठरावावरून हरकत येते असें समजूं नये. गरज असेल तेव्हां आक्टिंग नेमणूक तीन महिन्यांहून कमी मुदतीसाठीं करण्याबाबत विशेष ठराव.

## ट्रस्टींची नालायकी.

१४. (१) कोणताहि मनुष्य, कीं— नालायकीचीं कारणें.

(अ) जो दाखला नसणारा दिवाळें निघालेला किंवा नादार असेल, किंवा

(ब) ज्यास, साहा महिन्यांहून जास्त मुदतीपर्यंत कैदेची शिक्षा होण्याजोग्या एकाद्या अपराधाबद्दल कैदेची शिक्षा झाली असून किंवा काळ्या पाण्याची शिक्षा झाली असून ती शिक्षा मागाहून फिरविली किंवा रद्द झाली नसेल, किंवा

(क) जो बोर्डाच्या ताब्यांतील कोणताही हुद्दा किंवा फायद्याची जागा धारण करीत असेल, किंवा

(ड) ज्याचा, बोर्डाशीं, बोर्डानें किंवा बोर्डाच्यावतीनें केलेल्या कोणत्याही करारांत किंवा सोंपलेल्या कोणत्याही कामांत स्वतःचा किंवा स्वतःच्या भागीदाराचा कोणताही भाग किंवा हितसंबंध प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें असेल,

तो मनुष्य ट्रस्टी होण्यास नालायक होईल.

(२) परंतु, चेअरमन शिवाय करून दुसऱ्या कोणा मनुष्याचा— विशेष ठराव

(इ) स्थावर मिळकतीचा कोणताहि पट्टा, विक्री, अदलाबदल किंवा खरेदी यांत, अगर त्याबद्दलच्या कोणत्याही कबुलायतींत, किंवा

(फ) पैसा कर्जी काढण्याबद्दलची कोणतीही कबुलायत, अगर फक्त पैसा देण्याबद्दलचें कोणतेंही तारण यांत, किंवा

(ग) बोर्डाच्या कामकाजासंबंधी कोणतीही जाहिरात ज्या कोणत्याही वर्तमानपत्रांत दाखल करण्यांत आली असेल त्यांत, किंवा

(ह) जी कोणतीही जॉइंट-स्टॉक कंपनी बोर्डाशीं करार करील अगर बोर्डाकडून अथवा बोर्डाच्यावतीनें कामावर लावण्यांत येईल त्या जॉइंट-स्टॉक कंपनींत, किंवा

(आय) ज्या कोणत्याही मालाचा तो व्यापार करीत असेल त्याच्या, कोणत्याही एका सरकारी सालांत दोन हजार रुपयांहून जास्त नाहीं इतक्या किंमतीपर्यंत, बोर्डास कधीं कधीं केलेल्या विक्रींत,

भाग किंवा हितसंबंध आहे एवढ्याच केवळ कारणानें तो मनुष्य सदरहूप्रमाणें नालायक होणार नाहीं, किंवा त्याचा रकम (ड) मध्यें सांगितल्याप्रकारच्या करारांत किंवा कामांत कोणताही भाग अथवा हितसंबंध आहे असें मानूं नये.

१५. (१) जो कोणताही ट्रस्टी— ट्रस्टींची जागा ज्या कारणांवरून रिकामी होईल तीं कारणें.

(अ) सदरील शेवटल्या कलमांत सांगितलेल्या कारणांपैकीं कोणत्याही कारणामुळें नालायक होईल, किंवा

(ब) लागोपाठ बारा महिन्यांहून जास्त मुदतीपर्यंत बोर्डाच्या सभांमध्यें गैरहजर असेल किंवा हजर असण्यास असमर्थ असेल, अगर बोर्डाच्या

[ ]

परवानगीवांचून बोर्डाच्या लागोपाठ साहा साधारण सभांमध्यें गैरहजर असेल, किंवा

(क) लगत खालच्या पोट-कलमांतील ठरावांच्याविरुद्ध वागेल, किंवा

(ड) निवडलेला ट्रस्टी असून, प्रसंगाप्रमाणें, कौन्सिलर असण्याचा अथवा चेंबरचा सभासद असण्याचा अथवा बंदरचा ट्रस्टी असण्याचा अथवा मिल-ओनर्स असोसिएशनचा सभासद असण्याचा बंद होईल,

तो, ट्रस्टी असण्याचा बंद होईल आणि मग त्याची जागा रिकामी होईल:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं जो कौन्सिलर किंवा जो बंदरचा ट्रस्टी, प्रसंगाप्रमाणें, कौन्सिलर किंवा ट्रस्टी असण्याचा बंद झाल्यावर, कौन्सिलर किंवा बंदरचा ट्रस्टी ह्मणून तावडतोब पुनः नेमला जाईल किंवा पुनः निवडला जाईल त्यास रकम (ड) लागू आहे असें समजूं नये.

ट्रस्टींचा ज्यांत हितसंबंध असेल त्या बाबतींत त्यांना मत देण्याचा अगर वाद करण्याचा अधिकार नाहीं.

(२) ज्या कोणा ट्रस्टीचा ज्या कोणत्याही बाबतींत, १४ व्या कलमाचें पोटकलम (२) यांत सांगितल्या प्रकारचा स्वतःचा किंवा स्वतःच्या भागीदाराचा कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध असेल अगर जींत त्याचा, एकाद्या कुळाच्यावतीनें धंद्यापरत्वें, अगर कोणत्याही मनुष्याचा एजंट या नात्यानें, हितसंबंध असेल, त्यानें बोर्डाच्या किंवा त्याच्या कोणा कमिटीच्या कोणत्याही सभेंत त्या बाबतीच्या वादविवादांत सामील होतां कामा नये किंवा त्या बाबतींत मत देतां कामा नये.

चेअरमनाचा पगार सरकारानें ठरवावा.

१६. (१) चेअरमनास, सरकार वेळोवेळीं ठरवील तसा माही पगार मिळेल: मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, असा पगार ३,००० रुपयांहून जास्त, आणि कलम १० अन्वयें जाहीर करण्यांत येईल त्या तारखेनंतर लगत येणारे १२ महिने शिवाय करून इतर प्रसंगीं, २,००० रुपयांहून कमी, असतां कामा नये. चेअरमनानें, सदरीं सांगितलेली मुदत शिवाय करून इतर कोणत्याही वेळीं इतर कोणताही पगारी हुद्दा धारण करतां कामा नये, आणि त्यानें, सरकार त्याला इतर प्रकारें परवानगी देईल तेवढें खेरीज करून, आपला सगळा वेळ व सगळें लक्ष ह्या आक्टाखालील आपल्या कामाकडे लावलें पाहिजे.

(२) या कलमाच्या व २२ व्या कलमाच्या कारणांसाठीं 'पगार' या शब्दांत, नेमलेल्या अमलदारास सिव्हिल सर्व्हिस रेग्युलेशन्स अन्वयें, जी कोणतीही नेमणूक मिळण्याचा हक्क असेल तिचा किंवा जी कोणतीही वर्गणी देण्यास तो पात्र असेल तिचा समावेश होत नाहीं असें समजावें.

चेअरमन खेरीज करून इतर ट्रस्टींना ज्या फी मिळण्याचा हक्क आहे त्या.

१७. चेअरमनाखेरीज दुसरा जो कोणताही ट्रस्टी, ज्या सभेंत कोरम हजर असून काम करण्यांत येईल तींत तिच्या आरंभापासून अखेरपर्यंत हजर असेल, त्या प्रत्येकाला खालीं सांगितल्याप्रमाणें फी मिळण्याचा हक्क आहे:—

साधारण सभेबद्दल.

बोर्डाच्या प्रत्येक साधारण सभेबद्दल रु. ३०: मात्र कोणत्याही एका आठवड्यांत अशी सभा तहकूब ठेवण्यांत आल्यास किंवा एकाहून अधिक साधारण सभा भरण्यांत आल्यास, त्या एका आठवड्यांतील सदरहू प्रकारच्या सगळ्या सभांमध्यें हजर राहण्याबद्दल कोणत्याही ट्रस्टीला रु. ३० याहून अधिक रकम देतां कामा नये;

विशेष सभेबद्दल.

लगत खालच्या कलमाचें पोटकलम (२) (ब) याअन्वयें भरविलेल्या बोर्डाच्या प्रत्येक विशेष सभेबद्दल रु. ३०;

कमिटीच्या विशेष सभेबद्दल.

सदरहू हजर असणारा ट्रस्टी हा ज्या कमिटीचा सभासद असेल त्या कमिटीची जी विशेष सभा लगत खालच्या कलमाचें पोटकलम (४) याअन्वयें भरविण्यांत येईल त्या प्रत्येक विशेष सभेबद्दल रु. १६: मात्र अशी कमिटीची

विशेष सभा, बोर्डाच्या ज्या साधारण किंवा विशेष सभेबद्दल सदरील दोहों-पैकीं कोणत्याही एका रकमेअन्वयें त्याला फी मिळण्याचा हक्क असेल त्या साधारण किंवा विशेष सभेच्या लागोपाठ किंवा तिच्या तयारीदाखल त्याच दिवशीं भरलेली नसली पाहिजे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, कोणत्याही एका महिन्यांत भरलेल्या सभांच्या संबंधानें कोणत्याही ट्रस्टीस द्यावयाच्या फीची एकंदर रकम रु. २०० पेक्षां, किंवा या संबंधानें वेळोवेळीं करण्यांत आलेल्या कोणत्याही पोटकायद्यावरून ठरविली जाईल त्या रकमेपेक्षां जास्त होतां कामा नये. विशेष ठराव.

## बोर्डानें चालवावयाचीं कामें.

१८. बोर्डानें चालवावयाच्या कामांसंबंधानें खालील ठराव पाळले पाहिजेत, (ह्मणजे):— बोर्डानें चालवावयाच्या कामांसंबंधी ठराव.

(१) बोर्डांत कोणतीही जागा रिकामी असेल त्या मुदतींत, चालू असणाऱ्या ट्रस्टींना ती जागा मुळींच रिकामी झालेली नसल्याप्रमाणें काम करण्याचा अधिकार आहे. जागा रिकामी झाल्याच्या कारणानें काम चालविण्यास व्यत्यय येत नाहीं.

(२) बोर्डानें एकत्र जमून आपल्या सभांची जागा, दिवस, तास, नोटीस, व्यवस्था व त्या तहकूब ठेवणें यांच्या संबंधानें, आणि सामान्यतः काम करण्याच्या संबंधानें, आपणास योग्य वाटेल तशी, या आक्टास विरुद्ध नसणारी तजवीज, खालीं दिलेल्या ठरावांस पात्र राहून, वेळोवेळीं केली पाहिजे. ते ठराव येणेंप्रमाणें:— बोर्डानें एकत्र जमून आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणें काम करण्याबद्दल तजवीज करणें.

(अ) साधारण सभा दर महिन्यास निदान एकदा तरी भरली पाहिजे; दर महिन्यास एकदा साधारण सभा भरलीच पाहिजे, किंवा

(ब) चेअरमनास योग्य वाटेल तेव्हां तेव्हां त्याला विशेष सभा भरण्याचा अख्त्यार आहे, आणि निदान तीन ट्रस्टींनीं लेखी विनंती केली असतां त्यानें तशी सभा भरली पाहिजे; जरूर असेल तेव्हां तेव्हां विशेष सभा भरणें.

(क) कोणत्याही सभेंत आरंभापासून अखेरपर्यंत निदान आठ ट्रस्टी हजर असल्याखेरीज तींत कोणतेंही काम करतां कामा नये; कोरम होण्यास आठ ट्रस्टी असले पाहिजेत.

(ड) प्रत्येक सभेंत, चेअरमन हजर असेल तर त्यानें, आणि तो हजर नसल्यास, हजर असलेल्या ट्रस्टींतून ज्या कोणा एकास ती सभा पसंत करील त्यानें अध्यक्षस्थानीं बसलें पाहिजे. चेअरमन हजर असल्यास प्रत्येक सभेंत त्यानें अध्यक्षस्थानीं बसणें.

(इ) सर्व प्रकरणांचा निकाल हजर असलेल्या ट्रस्टींच्या बहुमतानें केला पाहिजे. मतें समसमान पडतील त्या सर्व प्रसंगीं अध्यक्षास दुसरें किंवा निर्णायक मत देण्याचा अधिकार आहे. सर्व प्रकरणांचा निकाल बहुमतानें केला पाहिजे.

(फ) मतें मागण्यांत आल्यास, मतें देणाऱ्या ट्रस्टींचीं नांवें व त्यांच्या मतांचा प्रकार हीं अध्यक्षानें लिहून ठेविलीं पाहिजेत; मतें मागण्याचा अधिकार आहे.

(ग) हजर असलेल्या ट्रस्टींच्या नांवांसुद्धां दरेक सभेंत चालविलेल्या कामाची हकीकत, त्या कारणासाठीं एक बुक ठेवून त्यांत लिहून ठेविली पाहिजे; आणि त्या हकीकतीवर, लगत पुढल्या सभेच्या वेळीं अशा सभेच्या अध्यक्षानें सही केली पाहिजे, व ती कचेरीच्या तासांत कोणत्याही ट्रस्टीस पाहण्याची परवानगी असली पाहिजे. हकीकत लिहून ठेविली पाहिजे.

(३) बोर्डास, चेअरमन व बोर्डाला योग्य वाटतील ते इतर ट्रस्टी यांच्या कमिट्या वेळोवेळीं स्थापण्याचा आणि— बोर्डास आपला अधिकार कमिट्यांकडे सोंपून देण्याचा अख्त्यार आहे.

(अ) या आक्टाच्या उद्देशांशीं संबंध असलेला कोणताही विषय अशा कमिट्यांकडे, चौकशी करून रिपोर्ट करण्यासाठीं देण्याचा,

(व) अशा कमिट्यांकडे, आपले कोणतेही अधिकार किंवा कोणतीही कामें, त्यासंबंधानें मुद्दाम ठराव करून आणि कलम ९४ (१) ची रकम (अ) अन्वयें केलेल्या कोणत्याहि पोटकायद्यांस पात्र राहून, सोंपून देण्याचा,

अधिकार आहे.

याप्रमाणें नेमलेल्या कोणत्याही कमिटीला बोर्ड वेळोवेळीं जे कोणतेही हुकूम देईल त्यांबरहुकूम तिनें चाललें पाहिजे, व बोर्डास कोणत्याही वेळीं, याप्रमाणें स्थापलेल्या कोणत्याही कमिटीच्या रचनेंत फेरफार करण्याचा किंवा अशी कोणतीही नेमणूक रद्द करण्याचा अधिकार आहे. चेअरमन हा अशा प्रत्येक कमिटीचा अध्यक्ष असला पाहिजे.

प्रत्येक कमिटीत चेअरमन हा अध्यक्ष असणें.

कमिट्यांनीं केव्हां सभा भरणें.

(४) कमिट्यांस, आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणें आपल्या सभा भरण्याचा व त्या तहकूब ठेवण्याचा अखत्यार आहे, परंतु चेअरमनास योग्य वाटेल तेव्हां तेव्हां कमिटीची विशेष सभा भरण्याचा त्याला अधिकार आहे, आणि कमिटीच्या निदान दोन सभासदांनीं विनंति केली असतां त्यानें तिची विशेष सभा भरली पाहिजे.

चेअरमन हजर असल्यास त्यानें कमिटीच्या प्रत्येक सभेंत अध्यक्षस्थानीं बसणें.

(५) कमिटीच्या प्रत्येक सभेंत, चेअरमन हजर असेल तर त्यानें, आणि तो हजर नसल्यास, हजर असलेल्या ट्रस्टींतून ज्या कोणा एकास ती सभा पसंत करील त्यानें अध्यक्षस्थानीं बसलें पाहिजे.

कमिटीपुढील प्रकरणांचा निकाल बहुमतानें केला पाहिजे: कोरम दोन-तृतीयांश सभासदांचा असणें.

(६) कमिटीच्या कोणत्याही सभेपुढील प्रकरणांचा निकाल हजर असलेल्या सभासदांच्या बहुमताप्रमाणें केला पाहिजे. मतें समसमान पडतील त्या प्रसंगीं त्या सभेच्या अध्यक्षास एक दुसरें किंवा निर्णायक मत देण्याचा अधिकार आहे. मात्र अशा कोणत्याहि सभेंत, तिच्या आरंभापासून अखेरीपर्यंत, कमिटीच्या सभासदांपैकीं निदान दोन-तृतीयांश सभासद हजर असल्यांवांचून कोणतेंहि काम करतां कामा नये.

गैरशिस्तपणामुळें बोर्डवगैरेचीं कृत्यें बेकायदेशीर होत नाहींत.

(७) बोर्डाचें किंवा कोणत्याही कमिटीचें किंवा ट्रस्टीदाखल काम करणाऱ्या कोणत्याहि मनुष्याचें कोणतेंही कृत्य, बोर्डाच्या, कमिटीच्या किंवा ट्रस्टीच्या नेमणुकींत कांहीं व्यंग आहे एवढ्याच कारणानें, अगर तीं किंवा त्यांपैकीं कोणीही ट्रस्टीच्या हुद्यास नालायक होतें या सबबीवरून, बेकायदेशीर आहे असें समजूं नये.

ज्याची किंमत १,००० रुपयांहून जास्त नसेल असे करार करण्याची रीति.

१९. (१) चेअरमनास, बोर्डाच्यातर्फे एक हजार रुपयांपेक्षां अधिक नसणाऱ्या किंमतीचा किंवा रकमेचा कोणताही करार किंवा कबुलायत, असा करार किंवा कबुलायत ज्या रीतीनें व नमुन्याप्रमाणें त्याच्या स्वतःच्यावतीनें केली असती तर त्याबाबद त्या त्या काळीं अमलांत असलेल्या कायद्याप्रमाणें तो बद्ध झाला असता, त्या रीतीनें व नमुन्याप्रमाणें करण्याचा अधिकार आहे; आणि असा प्रत्येक करार किंवा कबुलायत केल्याबद्दल बोर्डास त्याच्या लगत पुढील साधारण सभेच्या वेळीं रिपोर्ट केला पाहिजे.

किंमत १,००० रुपयांहून जास्त असेल तेव्हां.

(२) बोर्डाच्यातर्फेचा दुसरा प्रत्येक करार व कबुलायत हीं करण्यास बोर्डाची पूर्वी पसंती घेतली पाहिजे, तीं लेखी असलीं पाहिजेत आणि त्यांवर यांत पुढें ठरविल्या-प्रमाणें चेअरमनानें व दुसऱ्या दोन ट्रस्टींनीं सह्या केल्या पाहिजेत व बोर्डाच्या सामायिक शिक्कयानें शिक्का केला पाहिजे. या पोटकलमांत सांगितलेला कोणताही करार किंवा कबुलायत यांत ठरविल्याप्रमाणें करण्यांत न आल्यास, त्यावरून बोर्ड बांधला जाणार नाहीं.

सामायिक शिक्क्याची रखवाली व उपयोग करणें.

(३) बोर्डाचा सामायिक शिक्का बोर्डाच्या सेक्रेटरीच्या रखवालींत राहिला पाहिजे व त्यानें कोणत्याही करारावर किंवा इतर दस्तऐवजावर शिक्का करणें तो दोन ट्रस्टी हजर असल्याशिवाय करतां कामा नये, आणि त्या करारावर किंवा दस्तऐवजावर

आपणासमक्ष शिक्का केल्याच्या दाखल्यादाखल त्यावर त्या ट्रस्टींनीं आपल्या सह्या केल्या पाहिजेत. सदरहू ट्रस्टींच्या सह्या, असा कोणताही करार किंवा दस्तऐवज करून दिल्याबद्दल त्यावर कोणत्याहि साक्षीदारांच्या ज्या सह्या असतील त्यांपासून भिन्न असल्या पाहिजेत.

२०. बोर्डास त्यानें या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याही करारापासून उत्पन्न होणारा कोणताही हक्क किंवा मागणी यांबद्दल किंवा यांच्या संबंधानें, अगर त्यानें किंवा त्यावर चालविलेल्या कोणत्याही कामाच्या किंवा मांडलेल्या कोणत्याही दाव्याच्या संबंधानें, आपणास पुरती वाटेल तशा पैक्याच्या रकमेकरितां किंवा नुकसानीच्या दुसऱ्या मोबदल्याकरितां तोडजोड करण्याचा अधिकार आहे. बोर्डाकडून किंवा बोर्डावर होणाऱ्या दाव्यांबाबद तोडजोड करण्याचा अधिकार.

चेअरमन.

२१. चेअरमनानें— चेअरमनाचीं कामें.

(१) आजारीपणामुळें किंवा इतर वाजवी कारणामुळें हजर होण्यास हरकत न झाल्यास, बोर्डाच्या प्रत्येक सभेंत हजर असलें पाहिजे;

(२) एक्झिक्यूटिव्ह कारभाराच्या बाबतींमध्यें आणि बोर्डाचे हिशोब व कागदपत्र यांसंबंधाच्या बाबतींमध्यें बोर्डाच्या सर्व अमलदारांनीं व नोकरांनीं केलेल्या कृत्यांवर व चालविलेल्या कामांवर देखरेख व निर्बंध ठेविला पाहिजे, आणि कलम ९२ (१) यांत निर्दिष्ट केलें आहे तेथवर, सदरहू अमलदारांच्या व नोकरांच्या नोकरीसंबंधाच्या आणि त्यांचा पगार, सवलती व नेमणुका यांसंबंधाच्या सर्व प्रकरणांचा निकाल केला पाहिजे;

(३) बोर्डानें चालविलेल्या कामांपैकीं ज्या कोणत्याही कामाच्या हकीकतीची नकल, व जीं कोणतींही पत्रकें किंवा इतर माहिती सरकार वेळोवेळीं मागेल, ती नकल वतीं पत्रकें किंवा ती माहिती सरकारास दिली पाहिजे.

२२. (१) सरकारास वेळोवेळीं चेअरमनाला गैरहजिरीची रजा देण्याचा अख्त्यार आहे. चेअरमनास गैरहजिरीची रजा.

(२) चेअरमन याप्रमाणें रजेवर गैरहजर असतांना त्याला कांहीं नेमणूक द्यावयाची असल्यास तिची रकम, पराकाष्ठा चेअरमनाच्या पगाराइतकी जी रकम सरकार ठरवील तेवढी असली पाहिजे : मात्र, चेअरमन हा सरकारी अमलदार असेल तर त्या नेमणुकीची रकम, सिव्हिल सर्व्हिस रेग्युलेशन्सअन्वयें त्याला जेवढी मिळण्याचा हक्क असेल तेवढी असली पाहिजे. रजेवर गैरहजर असतांना चेअरमनास मिळावयाची नेमणूक.

(३) चेअरमन गैरहजर असेल त्या कोणत्याही मुदतींत चेअरमनचें काम करण्यासाठीं कोणत्याही मनुष्यास नेमण्याचा सरकारास अख्त्यार आहे, आणि याप्रमाणें नेमलेल्या कोणत्याही मनुष्यानें, ज्याच्याबद्दल काम करण्यास त्याला नेमलें असेल त्या मनुष्यास या आक्टावरून दिलेले अधिकार चालविले पाहिजेत व सोंपून दिलेलीं कामें केलीं पाहिजेत, व सदरहू मनुष्य ज्या जबाबदाऱ्यांस, यत्तांस व शर्तींस पात्र असेल त्याच जबाबदाऱ्यांस, यत्तांस व शर्तींस तो पात्र असेल आणि सरकार ठरवील तेवढा, १६ व्या कलमांत ठरविलेल्या मर्यादेच्याआंतील माही पगार त्याला मिळेल. आक्टिंग चेअरमनची नेमणूक व पगार.

भाग ३.—कामें व अधिकार.

सुधारणेसंबंधी योजनापत्रकें.

२३. शहराच्या अमुक भागांतील अमुक हद्दींच्याआंत— एकाद्या मोहोल्याच्या किंवा जमिनीच्या रोगकारक स्थितीविषयीं हुद्द्याच्या नात्याच्या सूचनापत्रावरून खात्री झाली असतां बोर्डानें त्याच्या सुधारणेसाठीं योजनापत्रक तयार करणें.

(१) मनुष्यवस्तीसाठीं उपयोग करण्यांत येत असलेल्या किंवा तसा उपयोग करण्याचा इरादा अगर संभव असलेल्या अमुक इमारती मनुष्यवस्तीसाठीं अयोग्य आहेत, किंवा

[ ]

(२) अशा हद्दींतील स्ट्रीट व इमारती अगर इमारतींचे गट यांचा अरुंदपणा, दाटी आणि वाईट रचना किंवा त्यांची वाईट स्थिति हीं, अगर उजेड, हवा, हवा खेळण्याचीं साधनें किंवा योग्य सोई यांचा अभाव, अगर दुसऱ्या कोणत्याही आरोग्यरक्षणासंबंधी उणिवा, अगर अशा कारणां-पैकीं एक किंवा अधिक कारणें हीं, त्या हद्दींतल्या जागेंतील इमारतींत अगर शेजारच्या इमारतींत राहणाऱ्या मनुष्यांच्या आरोग्यास भयकारक किंवा अपकारक आहेत,

आणि अशा इमारतींसंबंधाच्या अपायकारक गोष्टींचा व अशा जागेंतील आरोग्यरक्षणा-संबंधी उणिवांचा, अशा जागेंतील स्ट्रीटांची व इमारतींची, अगर असे स्ट्रीट किंवा इमारती यांतून कांहींची रचना फिरविण्याकरितां व तीं पुन: बांधण्याकरितां एक सुधारणे-संबंधी योजनापत्रक तयार केल्याशिवाय इतर प्रकारें चांगल्या रीतीनें परिहार करतां येणार नाहीं, असें यांत पुढें सांगितल्याप्रकारचें हद्द्याच्या नात्याचें सूचनापत्र बोर्डाकडे येईल, तेव्हां बोर्डानें त्या पत्राचा विचार केला पाहिजे, आणि त्याच्या खरेपणाबद्दल व आपली पैसावगैरे साधनें पुरतीं असल्याबद्दल आपली खातरी झाली तर बोर्डानें, ती जागा रोगकारक असून तिच्यासंबंधानें एक सुधारणेसंबंधी योजनापत्रक तयार करणें अवश्य आहे असा ठराव केला पाहिजे, आणि तो केल्यानंतर तावडतोब त्यानें त्या जागेची सुधारणा करण्यासाठीं एक योजनापत्रक तयार करण्याच्या कामास लागलें पाहिजे.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा एका योजनापत्रकांत सदरहू प्रकारच्या कितीही जागांचा समावेश करण्यास हरकत नाहीं.

आणखी असेंही ठरविण्यांत येतें कीं, २६ व्या कलमाच्या कारणांसाठीं बोर्डास, अशा योजनापत्रकांत समावेश केलेल्या जागेच्या हद्दीबाहेरील जागांमध्यें सर्व्हे करविण्याचा अधिकार आहे.

हद्द्याच्या नात्याचें सूचनापत्र कमिशनरानें पाठविणें.

२४. (१) हद्द्याच्या नात्याचें सूचनापत्र याचा अर्थ, या आक्टाच्या कारणांसाठीं कमिशनरानें बोर्डास पाठविलेलें सूचनापत्र असा समजावा.

(२) असें सूचनापत्र कमिशनरास आपण होऊन पाठविण्याचा अधिकार आहे, आणि तें पत्र त्यानें—

(अ) कार्पोरेशननें तसा ठराव केला असतां,

(ब) म्युनिसिपालिटीच्या एक्झिक्युटिव्ह हेल्थ ऑफिसरनें लेखी तकरार केली असतां,

(क) ज्या जागेच्या संबंधानें तकरार करण्यांत आली असेल त्या जागेचा समावेश होणाऱ्या वार्डांत राहणाऱ्या तीन किंवा अधिक जस्टि-सांच्या सहींची लेखी तकरार आली असतां,

(ड) जीं मनुष्यें म्युनिसिपल आक्टाअन्वयें घेण्याजोगा कोणताही मिळक-तीवरील कर देण्यास पात्र असून जीं, ज्या जागेच्या संबंधानें तकरार केली असेल त्या जागेचा समावेश होणाऱ्या वार्डांत राहत असतील, अशा बारा किंवा अधिक मनुष्यांच्या सहींची लेखी तकरार आली असतां,

पाठविलेंच पाहिजे.

सुधारणेसंबंधी योजनापत्र-कांत कांहींच्या बाबतींत फेरबदल तज-वीज करणें.

२५. सदरहू सुधारणेसंबंधी योजनापत्रकांतून ज्या जागेसंबंधी हद्द्याच्या नात्याचें सूचनापत्र आलें असेल तिचा कोणताही भाग वगळणें किंवा त्या पत्रकांत शेजारच्या कोणत्याही जमिनीचा समावेश करणें योग्य आहे असें बोर्डास वाटल्यास त्याप्रमाणें कर-ण्याचा अधिकार आहे, आणि त्या पत्रकांत,–

(१) त्यांत समावेश केलेल्या जागेच्या हद्दींच्याआंत, खालील गोष्टींबाबत तजवीज केली पाहिजे, ह्मणजे—

(अ) त्यांतील योजना अमलांत आणण्यासाठीं ज्या कोणत्याही जमिनीची जरूरी आहे असें किंवा ती योजना अमलांत आणण्यामध्यें ज्या कोणत्याही जमिनीशीं कांहीं संबंध पोहंचतो असें बोर्डास वाटेल ती जमीन घेण्याबाबत,

(ब) सगळी किंवा कोणतीही जमीन पुनः आंखून देण्याबाबत, आणि इमारती बांधणें व त्या पुनः बांधणें आणि स्ट्रीट बनविणें व स्ट्रीटांत फेरफार करणें यांबाबत,

(क) याप्रमाणें बनविलेल्या किंवा फेरफार केलेल्या स्ट्रीटांतील पाणी काढून लावण्याबाबत व त्यांत दिवे लावण्याबाबत;

(२) वर सांगितलेल्या हद्दींच्याआंत, खालील गोष्टींबाबत तजवीज करण्याचा अधिकार आहे, ह्मणजे—

(अ) ज्या ठिकाणांतील पाणी अधिक चांगल्या रीतीनें काढून लावतां यावें ह्मणून तेथील जी कोणतीही जमीन उंच करणें बोर्डास योग्य वाटेल ती उंच करण्याबाबत,

(ब) त्या पत्रकांत समावेश केलेल्या जागेंत किंवा कोणत्याही जवळच्या जागेंत अधिक चांगल्या रीतीनें हवा खेळण्यासाठीं खुल्या जागा बनविण्याबाबत,

(क) आरोग्यरक्षणासंबंधी ज्या व्यवस्था करणें जरूर असेल त्या सगळ्या किंवा त्यांतून कांहीं व्यवस्था करण्याबाबत, आणि

(३) वर सांगितलेल्या हद्दींच्याआंत व त्या हद्दींबाहेर, गरीब व कामकरी वर्गांच्या लोकांच्या, आणि त्या पत्रकांतील योजना अमलांत आणण्यामध्यें उघडे पडतील तशा त्या प्रकारच्या सगळ्या किंवा कांहीं लोकांच्या राहण्याच्या सोईसाठीं इमारती बांधण्याबाबत तजवीज करण्याचा अधिकार आहे. अशा सोईमध्यें दुकानांचा समावेश होतो असें समजावें.

२६. कोणत्याही जागेसाठीं सुधारणेसंबंधी योजनापत्रक तयार करतांना, शहरांतील त्या जागेशेजारचे भाग व एकंदर शहर यांच्या स्थितीकडे व प्रकाराकडे, आणि शहरांतील त्या जागेशेजारचे व इतर भाग यांकरितां सुधारणेसंबंधी किंवा स्ट्रीटसंबंधी योजनापत्रकें करावीं लागण्याचा संभव आहे किंवा कसें याकडे लक्ष्य पुरविलें पाहिजे. *योजनापत्रक तयार करतांना कोणत्या गोष्टींकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे.*

२७. (१) सुधारणेसंबंधी योजनापत्रक पुरें झाल्यावर बोर्डानें एक जाहिरनामा तयार केला पाहिजे: या जाहिरनाम्यांत, तें पत्रक तयार केल्याची गोष्ट व त्यांत समावेश केलेल्या जागेच्या हद्दी या लिहिल्या पाहिजेत, आणि त्या पत्रकासंबंधी तपशील, त्यांत समावेश केलेल्या जागेचा नकाशा व जी जमिन घेण्याचें योजिलें असेल ती दर्शविणारा एक तक्ता, हे कोणत्याही वाजवी वेळीं कोणत्या जागीं पाहावयास मिळतील तें सांगितलें पाहिजे: आणि त्यानें— *योजनापत्रक पुरें झाल्यावर काय करावें.*

(अ) अशा जाहिरनाम्याची एक नकल कार्पोरेशनच्या अध्यक्षाकडे पाठविली पाहिजे, आणि त्या अध्यक्षानें ती पोंहचल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्याआंत बोर्डाकडे, त्या पत्रकासंबंधानें जो कोणताही अर्ज करणें कार्पोरेशनास योग्य वाटेल तो अर्ज, यांत पुढें ठरविल्याप्रमाणें सरकाराकडे पाठविण्यासाठीं, पाठविला पाहिजे; *त्या पत्रकाच्या जाहिरनाम्याची नकल कार्पोरेशनच्या अध्यक्षाकडे पाठविणें.*

[ ]

जाहिरनामा प्रसिद्ध करणें.

(ब) लागोपाठ तीन आठवडेपर्यंत, एकाच वेळीं, मुंबई सरकारी गॅझेटांत आणि शहरांत वांटलें जाणाऱ्या कोणत्या तरी त्याच त्याच एका किंवा अधिक इंग्रजी वर्तमानपत्रांत व कोणत्या तरी त्याच त्याच दोन किंवा अधिक देशभाषेंतील वर्तमानपत्रांत सदरहू जाहिरनाम्याची एक नकल प्रसिद्ध केली पाहिजे.

योजनापत्रक अमलांत आणतेवेळीं घ्यावयाच्या मिळकतीच्या मालकांवर नोटिसा बजाविणें.

(२) असा जाहिरनामा पहिल्यानें ज्या दिवशीं प्रसिद्ध करण्यांत येईल त्या दिवसाच्या लगत पुढील तीस दिवसांत, सदरहू पत्रकांतील योजना अमलांत आणतेवेळीं बोर्डानें घेण्याची योजलेल्या कोणत्याहि जमिनीवर किंवा इमारतीवर म्युनिसिपल आक्टाअन्वयें घ्यावयाचे मिळकतीवरील कर देण्यास प्रथमतः पात्र ह्मणून ज्या कोणा मनुष्याचें नांव कमिशनराच्या असेसमेंट-बुकांत असेल त्या प्रत्येक मनुष्यावर एक नोटीस बजाविली पाहिजे व त्या नोटिशींत, ती जमीन किंवा इमारत एका सुधारणेसंबंधी योजनापत्रकाच्या कारणासाठीं बोर्डानें घेण्याचें योजिलें आहे असें लिहिलें पाहिजे आणि याप्रमाणें ज्यावर नोटीस बजाविली असेल तो मनुष्य ती जमीन किंवा इमारत घेण्याच्या संबंधानें नाकबूल आहे किंवा नाहीं व तो नाकबूल असल्यास अशा नाकबुलीचीं कारणें काय आहेत हें दर्शविणारा तिचा जबाब, ती नोटीस बजाविल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्याआंत, द्यावा असें फर्माविलें पाहिजे.

नोटिसा कशा बजाविणें.

(३) अशा नोटिशीवर चेअरमनानें, किंवा त्याच्या हुकुमानें, सही केली पाहिजे, आणि ती—

(अ) ज्या मनुष्यावर बजवावयाची असेल त्यास जातीनें, किंवा तो मनुष्य गैरहजर असल्यास अगर सांपडूं शकत नसल्यास, त्याच्या एजंटास देऊन, किंवा कोणी एजंट सांपडूं शकत नसल्यास त्या जमिनीवर ठेवून किंवा इमारतीस लावून, किंवा

(ब) सदरीं सांगितल्याप्रकारच्या मनुष्याच्या नेहेमींच्या राहण्याच्या किंवा धंद्याच्या जागीं किंवा ज्या जागीं तो शेवटीं राहत होता किंवा धंदा चालवीत होता असें माहीत असेल त्या जागीं ठेवून, किंवा

(क) त्या मनुष्याच्या नेहेमींच्या राहण्याच्या किंवा धंद्याच्या जागेच्या पत्त्यावर किंवा ज्या जागीं तो शेवटीं राहत होता किंवा धंदा चालवीत होता असें माहीत असेल त्या जागेच्या पत्त्यावर टपालांतून पाठवून,

ती बजावली पाहिजे.

बोर्डानें, नोटिसा प्रसिद्ध केल्यानंतर व बजाविल्यानंतर योजनापत्रक सरकाराकडे मंजुरीसाठीं पाठविणें.

२८. (१) सदरहू योजनापत्रक प्रसिद्ध करण्याच्या व त्या पत्रकासंबंधी नोटिसा बजाविण्याच्या संबंधानें वर सांगितलेल्या ठरावांप्रमाणें केल्यावर, बोर्डानें २७ व्या कलमाअन्वयें आलेल्या कोणत्याहि अर्जाचा किंवा जबाबाचा विचार करून व त्या पत्रकांत आपणास योग्य वाटतील ते फेरफार दाखल करून त्यास मंजुरी मिळण्यासाठीं सरकारास अर्जी केली पाहिजे.

मंजुरीबद्दलच्या अर्जीबरोबर असावयाचा तपशील.

(२) मंजुरीबद्दलच्या अर्जीबरोबर, पोटकलम (३) यांत ज्या बाबतीबद्दल ठराव केला आहे ती खेरीज करून, इतर प्रसंगीं खालीं सांगितलेले कागदपत्र असले पाहिजेत, ह्मणजे.

(अ) जे कोणतेही फेरफार योजनापत्रकांत दाखल केले असतील त्यांबद्दलच्या कारणांसहित, त्या पत्रकांतील योजनेचें, पूर्ण तपशिलानिशीं, वर्णन ;

(ब) पूर्ण प्लान आणि त्या पत्रकांतील योजना अमलांत आणण्याच्या खर्चाचे अंदाज ;

(क) जी जमीन घेण्याचें योजिलें असेल ती दर्शविणारा एक तक्ता;

(ड) २७ व्या कलमाचें पोटकलम (१) याअन्वयें आलेला कोणताहि अर्ज ;

(इ) कोणा मनुष्यांनीं २७ व्या कलमाचें पोटकलम (२) यांत सांगितलेल्या नोटिसांच्या जबाबांत, त्यांची जमीन घेण्याच्या संबंधानें नाकबुली दर्शविली असल्यास त्यांच्या नांवांची, अशा मनुष्यांनीं अशा नाकबुलीबद्दल कोणतींही कारणें दिलीं असल्यास त्यांसहित, यादी ;

(फ) रकम (क) अन्वयेंच्या तक्त्यांत दर्शविलेल्या सर्व जमिनींची, आणि सदरहू योजना अमलांत आणण्यामध्यें बनवावयाच्या किंवा फेरफार करावयाच्या कोणत्याही स्ट्रीटच्या प्रत्येक बाजूपासून ८० फूट अंतराच्याआंत सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं असलेल्या कोणत्याहि इतर जमिनीची जी किंमत २७ व्या कलमाअन्वयें जमिनीसंबंधी जाहिरनामा प्रसिद्ध केल्याच्या तारखेरोजीं कमिशनरच्या असेसमेंट बुकांत कर आकारावयाची किंमत म्हणून दाखल केली असेल ती किंमत दाखविणारी यादी.

(३) कोणत्याहि सुधारणेसंबंधी योजनापत्रकाअन्वयें गरीब व कामकरी लोकांसाठीं राहण्याचीं घरेंवगैरे बांधण्याची तजवीज केली असेल तेव्हां बोर्डास २७ व्या कलमांतील ठरावांप्रमाणें केल्यानंतर, ताबडतोब, अशीं राहण्याचीं घरेंवगैरे बांधण्यासंबंधी प्लान व अंदाज मंजूरीसाठीं सरकाराकडे सादर करण्याचा अधिकार आहे, आणि अशी मंजुरी मिळाल्यावर २९ व्या कलमांतील ठराव, जरूर असलेल्या सर्व फेरफारांनिशीं, त्या पत्रकाच्या ज्या भागांत अशीं राहण्याचीं घरेंवगैरे बांधण्याबद्दल तजवीज केलेली असेल तो भाग तें पत्रकच असल्याप्रमाणें त्यास लागू होतील.

गरीब व कामकरी लोकांकरितां राहण्याचीं घरेंवगैरे बांधण्याबद्दल योजनापत्रकांत तजवीज केली असेल तेव्हां काय करावें.

२९. (१) (अ) सरकारची मंजुरी मिळाल्यावर, चेअरमननें एका ठरावांत सदरहू मंजुरी मिळाल्याची गोष्ट लिहून व योजनापत्रकाच्या कारणांसाठीं बोर्डानें जी जमीन घेण्याचें योजिलें असेल ती सार्वजनिक कारणासाठीं पाहिजे आहे असें लिहून तो ठराव, सरकारच्या एका सेक्रेटरीच्या सहीनिशीं प्रसिद्ध करण्यासाठीं पाठविला पाहिजे.

मंजुरी मिळाल्यावर, घ्यावयाच्या जमिनीचा तपशील देऊन ठराव प्रसिद्ध करणें, आणि तो ठराव प्रसिद्ध झाल्यावर बोर्डानें योजना अमलांत आणण्याच्या कामास लागणें.

(ब) तो ठराव मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केला पाहिजे आणि त्यांत, जी जमीन घेण्याचें योजिलें असेल ती कोणत्या हद्दींच्याआंत आहे, तिची कोणत्या कारणासाठीं गरज आहे, तिचें सरासरी क्षेत्रफळ किती आहे, आणि कोणत्या जागीं त्या जमिनीचा प्लान पाहण्यास मिळेल, तें लिहिलें पाहिजे.

(क) सदरहू ठराव हा, सदरहू जमिनीची सार्वजनिक कारणासाठीं गरज असल्याबद्दलचा निरुत्तर पुरावा होईल, आणि बोर्डानें, सदरहू ठराव प्रसिद्ध झाल्यावर, योजनापत्रक अमलांत आणण्याच्या कामास लागलें पाहिजे.

(२) (अ) त्या योजनापत्रकाच्या कोणत्याही भागांत एखादी सुधारणा करतां येईल असें बोर्डास कोणत्याही वेळीं दिसून आल्यास, बोर्डास तशी सुधारणा करण्याच्या कारणासाठीं त्या पत्रकांत फेरफार करण्याचा अधिकार आहे, आणि या पोटकलमाच्या लगत पुढील दोन रकमांतील ठरावांस पात्र राहून बोर्डानें ताबडतोब, सदरहूप्रमाणें फिरवलेलें योजनापत्रक अमलांत आणण्याच्या कामास लागलें पाहिजे.

बोर्डास योजनापत्रकाच्या कोणत्याही भागांत फेरफार करण्याचा अधिकार आहे.

(ब) जर सदरीलप्रमाणें फिरविलेलें योजनापत्रक अमलांत आणण्याच्या निवळ खर्चाचा अंदाज, मंजूर केलेलें योजनापत्रक अमलांत आणण्याच्या निवळ खर्चाच्या अंदाजाबाहेर ९,००० रुपयांच्या रकमेहून जास्त होईल, तर बोर्डानें, सरकारची पूर्वी मंजुरी घेतल्यावांचून, फिरविलेलें योजनापत्रक अमलांत आणण्याच्या कामास लागूं नये.

(क) फिरवलेल्या योजनापत्रकावरून, कलम २८ (२) (फ) अन्वयें योजनापत्रकाबरोबर असलेल्या यादींत दर्शविलेल्या जमिनीखेरीज इतर कोणतीहि जमीन कबुलायतीशिवाय इतर रीतीनें घ्यावयाची असल्यास, कलमें २७ व २८ यांतील आणि पोटकलम (१) यांतील ठराव, त्या पत्रकाचा सदरहूप्रमाणें फिरवलेला भाग तें पत्रकच असता तर त्यास ज्या रीतीनें लागू झाले असते त्याच रीतीनें त्यास लागू होतील असें समजावें.

[ ]

## स्ट्रीटसंबंधी योजनापत्रकें.

बोर्डास स्ट्रीटसंबंधी योजनापत्रक तयार करण्याचा अधिकार आहे.

३०. शहराच्या विस्तारासाठीं घरठाणांची तजवीज करण्याच्या, किंवा शहराच्या कोणत्याही भागांत हवा खेळण्याच्या संबंधानें जी उणीव असेल ती दूर करण्याच्या, किंवा शहराच्या निरनिराळ्या भागांच्या दरम्यान राहदारीचीं साधनें व सोई हीं नवीन करण्याच्या अगर असलेलीं वाढविण्याच्या कारणासाठीं, शहराच्या कोणत्याही भागांत नवीन स्ट्रीट बनविणें किंवा त्या भागांत असलेल्या स्ट्रीटांमध्यें फेरफार करणें योग्य आहे असें जेव्हां जेव्हां बोर्डास वाटेल तेव्हां तेव्हां तशा मतलबाचा ठराव करण्याचा बोर्डास अखत्यार आहे, आणि बोर्डानें तावडतोब आपणास योग्य वाटेल तशा जागेसाठीं एक स्ट्रीटसंबंधी योजनापत्रक तयार करावयास लागलें पाहिजे.

स्ट्रीटसंबंधी योजनापत्रकांत कोणकोणत्या बाबतींबद्दल तजवीज करणें.

३१. स्ट्रीटसंबंधी योजनापत्रकांत—

(१) त्यांत समावेश केलेल्या जागेच्या हद्दींच्याआंत खालील गोष्टींबाबत तजवीज केली पाहिजे, ह्मणजे—

(अ) तें पत्रक अमलांत आणण्यासाठीं ज्या कोणत्याही जमिनीची जरुरी आहे असें किंवा तें अमलांत आणण्यामध्यें ज्या कोणत्याही जमिनीशीं कांहीं संबंध पोहंचतो असें बोर्डास वाटेल ती जमीन घेण्याबाबत;

(ब) सगळी किंवा कोणतीही जमीन पुनः बांधून देण्याबाबत, आणि इमारती बांधणें व त्या पुनः बांधणें आणि स्ट्रीट बनविणें व स्ट्रीटांत फेरफार करणें यांबाबत:

(क) याप्रमाणें बनविलेल्या किंवा फेरफार केलेल्या स्ट्रीटांतील पाणी काढून लावण्याबाबत व त्यांत दिवे लावण्याबाबत;

(२) वर सांगितलेल्या हद्दींच्याआंत, ज्या ठिकाणांतील पाणी अधिक चांगल्या रीतीनें काढून लावतां यावें ह्मणून, बोर्डाकडे आलेली किंवा बोर्डानें घ्यावयाची जी कोणतीही जमीन उंच करणें बोर्डास योग्य वाटेल ती उंच करण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे; आणि

(३) वर सांगितलेल्या हद्दींच्याआंत व त्या हद्दींबाहेर, गरीब व कामकरी लोकांच्या, आणि तें पत्रक अमलांत आणण्यामध्यें उघडे पडतील तशा त्या प्रकारच्या सगळ्या किंवा कांहीं लोकांच्या राहण्याच्या सोईसाठीं इमारती बांधण्याबाबत तजवीज करण्याचा अधिकार आहे. अशा सोईमध्यें दुकानांचा समावेश होतो असें समजावें.

योजनापत्रक पुरें झाल्यावर काय करावें.

३२. स्ट्रीटसंबंधी योजनापत्रक पुरें झाल्यावर, कलमें २७, २८ व २९ यांतील ठराव तें पत्रक सुधारणेसंबंधी योजनापत्रक असतें तर त्यास ज्या रीतीनें लागू झाले असते त्याच रीतीनें ते, जरूर असलेल्या सर्व फेरफारांनिशीं, त्याला लागू होतील.

## जमीन नवसाध्य करण्यासंबंधी योजनापत्रकें.

बोर्डास जमीन नवसाध्य करण्यासंबंधी योजनापत्रक तयार करण्याचा अधिकार आहे.

३३. इ परिशिष्टांत सांगितलेल्या हद्दींच्याआंतील कोणतीही जागा या आक्टाच्या कारणांसाठीं नवसाध्य करणें योग्य आहे असें बोर्डास वाटेल तेव्हां तेव्हां त्यास, वर सांगितल्याप्रकारची जागा नवसाध्य करणें योग्य आहे असा ठराव करण्याचा अखत्यार आहे, आणि त्यानें तावडतोब, नवसाध्य करावयाची योजलेली जागा दाखविणारा एक नकाशा सरकारास, हिंदुस्थान सरकाराकडे पाठविण्यासाठीं, पाठविला पाहिजे, आणि हिंदुस्थान सरकारानें, कोणत्याहि ब्याटरीच्या स्थानाकडे व तिच्या तोफांच्या गोळ्यांच्या माऱ्याच्या अंतराकडे लक्ष्य देऊन, सदरहू जागेंत कोणत्या हद्दाच्याआंत इमारत मुळींच बांधूं नये तें ठरविलें पाहिजे.

हिंदुस्थान सरकारचा हुकुम आल्यावर बोर्डानें अशा जागेच्या संबंधानें जमीन नवसाध्य करण्यासंबंधी एक योजनापत्रक तयार केलें पाहिजे व तें अशा हुकुमाशीं मिळतें असलें पाहिजे.

३४. (१) जमीन नवसाध्य करण्यासंबंधी योजनापत्रकांत खालीं सांगितलेल्या गोष्टींबाबत तजवीज केली पाहिजे, ह्मणजे— जमीन नवसाध्य करण्यासंबंधी योजनापत्रकांत कोणकोणत्या बाबतींबद्दल तजवीज करणें.

(अ) त्या पत्रकांत समावेश केलेली जागा नवसाध्य करण्यासाठीं जरूर असेल तो अग्रकिनाऱ्याचा भाग बंद करण्याबाबत व भरून काढण्याबाबत;

(ब) सदरहू जागेंतील नवसाध्य केलेली सगळी किंवा कोणतीही जमीन आंखून देण्याबाबत आणि स्ट्रीट बनविण्याबाबत;

(क) याप्रमाणें बनविलेल्या स्ट्रीटांतील पाणी काढून लावण्याबाबत व त्यांत दिवे लावण्याबाबत;

(ड) आरोग्यरक्षणासंबंधी जरूर असलेल्या सगळ्या किंवा कांहीं व्यवस्थांबाबत.

(२) कुलाबा येथें कोणतीही जमीन नवसाध्य करण्याच्या बाबतींत, सदरहू जागेचा कोणताही भाग लश्कराच्या भोगवट्यांतील कोणत्याही जमिनीच्या पश्चिमेस असल्यास, सदरहू पत्रकासंबंधी तपशील सरकाराकडे सादर केला पाहिजे आणि सरकारानें खालीं सांगितलेल्या गोष्टी ठरविल्या पाहिजेत, ह्मणजे—

(अ) नवसाध्य करावयाच्या जागेचा कोणताही भाग कलम ६१ (३) यांतील ठरावांअन्वयें लश्करी कारणासाठीं कबज्यांत घेणें जरूर असल्यास तो कोणता तें;

(ब) लश्कराच्या आरोग्यरक्षणासाठीं जरूर असलेल्या गोष्टींच्या संबंधानें पाहतां, कोणत्या शर्तींवर सदरहू जागेच्या कोणत्याही भागावर इमारती बांधता येतील तें;

आणि सदरहू पत्रक अशा ठरावाशीं मिळतें असलें पाहिजे.

३५. जमीन नवसाध्य करण्यासंबंधी योजनापत्रक पुरें झाल्यावर बोर्डानें एक जाहिरनामा तयार केला पाहिजे: या जाहिरनाम्यांत, तें पत्रक तयार केल्याची गोष्ट व त्यांत समावेश केलेल्या जागांच्या हद्दी या लिहिल्या पाहिजेत, आणि त्या पत्रकासंबंधी तपशील (खर्चाच्या व होईल असें वाटणाऱ्या नफ्याच्या पूर्ण अंदाजांसुद्धां) व त्या पत्रकांत समावेश केलेल्या जागेचा नकाशा हे कोणत्याही वाजवी वेळीं कोणत्या जागीं पहावयास मिळतील तें सांगितलें पाहिजे: आणि त्यानें— योजनापत्रक पुरें झाल्यावर काय करावें.

(१) अशा जाहिरनाम्याची एक नकल कार्पोरेशनच्या अध्यक्षाकडे पाठविली पाहिजे, आणि त्या अध्यक्षानें ती पोंहचल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्याआंत बोर्डाकडे, त्या पत्रकासंबंधानें जो कोणताही अर्ज करणें कार्पोरेशनास योग्य वाटेल तो, यांत पुढें ठरविल्याप्रमाणें सरकाराकडे पाठविण्यासाठीं, पाठविला पाहिजे; त्या पत्रकाच्या जाहिरनाम्याची नकल कार्पोरेशनच्या अध्यक्षाकडे पाठविणें.

(२) लागोपाठ तीन आठवडे सदरहू जाहिरनाम्याची एक नकल मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केली पाहिजे. जाहिरनामा प्रसिद्ध करणें.

३६. (१) सदरील शेवटल्या कलमांतील ठरावांप्रमाणें केल्यावर बोर्डानें, सदरहू कलमाअन्वयें आलेल्या कोणत्याहि अर्जाचा विचार करून, आणि ३३ व्या व ३४ व्या कलमाअन्वयें आलेल्या हुकुमांस व ठरावांस विरुद्ध नाहींत असे जे फेरफार करणें त्यास योग्य वाटेल ते फेरफार त्या पत्रकांत दाखल करून, त्या पत्रकास मंजुरी मिळण्यासाठीं सरकारास अर्जी केली पाहिजे. बोर्डानें, जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर, योजनापत्रक सरकाराकडे मंजुरीसाठीं पाठविणें.

(२) मंजुरीबद्दलच्या अर्जाबरोबर खालीं सांगितलेले कागदपत्र असले पाहिजेत, ह्मणजे—

(अ) जे कोणतेहि फेरफार सदर्हू पत्रकांत दाखल केले असतील त्यांबद्दलच्या कारणांसहित, त्या पत्रकाचें पूर्ण तपशिलानिशीं वर्णन;

(ब) पूर्ण प्लान आणि तें पत्रक अमलांत आणण्याच्या खर्चाचे अंदाज;

(क) त्या पत्रकापासून होईल असें वाटणाऱ्या नफ्याचे पूर्ण अंदाज;

(ड) ३१ व्या कलमाअन्वयें आलेला कोणताही अर्ज.

(३) सरकारची मंजूरी मिळाल्यावर, बोर्डानें तें पत्रक अमलांत आणण्याच्या कामास लागलें पाहिजे.

कलम ३३किंवा ३४ याअन्वयें केलेला कोणताही हुकुम किंवा ठराव अमलांत आणल्या कारणानें झालेल्या तोट्याबद्दल सरकार जबाबदार नाहीं.

३७. कलमें ३३ किंवा ३४ याअन्वयें केलेला कोणताही हुकूम किंवा ठराव अमलांत आणला गेल्यामुळें कोणत्याही मनुष्याच्या हितसंबंधास तत्काळ झालेल्या किंवा पुढें होणाऱ्या कोणत्याही तोट्याच्या किंवा नुकसानीच्या संबंधानें, हिंदुस्थान सरकाराकडून किंवा सरकाराकडून कोणताही नुकसानीचा मोबदला मिळण्याचा कोणत्याही मनुष्यास हक्क नाहीं, व नुकसानीच्या मोबदल्याबद्दल त्या सरकारावर कोणताही दावा चालणार नाहीं.

## पोलीसच्या राहण्याच्या सोईसंबंधी योजनापत्रकें.

बोर्डास पोलीसच्या राहण्याच्या सोईसंबंधी योजनापत्रक तयार करण्याचा अधिकार आहे.

३८. (१) शहराच्या पोलीसपैकीं अमुक लोकांस राहण्याकरितां शहराच्या अमुक भागांत सोई करणें जरूर आहे असें बोर्डास सरकाराकडून सूचनापत्र येईल तेव्हां बोर्डानें त्या पत्राचा विचार केला पाहिजे, आणि आपलीं पैसावगैरे साधनें पुरतीं असल्याबद्दल व तसें करणें इतर प्रकारें योग्य असल्याबद्दल आपली खातरी झाली तर बोर्डानें, तशा सोईबद्दल तजवीज करण्यासाठीं एक योजनापत्रक तयार करणें अवश्य आहे अशा मतलबाचा एक ठराव केला पाहिजे, आणि ताबडतोब पोलीसच्या राहण्याच्या सोईसंबंधी तसें पत्रक तयार करावयास लागलें पाहिजे.

पोलीसच्या राहण्याच्या सोईसंबंधी योजनापत्रकांत कोणकोणत्या बाबतींबद्दल तजवीज करणें.

(२) सदरहू पोलीसच्या राहण्याच्या सोईसंबंधी योजनापत्रकांत अशा पोलीसच्या कोणत्याही किंवा सर्व वर्गांकरितां राहण्याचीं घरेंवगैरे व उपघरें (घोड्यांच्या तबेल्यांसुद्धा) बांधण्याबद्दल व तें पत्रक अमलांत आणण्यासाठीं लागणारी कोणतीही जमीन घेण्याबद्दल, उंच करण्याबद्दल व सपाट करण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे.

योजनापत्रक पुरें झाल्यावर काय करावें.

३९. पोलीसच्या राहण्याच्या सोईसंबंधी योजना पत्रक पुरें झाल्यावर, कलमें २७, २८ व २९ यांतील ठराव तें पत्रक सुधारणेसंबंधी योजनापत्रक असतें तर ज्या रीतीनें लागू झाले असते त्याच रीतीनें तें, जरूर असलेल्या सर्व फेरफारांनिशीं, त्यास लागू होतील.

इमारत पुरी होईल तेव्हां ती बोर्डानें पोलीसच्या कारणांकरितां साठ वर्षांच्या मुदतीनें सरकारास पट्ट्यानें देणें.

४०. (१) सदरील शेवटच्या दोन कलमांअन्वयें बांधलेली कोणतीही इमारत सरकारास, पोलीसच्या कारणांसाठीं, ती पुरी झाल्याच्या तारखेपासून साठ वर्षांच्या मुदतीनें, दुरुस्तीपट्ट्यानें दिली पाहिजे, आणि सरकारानें अशा पट्ट्याच्या मुदतींत दरसाल बोर्डास भाड्यादाखल ( हें भाडें शहराच्या पोलीसच्या वार्षिक खर्चाच्या भागादाखल समजणें ) एक रकम दिली पाहिजे, ती अशी कीं तींत खालीं दिलेल्या बाबतींचा समावेश झाला पाहिजे, ह्मणजे—

(अ) त्या इमारतीच्या भांडवलासंबंधी खर्चाबाबतच्या व्याजाचा व सिंकिंग फंडाचा बोजा: हा बोजा, ती इमारत पुरी झाल्याच्या तारखेपूर्वी ९२ व्या कलमाअन्वयें बोर्डानें काढलेल्या शेवटच्या लोनास लागू असलेल्या दरानें आकारणें;

(ब) ती इमारत व तिच्या घरठाणाची जमीन यांच्या संबंधानें बोर्डानें द्याव याच्या सर्व पट्ट्या व कर.

[ ]

(२) या कलमाच्या कारणांसाठीं "इमारतीचा भांडवलासंबंधी खर्च" ह्मणजे खालीं सांगितलेल्या खर्चाइतकी रकम समजली पाहिजे:— "इमारतीचा भांडवलासंबंधी खर्च" याची व्याख्या.

(अ) इमारत बांधण्याचा खर्चः आरंभींचा खर्च आणि ती इमारत बांधण्याच्या मुदतींत व्यवस्था व देखरेख ठेवण्याबद्दल आणि व्याजाच्या व सिंकिंग फंडाच्या बोज्याबद्दल (हा बोजा वर सांगितलेल्या रीतीनें आकारणें) लागणारी रकम यांसुद्धां;

(ब) इमारतीच्या घरठाणाच्या जमिनीचा खर्च.

(३) या कलमाच्या कारणांसाठीं "जमिनीचा खर्च" ह्मणजे खालीं सांगितलेल्या रकमा होत असें समजलें पाहिजे:— "जमिनीचा खर्च" याची व्याख्या.

(अ) जर व जेथवर ती जमीन अशा कारणासाठीं घेतली असेल तर व तेथवर, ती घेण्याचा वास्तविक खर्च;

(ब) जर व जेथवर ती जमीन परिशिष्ट क किंवा ड यांत सांगितलेल्या कोणत्याही जमिनीचा किंवा इ परिशिष्टांत सांगितलेल्या हद्दींच्याआंत नवसाध्य केलेल्या कोणत्याही जमिनीचा भाग असेल तर व तेथवर, कलम ९१ अन्वयें ठरविलेली तिची किंमत: मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशी किंमत बोर्डानें, प्रसंगाप्रमाणें, सरकारास किंवा कार्पोरेशनास दिली पाहिजे, आणि मग ती जमीन सदरहू पट्ट्याच्यां मुदतीपर्यंत बोर्डाकडे जाईल, व त्या जमिनीसंबंधाची बोर्डाचा जबाबदारी, ती जमीन, प्रसंगाप्रमाणें, कलम ६० (७) किंवा कलम ६१ (३) यांतील ठरावांअन्वयें परत घेतलेली किंवा कवज्यांत घेतलेली जमीन असल्याप्रमाणें, बंद होईल.

(४) पट्ट्याची मुदत संपल्यावर सदरहू इमारत व तिच्या घरठाणाची जमीन, शहर पोलीसच्या राहण्याच्या सोईसाठीं कार्पोरेशनकडे जाईल, आणि अशा इमारतीच्या व जमिनीच्या संबंधानें पोलीसच्या वार्षिक खर्चावर भाड्याचा जो बोजा घालावयाचा तो फक्त, अशा इमारतीच्या व जमिनीच्या संबंधानें द्यावयाच्या पट्टया व कर यांसुद्धां त्यांची डागडुजी राखण्यास जो सालिना खर्च येईल तेवढाच घातला पाहिजे. पट्ट्याची मुदत संपल्यावर, इमारत व तिचें घरठाण पोलीसच्या कारणांकरितां कार्पोरेशनकडे जाणें.

## सामान्य.

४१. जेव्हां जेव्हां कोणत्याही सुधारणेसंबंधी किंवा स्ट्रीटसंबंधी योजनापत्रकाअन्वयें, कार्पोरेशनकडे असलेला एकादा विद्यमान सार्वजनिक स्ट्रीट किंवा तशी इतर जमीन सर्वांशीं किंवा अंशतः, जो कोणताही स्ट्रीट बोर्डास बनवावयाचा, बदलावयाचा, रुंद करावयाचा, वळवावयाचा, उंच करावयाचा, पुनः मांडणी करावयाचा किंवा पुनः करावयाचा असेल त्या स्ट्रीटाच्या कोणत्याही भागाच्या जागेंत येत असेल तेव्हां तेव्हां, बोर्डानें कमिशनरास, असा सगळा विद्यमान स्ट्रीट किंवा इतर जमीन अगर त्याचा किंवा तिचा कांहीं भाग (ज्यास यांत पुढें "जरूर असलेला भाग" असें ह्मटलें आहे) वर सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करावयासाठीं स्ट्रीटचा भाग ह्मणून आपणास जरूर आहे अशी नोटीस दिली पाहिजे आणि मग जरूर असलेला भाग, ४९ व्या कलमाचें पोटकलम (२) यांतील ठरावांस पात्र राहून, बोर्डाकडे जाईल: मात्र असें ठरविण्यांत येतें कीं या कलमांतील कोणत्याही ठरावावरून, कोणतीही म्युनिसिपालिटीची मोरी किंवा पाणकाम यांत किंवा यावर म्युनिसिपल आक्टाच्या अनुक्रमें बाबी ९ व १० यांअन्वयें कोणत्याही म्युनिसिपल अधिकाऱ्याच्या असलेल्या हक्कांस किंवा अधिकारांस बाध येतो असें समजूं नये. कार्पोरेशनकडे असलेली व स्ट्रीट बनविण्याकरितां व त्यांत फेरफार करण्याकरितां बोर्डास जरूर असणारी जमीन तात्पुरती बोर्डाकडे जाणें.

४२. म्युनिसिपल आक्टाचीं कलमें २८९ तागाईत ३२९ हीं दोन्हीं धरून) यांतील ठराव, ह्या आक्टाअन्वयें बोर्डाकडे जातील तशा स्ट्रीटांस किंवा त्यांच्या भागांस, ते स्ट्रीट सार्वजनिक व खासगी स्ट्रीटांच्या संबंधानें म्युनिसिपल

अधिकाऱ्यास दिलेले कित्येक अधिकार बोर्डास त्याकडे असलेल्या जमिनीच्या संबंधानें चालवितां येतील.

किंवा भाग याप्रमाणें बोर्डाकडे राहतील त्या मुदतींमध्यें, या आक्टाच्या आशयाशीं मिळते असतील तेथवर, लागू होतील, आणि, या आक्टाच्या कारणांसाठीं सदरहू आक्टाच्या सदरहू कलमांपैकीं कोणत्याही कलमांत सांगितलेले निरनिराळे म्युनिसिपल अधिकारी ह्मणजे, बोर्ड होय असें समजावें, व जे अधिकार व जीं कामें सदरहू कलमांपैकीं कोणत्याही कलमावरून कोणत्याही म्युनिसिपल अधिकाऱ्यानें दुसऱ्या कोणत्याही म्युनिसिपल अधिकाऱ्याच्या मंजुरीनें, हुकुमानें किंवा पसंतीनें किंवा त्यांवांचून चालवावयाचे किंवा करावयाचीं त्यांपैकीं सर्व किंवा कोणतेही अधिकार व कामें, वरीलप्रमाणें बोर्डाकडे गेलेल्या कोणत्याही स्ट्रीटांच्या किंवा स्ट्रीटांच्या भागांच्या संबंधानें चालविण्याचा व करण्याचा फक्त बोर्डासच अखत्यार आहे. सदरहू आक्टाच्या सदरहू कलमांपैकीं कोणत्याही कलमांत येणाऱ्या "म्युनिसिपल अमलदार किंवा नोकर" या संज्ञेचा अर्थ, बोर्डाचा अमलदार किंवा नोकर असा समजावा.

बोर्डाकडे गेलेल्या जमिनींतील ग्यासच्या नळ्यांबाबत त्याचे अधिकार व जबाबदारी.

४३. म्युनिसिपल आक्टाच्या ३३४ व्या कलमांतील ठराव, ह्या आक्टाअन्वयें बोर्डाकडे जातील तशा कोणत्याही स्ट्रीटांस किंवा त्यांच्या भागांस, ते स्ट्रीट किंवा ते भाग याप्रमाणें बोर्डाकडे राहतील त्या मुदतींमध्यें, ह्या आक्टाच्या आशयाशीं मिळते असतील तेथवर, लागू होतील, आणि, ह्या आक्टाच्या कारणांसाठीं, म्युनिसिपल आक्टाच्या सदरहू कलमांत येणाऱ्या "कमिशनर" ह्या संज्ञेचा अर्थ, बोर्ड असा समजावा, व सदरीं सांगितलेल्या मुदतींमध्यें त्यानेंच फक्त, जे अधिकार व जीं कामें सदरहू आक्टाच्या सदरहू कलमांअन्वयें कमिशनरानें चालवावयाचे किंवा करावयाचीं त्यांपैकीं सर्व किंवा कोणतेही अधिकार व कामें चालविले पाहिजेत व केलीं पाहिजेत; आणि "म्युनिसिपल फंड" या संज्ञेचा अर्थ बोर्डाचें फंड असा समजावा.

सन १८७४चा मुंबईचा ट्रामवेबाबत आक्ट यावरून म्युनिसिपल अधिकाऱ्यांस दिलेले कित्येक अधिकार बोर्डास त्याकडे आलेल्या जमिनीच्या संबंधानें चालवितां येतील.

४४. सन १८७४ चा मुंबईचा ट्रामवेबाबत आक्ट याचीं कलमें २, ४, १०, ११, १२, १३, १४, १९, २७, २८ व २९, यांतील ठराव, ह्या आक्टाअन्वयें बोर्डाकडे जातील तशा सार्वजनिक स्ट्रीटांस किंवा त्यांच्या भागांस, ते स्ट्रीट किंवा भाग याप्रमाणें बोर्डाकडे राहतील त्या मुदतींमध्यें, ह्या आक्टाच्या आशयाशीं मिळते असतील तेथवर, लागू होतील, आणि, या आक्टाच्या कारणांसाठीं, सदरहू आक्टाच्या सदरहू कलमांपैकीं कोणत्याही कलमांत येणाऱ्या "म्युनिसिपल कमिशनर," "कमिशनर" व "कार्पोरेशन" या प्रत्येक संज्ञेचा अर्थ, बोर्ड असा समजावा, आणि "सदरहू कार्पोरेशनचा एक्झिक्यूटिव एंजिनियर" व "एक्झिक्यूटिव एंजिनियर" या प्रत्येक संज्ञेचा अर्थ, बोर्डाचा एंजिनियर असा समजावा.

नवीन स्ट्रीटांची कमींत कमी रुंदी.

४५. (१) कोणताही नवीन स्ट्रीट गाड्यांच्या राहदारीसाठीं केला असल्यास तो ४० फुटांहून, व फक्त पायरस्त्याच्याच राहदारीसाठीं केला असल्यास तो २० फुटांहून, कमी रुंद असतां कामा नये:

स्ट्रीटच्या एका किंवा दोन्ही बाजूंस बगीचाच्या किंवा खुल्या जागा राखल्या असतील त्या प्रसंगीं विशेष ठराव.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, एखाद्या सुधारणेसंबंधी किंवा स्ट्रीटसंबंधी किंवा जमीन नवसाध्य करण्यासंबंधी योजनापत्रकांत किंवा इतर प्रकारें, जेथें जेथें एखाद्या स्ट्रीटच्या थेट सगळ्या लांबीपर्यंत त्याच्या एका किंवा दोन्हीं बाजूंस बगीच्याची किंवा खुली जागा ठेवण्याबद्दल तजवीज, अशा जागेवर इमारती वगैरे कांहीं बांधतां येऊं नये अशा शर्तीनिशीं केली असून, अशा बगीच्याच्या किंवा खुल्या जागेसुद्धां त्या स्ट्रीटच्या समोरासमोरील बाजूंच्या इमारतींच्या दरम्यानची एकंदर जागा ४० फुटांहून कमी नसेल, तेथें तेथें अशा इमारतींच्या दरम्यानचा स्ट्रीट गाड्यांच्या राहदारीसाठीं केलेला असल्यास तो २० फुटांहून जास्त रुंद असण्याची गरज नाहीं, परंतु तो त्याहून कमी रुंद असतां कामा नये व फक्त पायरस्त्याच्याच राहदारीसाठीं केलेला असल्यास तो १० फुटांहून जास्त रुंद असण्याची गरज नाहीं, परंतु तो त्याहून कमी रुंद असतां कामा नये.

(२) बोर्डानें बनविलेला कोणताही स्ट्रीट, सरकारानें मंजूर केलेल्या कोणत्याही योजनापत्रकाच्या प्लानांमध्यें ठरविलेल्या रीतीनें योग्य प्रकारें सपाट केला आहे, त्याला फ़रसबंदी केली आहे, खडी घातली आहे, लाद्या बसविल्या आहेत, पाट केलेले आहेत, त्यांतील पाणी काढून लाविलें आहे, व त्यास गटर केले आहेत अशी, आणि त्यांत दिवे लावण्याकरितां आपल्या मतें जरूर असणाऱ्या आणि बोर्डानें पुरवावयाच्या फाणसांची, फाणसांच्या खांबांची व इतर सामानाची बोर्डानें तजवीज केली आहे अशी कमिशनराची खातरी झाल्यावर, त्यानें तो स्ट्रीट सार्वजनिक स्ट्रीट आहे असें ठरविलें पाहिजे आणि मग तो स्ट्रीट कार्पोरेशनाकडे, प्रसंगाप्रमाणें, जाईल किंवा पुनः जाईल व त्या वेळापासून पुढें कार्पोरेशननें त्याची डागडुजी ठेवून दुरुस्ती केली पाहिजे, त्यांत दिवे लावले पाहिजेत व तो साफ राखला पाहिजे.

स्ट्रीट पुरे झाल्यावर ते कार्पोरेशनकडे जाणें व त्यानें त्याची डागडुजी ठेवणें.

(३) शहराच्या कोणत्याही भागांत हवा खेळण्यासाठीं राखलेली व या बाबी-अन्वयें मंजूर केलेल्या कोणत्याही योजनापत्रकाच्या भागादाखल बोर्डानें धरलेली कोणतीही खुली जागा तयार झाल्यावर, कार्पोरेशनच्या खर्चानें तिची डागडुजी ठेविली जाण्यासाठीं कमिशनराकडे तबदील करून दिली पाहिजे, आणि मग ती कार्पोरेशनकडे राहील : मात्र असें ठरविण्यांत येतें कीं कमिशनरानें, जरूर असल्यास, अशी कोणतीही खुली जागा सदरहूप्रमाणें तबदील करून देण्यांत येण्यापूर्वी कुडण्याविषयीं, आणि जरूर असल्यास त्या जागेंत दिवे लावण्याकरितां फाणसांची किंवा इतर सामानाची तजवीज करण्याविषयीं बोर्डास सांगावें.

हवा खेळण्यासाठीं राखलेल्या खुल्या जागा कार्पोरेशनकडे जाणें व त्यानें त्यांची डागडुजी ठेवणें.

(४) या कलमांतील कोणत्याही ठरावाच्या संबंधानें बोर्ड व कमिशनर यांच्या दरम्यान कोणतीही तकरार उत्पन्न झाल्यास तिचा निकाल सरकारानें केला पाहिजे, व तो निकाल अखेरचा आहे असें समजलें पाहिजे.

या कलमाखालील तकरारींचा निकाल सरकारानें करणें.

## जमीन घेणें.

४६. या आक्टांतील ठरावांस पात्र राहून बोर्डास, या आक्टाच्या कारणांसाठीं बोर्डाला गरज असलेल्या कोणत्याही जमिनींच्या किंवा जमिनींतील कोणत्याही हितसंबंधाच्या मालकांशीं, किंवा याप्रमाणें गरज असलेल्या जमिनीचा भाग असणाऱ्या कोणत्याही स्ट्रीटवर जो कोणताही हक्क कायदे करणाऱ्या मंडळीनें केलेल्या कायद्यावरून उत्पन्न झालेला असेल त्या हक्काच्या मालकांशीं, अशी जमीन किंवा अशा जमिनींतील कोणताही हितसंबंध खरीद करण्याकरितां, अगर अशा कोणत्याही हक्काच्या मालकांस तो हक्क कोणत्याही प्रसंगीं काढून घेतल्याबाबत किंवा त्यास तोशीस पोंहचल्याबाबत नुकसानीचा मोबदला देण्याकरितां कबुलायत करण्याचा अधिकार आहे असें समजावें.

बोर्डास कबुलायतीनें जमीन घेण्याचा अधिकार आहे.

४७. सन १८९४ चा जमीन घेण्याविषयींचा आक्ट (यास या व लगत पुढच्या कलमांत "सदरहू आक्ट" असें ह्मटलें आहे) यांत कसाही ठराव असला तथापि, सदरहू आक्ट, या आक्टाअन्वयें जमीन घेण्याच्या बाबतीस, अ परिशिष्टांत सांगितलें आहे त्याहून जास्त लागू होणार नाहीं, परंतु कबुलायतीखेरीज इतर रीतीनें जमीन घेण्याच्या बाबतीचें नियमन सदरहू परिशिष्टांत सांगितलें आहे तेथवर सदरहू आक्टाप्रमाणें झालें पाहिजे व तो तेथवर त्या बाबतीस लागू होईल, आणि त्या कारणासाठीं तो, या बाबींत सामील केला असल्याप्रमाणेंच या बाबींतील ठरावांस पात्र राहून, तिचा भाग आहे असें समजलें पाहिजे, आणि तो खालील ठरावांसही पात्र राहील. ते ठराव येणेंप्रमाणें :—

जमीन घेण्याविषयींचा आक्ट, कबुलायतीखेरीज इतर रीतीनें जमीन घेण्याच्या बाबतीस कोठपर्यंत लागू होईल.

(१) सदरहू आक्टाच्या कोणत्याही कलमावर दिलेला हवाला, तें कलम या बाबींतील ठरावांवरून फिरविल्याप्रमाणें त्यावर दिला आहे असें समजलें पाहिजे, आणि जमीन ह्या संज्ञेचा सदरहू आक्टांत उपयोग केला आहे त्याप्रमाणें त्या संज्ञेमध्यें, तींत सदरहू आक्टाच्या ३ ऱ्या कलमाची रकम (अ) अन्वयें ज्या अर्थाचा समावेश केला आहे त्या

अर्थाखेरीज आणखी, या आक्टाच्या कारणांसाठीं, कायदे करणाऱ्या मंडळीनें केलेल्या कायद्यावरून कोणत्याही स्ट्रीटवर उत्पन्न झालेल्या हक्कांचा समावेश होतो असें समजलें पाहिजे; आणि सदरहू आक्टाच्या ३ ऱ्या कलमाची रकम (ब) ही, या आक्टाच्या कारणांसाठीं, "हित-संबंध असेल तर" या शब्दांनंतर "किंवा जर तो मनुष्य त्या जमिनीचा भाग असणाऱ्या कोणत्याही स्ट्रीटवर जो कोणताही हक्क कायदे करणाऱ्या मंडळीनें केलेल्या कायद्यावरून उत्पन्न झालेला असेल त्या हक्काचा मालक असेल तर" हे शब्द वाढविले आहेत असें समजून, वाचली पाहिजे.

(२) सदरहू आक्टाच्या ४ थ्या कलमाचें पोटकलम (२) व या बाबींतील ठराव यांचा अर्थ करतेवेळीं, सदरहू पोटकलमांतील ठराव, या आक्टाच्या कारणांसाठीं, कलम २३, ३० किंवा ३८ याअन्वयें ठराव करण्यांत आला ह्मणजे लगेच लागू होतात असें समजलें पाहिजे, आणि "स्थानिक सरकार" या संज्ञेंत बोर्डाचा समावेश होतो असें समजलें पाहिजे, आणि "सदरहू प्रदेश" या शब्दांचा अर्थ, अशा कोणत्याही ठरावांत सांगितलेला प्रदेश असा समजला पाहिजे.

(३) या बाबीचा भाग आहेत असें मानलेलीं सदरहू आक्टाचीं कलमें व या बाबींतील ठराव यांचा अर्थ करतेवेळीं, कलम २९, ३२ किंवा ३९ याअन्वयें ठराव प्रसिद्ध करणें हें सदरहू आक्टाच्या ६ व्या कलमाअन्वयें ठराव प्रसिद्ध करणें आहे असें समजलें पाहिजे.

(४) सदरहू आक्टाचें कलम ९०, पोटकलम (२), व या बाबींतील ठराव यांचा अर्थ करतेवेळीं बोर्ड हा, संबंध असलेला स्थानिक अधिकारी किंवा कंपनी आहे असें समजलें पाहिजे.

कोर्टाचीं कामें करण्यासाठीं अपिलाची न्यायसभा स्थापणें.

४८. (१) या बाबीच्या कारणांसाठीं सदरहू आक्टाअन्वयेंच्या कोर्टाचीं कामें करण्यासाठीं यांत पुढें सांगितलेल्या रीतीनें एका अपिलाच्या न्यायसभेची (हीस यांत पुढें न्यायसभा असें ह्मटलें आहे) रचना केली पाहिजे, आणि सदरहू आक्टाचा व या बाबींतील ठरावांचा अर्थ करतेवेळीं ती न्यायसभा ही तें कोर्ट आहे असें समजलें पाहिजे, आणि त्या न्यायसभेचा निवाडा किंवा, मतभेदाच्या प्रसंगीं, त्या न्यायसभेच्या बहुमतानें झालेला निवाडा, त्या कोर्टाचा निवाडा आहे असें समजलें पाहिजे, आणि तो, यांत पुढें दिलेल्या अपिलाबद्दलच्या ठरावांस पात्र राहून, अखेरचा आहे असें व त्या न्यायसभेचा अध्यक्ष हा त्या कोर्टाच्या जज्जादाखल आहे असें समजलें पाहिजे.

कायदा व काम चालविण्याची रीति यांबाबतच्या प्रश्नाचा निकाल अध्यक्षानें करणें.

(२) कायदा व काम चालविण्याची रीति यांबाबतच्या सर्व प्रश्नांचा निकाल करण्याचें काम प्रत्येक बाबतींत फक्त अध्यक्षाकडेच राहील.

न्यायसभेची रचना.

(३) अशा न्यायसभेंत तीन सभासद, ह्मणजे एक अध्यक्ष आणि दोन असेसर असे असले, पाहिजेत. अध्यक्ष व असेसरांपैकीं एक यांना सरकारानें मुंबई सरकारी गॅझेटांत जाहीरनामा प्रसिद्ध करून नेमिलें पाहिजे; दुसऱ्या असेसरास कार्पोरेशननें नेमिलें पाहिजे: मात्र जो कोणताही मनुष्य या आक्टाअन्वयें ट्रस्टी असेल, किंवा जो १४ व्या कलमांतील ठरावांत सांगितलेल्या कारणावरून, ट्रस्टी असण्यास नालायक झाला असेल तो सदरहू न्यायसभेचा सभासद होण्यास नालायक होईल.

अध्यक्ष पसंत करणें.

(४) सदरहू अध्यक्ष—

(अ) इंपीरियल व प्राव्हिन्शियल सिव्हिल सर्व्हिसच्या न्यायशाखेपैकीं ज्या असामीच्या नोकरीची मुदत निदान दहा वर्षें भरलेली असेल व ज्यांनीं त्या मुदतीपैकीं निदान तीन वर्षेंपर्यंत डिस्ट्रिक्ट जज्जाचें काम केलें

असेल, किंवा ज्यांनीं निदान तीन वर्षेपर्यंत पाहिल्या वर्गाच्या सबार्डि-
नेट जज्जाच्या किंवा प्रेसिडेन्सी स्मॉल कॉज कोर्टाच्या चीफ जज्जाच्या
हुद्याहून कमी नसणाऱ्या न्यायाच्या हुद्याचें काम केलेलें असेल तो असामी,

(ब) ज्यांनीं निदान आठ वर्षेपर्यंत वकिलीचें काम केलेलें आहे असे मुंबई
हैं कोर्टाचे वकिली करणारे बारिस्टर, आड्व्होकेट किंवा प्लीडर,
यांतून पसंत केला पाहिजे.

(५) न्यायसभेच्या सभासदांना एका वर्षाच्या मुदतीसाठीं नेमलें पाहिजे, आणि असा कोणताही सभासद पुनः नेमला जाण्यास लायक आहे. हुद्याची मुदत.

(६) न्यायसभेच्या कोणत्याही सभासदास, तो असमर्थ असल्यामुळें, किंवा त्याच्या गैरवर्तणुकीमुळें, किंवा दुसऱ्या चांगल्या व पुरत्या कारणामुळें दूर करणें सरकारास योग्य वाटल्यास तसें करण्याचा त्यास अधिकार आहे. सभासदास दूर करणें.

(७) न्यायसभेंत कोणतीही जागा रिकामी झाली असतां, किंवा तिचा कोणताही सभासद अजारीपणामुळें किंवा दुसऱ्या अनिवार्य कारणामुळें थोडा वेळपर्यंत गैरहजर राहिला असेल त्या मुद्दतींत, प्रसंगाप्रमाणें, सरकार किंवा कार्पोरेशन यांपैकीं ज्या कोणीं, त्या न्यायसभेच्या ज्या सभासदाची जागा रिकामी झाली असेल त्यास नेमलें होतें त्यानें तात्बडतोब, ज्याची जागा रिकामी झाली असेल किंवा जो सदरीं सांगितल्या प्रमाणें थोडावेळपर्यंत गैरहजर असेल त्या सभासदाच्या जागीं त्या न्यायसभेचा (थोड्या वेळापुरता किंवा कायमचा) सभासद कोणा योग्य मनुष्यास नेमिलें पाहिजे. रिकाम्या जागा भरणें.

(८) न्यायसभेच्या प्रत्येक सभासदास, सरकार वेळोवेळीं ठरवील त्याप्रमाणें, माही पगारादाखल किंवा फीदाखल, अगर यापैकीं अंशतः एका रीतीनें व अंशतः दुसऱ्या रीतीनें मुशाहिरा मिळण्याचा हक्क आहे असें समजावें. सभासदाचा मुशाहिरा.

(९) पोटकलम (८) ह्यांत सांगितलेला मुशाहिरा, व जीं कोणतींही कारकुनांचीं किंवा इतर विशेष एस्टाब्लिशमेंटें जरूर होतील त्यांचा खर्च बोर्डानें दिला पाहिजे. न्यायसभेचा खर्च बोर्डानें देणें.

(१०) न्यायसभेचा कोणताही निवाडा किंवा हुकुम स्मॉल कॉज कोर्टानें, तो त्या कोर्टाचा हुकुमनामा किंवा हुकुम असल्याप्रमाणें, अमलांत आणला पाहिजे. न्यायसभेचा निकाल अमलांत आणणें.

(११) ज्या बाबतींत अपील होणें योग्य आहे असें अध्यक्षानें सर्टिफिकिट दिलें असेल तशा कोणत्याही बाबतींत, न्यायसभेच्या निवाड्यावर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर हैं कोर्टाकडे अपील चालेल. कित्येक बाबतींत न्यायसभेच्या निकालावर हैं कोर्टास अपील.

(१२) सरकारच्या मंजुरीस पात्र राहून, न्यायसभेच्या अध्यक्षास पुढीलप्रमाणें अधिकार असेल:— सरकारच्या मंजुरीनें नेमणुका व कानू करण्याचा अध्यक्षाचा अधिकार.

(अ) न्यायसभेचें काम चालविण्याकरितां जरूर असतील तसे कारकून व इतर अमलदार किंवा नोकर नेमण्याचा आणि त्यांचे पगार ठरविण्याचा (हे पगार त्याप्रमाणें बोर्डानें दिले पाहिजेत): आणि

(ब) न्यायसभेचें काम चालविण्याकरितां कानू करण्याचा: मात्र असे कानू दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्याच्या ठरावांस प्रतिकूळ असूं नयेत; आणि अशा कानूंस सरकारची मंजुरी मिळाल्यावर ते अमलांत येतील.

४९. या आक्टाअन्वयें घेतलेल्या कोणत्याही जमिनीबद्दल किंवा इमारतीबद्दल द्यावयाच्या नुकसानीच्या मोबदल्याची रकम ठरवितेवेळीं, खालीं दिलेले जादा ठराव लागू होतील :— नुकसानीच्या मोबदल्याच्या संबंधानें विशेष ठराव.

(१) ती जमीन घेतल्यामुळें किंवा ती इमारत घेतल्यामुळें, तींत फेरफार केल्यामुळें किंवा ती पाडल्यामुळें, हितसंबंध असलेल्या मनुष्याच्या

दुसऱ्या कोणत्याही जमिनीची किंवा इमारतीची किंमत कांहीं वाढण्यासारखी आहे किंवा कसें या गोष्टीचा कोर्टानें विचार केला पाहिजे.

(२) त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधाचा जाहीरनामा २७ व्या, ३२ व्या किंवा ३९ व्या कलमाअन्वयें प्रसिद्ध केल्याच्या तारखेनंतर ती जमीन किंवा इमारत कोणत्याही प्रकारें वाढविली असेल किंवा सुधारली असेल तेव्हां अशा वाढीचा किंवा सुधारणेचा समावेश (ती, ती इमारत योग्य रीतीनें दुरुस्त राखण्यासाठीं करणें जरूर झालें नसेल तर), तसेंच सदरहू तारखेनंतर संपादिलेल्या कोणत्याही हितसंबंधाच्या बाबतींत त्याच्या किंमतीचा कोणताही निराळा अंदाज, त्या जमिनीबद्दल किंवा इमारतीबद्दल द्यावयाच्या नुकसानीच्या मोबदल्याची रकम वाढे अशा रीतीनें, करतां कामा नये.

(३) २९ व्या, ३२ व्या किंवा ३९ व्या कलमाअन्वयें त्या इमारतीच्या संबंधाचा ठराव प्रसिद्ध करण्याच्या तारखेरोजीं असणाऱ्या तिच्या बाजारकिंमतीचा अंदाज करतेवेळीं कोर्टानें, त्या मिळकतीचें स्वरूप व तिची त्या वेळची स्थिती, आणि ती इमारत विद्यमान स्थितींत किती काळपर्यंत टिकण्याचा संभव दिसतो तें यांकडे, आणि ती कितपत दुरुस्त आहे याकडे व या कलमाचीं पोटकलमें (४), (५) व (६) यांतील ठरावांकडे योग्य लक्ष पुरविलें पाहिजे.

(४) त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकानें, हा आक्ट ठरल्यानंतर व २७ व्या, ३२ व्या किंवा ३९ व्या कलमाअन्वयें त्या जमिनीसंबंधाचा किंवा इमारतीसंबंधाचा जाहीरनामा प्रसिद्ध केल्याच्या तारखेपूर्वींच्या चोवीस महिन्यांच्या आंत, म्युनिसिपल आक्टाच्या १९५ व्या कलमाअन्वयें, त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या भाड्याचा तक्ता करून दिलेला असेल तेव्हां, त्या जमिनीचें किंवा इमारतीचें भाडें अशा कोणत्याही प्रसंगीं, कोर्ट इतर प्रकारें फर्मावील तें खेरीज करून; याप्रमाणें दिलेल्या अगदीं शेवटच्या तक्त्यांत दाखविलेल्या भाड्यापेक्षां जास्त आहे असें मानतां कामा नयेः मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा अगदीं शेवटच्या तक्त्याच्या तारखेनंतर व त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधाचा जाहिरनामा २७ व्या, ३२ व्या किंवा ३९ व्या कलमाअन्वयें प्रसिद्ध केल्याच्या तारखेपूर्वीं ती जमीन किंवा इमारत कोणत्याही प्रकारें वाढविली किंवा सुधारली असेल तेव्हां कोर्टास, अशा वाढीमुळें किंवा सुधारणेमुळें त्या जमिनीची भाड्याच्या संबंधानें किंमत कांहीं वाढली आहे किंवा कसें या गोष्टीचा विचार करण्याचा अखत्यार आहे.

(५) ती जमीन किंवा इमारत एकाद्या गैरकायदेशीर कारणासाठीं वापरण्यांत येत असल्याच्या, किंवा तींत राहणाऱ्या मनुष्यांच्या आरोग्यास धोका पोंहचे किंवा अपाय होई अशा प्रकारें तींत फाजील गर्दी झालेली असल्याच्या कारणानें तिचें भाडें वाढलेलें आहे असें कोर्टास वाटल्यास, तिचें भाडें, ती जमीन किंवा इमारत फक्त कायदेशीर कारणांसाठीं वापरली असती, किंवा तींत फाजील गर्दी न होतां निर्धास्तपणें जितक्या माणसांनीं राहण्याची सोई असेल तितकींच फक्त माणसें तींत राहिलीं असतीं तर जें भाडें मिळालें असतें, त्याहून जास्त आहे असें मानतां कामा नये.

(६) त्या इमारतीची आरोग्यरक्षणसंबंधी स्थिति असावी तशी नाहीं किंवा ती इमारत वाजवी रीतीनें चांगली दुरुस्त नाहीं असें कोर्टास वाटल्यास नुकसानीच्या मोबदल्याची रकम, ती इमारत आरोग्यरक्षणाच्या स्थितींत आणली असतां किंवा वाजवी रीतीनें चांगली दुरुस्त केली असतां होणाऱ्या तिच्या किंमतीच्या अंदाजांतून ती इमारत सदरहू स्थितींत आणण्याचा किंवा सदरहू प्रमाणें दुरुस्त करण्याचा अंदाजलेला खर्च कमी करून राहिलेल्या रकमेहून जास्त असतां कामा नये.

(७) जी इमारत मनुष्यवस्तीसाठीं वापरण्यांत येत असेल किंवा वापरण्याचा इरादा अगर संभव असेल ती इमारत् मनुष्यवस्तीसाठीं वाजवी रीतीनें योग्य करतां येण्यासारखी नाहीं असें कोर्टास वाटल्यास, नुकसानीच्या मोबदल्याची रकम, तिच्या सामानाच्या किंमतींतून ती इमारत पाडून टाकण्याचा खर्च वजा करून बाकी राहिलेल्या रकमेहून जास्त असतां कामा नये.

९०. कलेक्टर, सन १८९४ च्या जमीन घेण्याविषयींच्या आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें व या बाबींतील ठरावांअन्वयें निवाडा करील तेव्हां त्यास जमिनीचा कबजा घेण्याचा अधिकार आहे, आणि मग त्या जमिनीवर कोणताच बोजा न राहातां ती पूर्णपणें मलिका साआझमांकडे जाईल, आणि कलेक्टरानें, ती घेण्याचा खर्च देण्यांत आल्यावर व ती घेण्याबद्दल जो कोणताही जास्त खर्च होईल तो देण्याचें बोर्डानें कबूल केल्यावर, ती बोर्डास तबदील करून दिली पाहिजे, आणि मग ती बोर्डाकडे राहील. कलेक्टरानें निवाडा दिल्यानंतर जमीन कबज्यांत घेणें व ती बोर्डाकडे तबदील करून देणें.

## बोर्डापासून जमिनी परत घेणें.

९१. (१) जिच्या संबंधानें बोर्डानें कोणतेंही भांडवलासंबंधी कर्ज काढलेलें नसेल तशा जमिनीखेरीज इतर क किंवा ड परिशिष्टांत सांगितलेली कोणतीही जमीन कलम ६० (७) याअन्वयें परत घेण्यांत येईल तेव्हां तेव्हां याप्रमाणें परत घेतलेल्या जमिनीची किंमत कलेक्टरानें ठरविली पाहिजे व त्यानें खालील गोष्टींचा विचार केला पाहिजे. त्या गोष्टी येणेंप्रमाणें :— कलम ६०, पोट कलम (७), याअन्वयें परत घेतलेल्या जमिनीची किंमत कलेक्टरानें ठरविणें.

(अ) ती जमीन ज्या प्लाटचा भाग असेल त्याची (सदरील परिशिष्टांत दाखविलेली किंमत.

(ब) त्या प्लाटची साधारण योग्यता सुधारण्याच्या कामीं बोर्डानें कोणताही खर्च केला असल्यास त्याची रकम.

(क) अशा जमिनीचा, ती ज्या प्लाटचा भाग असेल त्यांतील बाकी जमिनीशीं, क्षेत्रफळाच्या आणि फ्रन्टेजच्या व जमिनीच्या किंमतीबाबतच्या इतर मान्य अशा गोष्टींच्या संबंधानें, संबंध.

(२) इ परिशिष्टांत सांगितलेल्या हद्दींच्या आंत नवसाध्य केलेल्या जागेचा भाग असणारी कोणतीही जमीन कलम ६१ (३) याअन्वयें कबज्यांत घेण्यांत येईल, तेव्हां तेव्हां त्या जमिनीची किंमत कलेक्टरानें ठरविली पाहिजे व त्यानें खालील गोष्टींचा विचार केला पाहिजे. त्या गोष्टी येणेंप्रमाणे :— कलम ६१, पोट कलम (३), याअन्वयें कबज्यांत घेतलेल्या जमिनीची किंमत कलेक्टरानें ठरविणें.

(अ) ती जागा नवसाध्य करण्याचा कलम ७१ (२) यांत व्याख्या केल्याप्रमाणें खर्च.

(ब) अशा जमिनीचा, नवसाध्य केलेल्या जागेंतील बाकी जमिनीशीं, क्षेत्रफळाच्या आणि फ्रन्टेजच्या व जमिनीच्या किंमतीबाबतच्या इतर मान्य अशा गोष्टींच्या संबंधानें, संबंध.

न्यायसभेकडे अपील करण्याबद्दल ठराव.

(३) या कलमाअन्वयें कलेक्टरानें केलेल्या ठरावावर अपील न्यायसभेकडे चालेल.

## बाब ४.—कर्ज काढण्याचे अधिकार.

सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांकडून किंवा इतर मनुष्यांकडून कर्ज काढण्याचा अधिकार.

९२. बोर्डास वेळोवेळीं, सेक्रेटरी ऑफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांजकडून किंवा हिंदुस्थान सरकारची पूर्वी मंजुरी घेऊन कोणत्याही इतर मनुष्याकडून, हा आक्ट अमलांत आणण्याच्या कामीं बोर्डानें केलेला किंवा करावयाचा कोणताही खर्च अगर बोजा अदा करण्याच्या कारणासाठीं जरूर असलेली, ७९ व्या कलमाअन्वयें भांडवलाच्या खातीं दाखल करण्याजोगी खर्चाच्या बाजूची कोणतीही शिल्लक असेल तिच्यासुद्धां, कोणतीही रकम व्याजानें काढण्याचा, पुनः काढण्याचा व घेण्याचा अधिकार आहे.

इतर मनुष्यांकडून पैसा कोणत्या रीतीनें कर्जी काढावा तें सरकारानें फर्मावणें.

९३. सदरील शेवटच्या कलमाअन्वयें सेक्रेटरी ऑफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांखेरीज इतर कोणत्याही मनुष्याकडून बोर्डानें पैसा काढण्याकरितां हिंदुस्थान सरकारची मंजुरी मिळाली असेल तेव्हां तेव्हां सरकारानें, हिंदुस्थान सरकारची पूर्वी संमति घेऊन, तो पैसा कोणत्या रीतीनें काढावयाचा ती रीत फर्माविली व नेमून दिली पाहिजे.

डिबेंचरांच्या द्वारें काढलेल्या लोनावरील व्याजाचा बोजा, सेक्रेटरी ऑफ् स्टेट किंवा कार्पोरेशन यांना येणें असलेल्या व्याजाच्या अगोदरचा समजणें.

९४. जर असा पैसा व्याजी डिबेंचरांवर काढला असेल तर बोर्डाच्या महसुलावर अशा व्याजाचा बोजा, ६८ व्या कलमाअन्वयें सेक्रेटरी ऑफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांला व कार्पोरेशनाला द्यावयाच्या व्याजाबद्दलच्या बोजाच्या अगोदरचा समजला पाहिजे.

कर्जी काढलेला पैसा फेडण्यासाठीं सिंकिंग फंडाबद्दल तजवीज.

९५. (१) बोर्डानें, वरील कलमांमधील ठरावांअन्वयें कर्जी काढलेला पैसा, मुद्दलाच्या किंवा मुद्दल व व्याज यांच्या वार्षिक किंवा साहामाही सारख्या हप्त्यांनीं फेडला पाहिजे, अगर जेवढी रकम किंवा जेवढ्या रकमा चक्रवाढ व्याजानें सांचवीत गेलें असतां, सर्व प्रकारचे खर्च भागून, मंजूर झालेल्या मुदतीच्या आंत, सदरहूप्रमाणें कर्जी काढलेला पैसा फेडण्यास पुरी होईल किंवा पुऱ्या होतील तेवढी रकम किंवा तेवढ्या रकमा त्यानें, सिंकिंग फंडादाखल, दरसाल निराळा ठेविली पाहिजे किंवा निराळ्या ठेविल्या पाहिजेत व त्या रकमेच्या किंवा रकमांच्या पब्लिक सिक्युरिटी खरीद करून ती किंवा त्या चक्रवाढ व्याजानें सांचविल्या पाहिजेत.

(२) जे कोणतेही सिंकिंग फंड पब्लिक सिक्युरिटींमध्यें व्याजीं लावण्याविषयीं बोर्डास ह्या आक्टांत फर्माविलें आहे किंवा अधिकार दिला आहे त्या फंडांच्या संबंधानें, आणि जो कोणताही फाजील पैसा तशाच सिक्युरिटींमध्यें व्याजीं लावण्याविषयीं बोर्डास ह्या आक्टांत अधिकार दिला आहे त्या पैशाच्या संबंधानें, बोर्डानें, जें कोणतेंही लोन काढण्याकरितां ९२ व्या कलमाअन्वयें हिंदुस्थान सरकारची मंजुरी योग्य रीतीनें मिळविण्यांत येईल त्या लोनाबद्दल काढावयाचे कोणतेही डिबेंचर, सदरील प्रकारचा कोणताही ऐवज व्याजीं लावण्याच्या कारणांकरितां निराळे राखून ठेवणें कायदेशीर होईल, मात्र असे डिबेंचर याप्रमाणें निराळे राखून ठेवण्याचा इरादा सदरहू लोन काढण्याच्या शर्तीदाखल जाहीर केला पाहिजे.

(३) असे कोणतेही डिबेंचर, "मुंबई शहर सुधारण्यासाठीं ट्रस्टी" यांस प्रत्यक्ष व यांच्या नांवीं काढून दिल्यानें तें बुडतील किंवा रद्द होतील असें नाहीं, तर याप्रमाणें काढलेला दरेक डिबेंचर दुसऱ्या कोणत्याही मनुष्यास व त्याच्या नांवीं काढून दिलेला असल्याप्रमाणेंच सर्वप्रकारें कायदेशीर होईल.

(४) बोर्डानें काढलेला कोणताही डिबेंचर बोर्डानें खरीद केल्यानें, किंवा त्याकडे तबदील करून, सोंपून किंवा शेरा लिहून दिल्यानें, असा कोणताही डिबेंचर बुडेल किंवा रद्द होईल असें नाहीं, तर तो दुसऱ्या कोणत्याही मनुष्यानें धारण केला असता

किंवा त्याकडे तो तबदील करून, सोंपून किंवा शेरा लिहून दिला असता तर तो ज्या रीतीनें व जितक्या अंशीं कायदेशीर व बेचनी झाला असता त्याच रीतीनें व तितक्याच अंशीं तो कायदेशीर व बेचनी होईल.

९६. सिंकिंग फंडाच्या मुदलाच्या भागादाखल निराळी ठेवलेली कोणतीही रकम प्रत्येक वर्षास किंवा प्रत्येक साहामाहीस व्याजीं लावणें ती, ज्या लोनाच्या फेडीसाठीं असा फंड स्थापन केला असेल त्या लोनाच्या संबंधानें बोर्डानें ज्या दिवशीं व्याज द्यावयाचें, त्या दिवसानंतर पंधरा दिवसांच्या आंत लाविली पाहिजे; आणि आधींच व्याजीं लाविलेल्या सिंकिंग फंडाचा भाग असणाऱ्या पैक्यावरील व्याजाबद्दल बोर्डास आलेली कोणतीही रकम, तें व्याज मिळालेल्या दिवसापासून एका महिन्याच्या आंत व्याजीं लाविली पाहिजे. सिंकिंग फंड पब्लिक सिक्यूरिटींमध्यें व्याजीं लावण्यासाठीं ठरविलेल्या तारखा.

९७. हिंदुस्थान सरकारची पूर्वी मंजुरी घेतली असल्यावांचून,— लोनाची मुदत कोठपर्यंत असावयाची तें.

(१) कोणतेंही लोन फेडण्याची मुदत साठ वर्षांहून जास्त असूं नये, आणि

(२) पूर्वीचें लोन फेडण्याच्या कारणासाठीं पैसा कर्जी काढला असेल तेव्हां, याप्रमाणें कर्जी काढलेला पैसा फेडण्याची मुदत अवल लोनास जी मुदत मंजूर झालेली असेल तिच्या बाकी राहिलेल्या भागापलीकडे जाऊं नये.

९८. (१) बोर्डानें डिबेंचरांवर पैसा काढला असेल तेव्हां ते डिबेंचर व परिशिष्टाच्या नमुन्याप्रमाणें, किंवा बोर्ड, सरकारची अगोदर संमति घेऊन वेळोवेळीं ठरवील तशा दुसऱ्या नमुन्याप्रमाणें, असले पाहिजेत. सिक्यूरिटींचा नमुना.

(२) व परिशिष्टाच्या नमुन्याचा, किंवा या कलमाअन्वयें योग्य रीतीनें ठरविलेल्या कोणत्याही नमुन्याचा कोणताही डिबेंचर धारण करणारास त्याच्या बदला, बोर्ड वेळोवेळीं ठरवील तशा अटींनिशीं याप्रमाणें ठरविलेल्या दुसऱ्या कोणत्याही नमुन्याप्रमाणें डिबेंचर मिळूं शकेल.

(३) बोर्डानें काढलेला दरेक डिबेंचर—

(अ) तो व परिशिष्टाच्या नमुन्याप्रमाणें असल्यास, शेऱ्यानें, आणि

(ब) तो दुसऱ्या कोणत्याही नमुन्याप्रमाणें असल्यास, त्यांत लिहिण्यांत येईल तशा रीतीनें,

तबदील करतां येईल.

(४) या कलमाअन्वयें काढलेल्या डिबेंचरांमध्यें नमूद असलेल्या पैशाच्या संबंधानें दावा करण्याचा हक्क, त्या डिबेंचरांपैकीं कांहीं डिबेंचर इतरांहून अगोदरच्या तारखेचे आहेत या कारणानें कोणत्याही प्रकारें अग्रता प्राप्त न होतां, त्या त्या काळीं त्या त्या डिबेंचरांच्या धारणकरणारांस आहे असें समजावें.

९९. कलम ९२ यांत कसाही ठराव असला तथापि, बोर्डास आपल्या नांवीं कोणत्याही ब्यांकेशीं एक रोकडखातें उघडून व चालू ठेवून, ९२ व्या कलमाअन्वयें मंजूर केलेल्या कोणत्याही लोनाच्या यत्तेपर्यंत, अशा ब्यांकेकडून त्या खातीं आपल्या नांवानें पैसा घेण्याचा, आणि अशा खात्यावर याप्रमाणें घेतलेल्या पैशाच्या रकमेच्या किंवा वेळोवेळीं दिलेल्या रकमांच्या सव्याज फेडीसाठीं तारण ह्मणून, आपणाकडे आलेल्या किंवा येणाऱ्या अगर आपल्या जमिनी व आपली मिळकत, किंवा त्यांचा कोणताही भाग, या आक्टाच्या ठरावांस पात्र राहून, गहाण देण्याचा अधिकार आहे. सरकारानें मंजूर केलेल्या कोणत्याही लोनाच्या यत्तेपर्यंत ब्यांकांकडून पैसा घेण्याचा व गहाण ठेवून देण्याचा बोर्डास अधिकार असणें.

## बाब ९.—मिळकत व जबाबदाऱ्या.

### बोर्डास मिळकत तबदील करून देणें.

६०. (१) कलम १० अन्वयें जी तारीख जाहीर करण्यांत येईल त्या तारखेरोजीं लगेच, या आक्टाच्या कारणांसाठीं व यांत खालीं दिलेल्या ठरावांस पात्र राहून— बोर्डाकडे गेलेल्या जमिनींचा तपशील.

परिशिष्ट क व परिशिष्ट ड यांत सांगितलेल्या व ठेविलेल्या प्लानांमध्यें दाखविलेल्या निरनिराळ्या जमिनींतील व त्या जमिनींवरील, अनुक्रमें, पालिका माआझमांचा व कार्पोरेशनचा सर्व इस्टेट, हक्क, सत्ताधिकार व हितसंबंध हे, क परिशिष्टांत १२ वा प्लाट म्हणून सांगितलेल्या जमिनींच्या बाबतींत, सरकारानें करावयाच्या तात्पुरत्या भोगवट्याचा हक्क त्यांत राखून ठेविला आहे त्यास, आणि सदरहू परिशिष्टांत १८ वा प्लाट म्हणून सांगितलेल्या जमिनींच्या बाबतींत, कित्येक इमारतींचें सामान काढून नेण्याचा सरकारचा, हक्क त्यांत राखून ठेविला आहे त्यास, पात्र राहून,

बोर्डाकडे जातील.

मैदानें.

(२) क परिशिष्टांतील मैदानें म्हटलेल्या जमिनींवर बोर्डानें कोणत्याही वेळीं कायम प्रकारची कोणतीही इमारत उभारूं नये किंवा उभारूं देऊं नये, परंतु बोर्डास कोणत्याही वेळीं, माल सांठवून ठेवण्याच्या कारणासाठीं किंवा मनुष्यवस्ती खेरीज करून इतर कोणत्याही कारणासाठीं जरूर असतील ते कोणतेही तात्पुरते इमले सदरहू जमिनींवर उभारण्याचा, किंवा उभारविण्याचा किंवा उभारूं देण्याचा अधिकार आहे.

शहरांतील पाणी काढून लावण्यासाठीं किंवा शहरांतील जमिनीखालच्या पाण्याची सपाटी कमी करण्यासाठीं कार्पोरेशननें मंजूर केलेल्या कोणत्याही योजनेच्या कारणांकरितां मैदानांच्या ज्या कोणत्याही भागाची कार्पोरेशनास कोणत्याही वेळीं गरज लागेल तो भाग मोफत कार्पोरेशनच्या स्वाधीन केला पाहिजे, आणि मग तो कार्पोरेशनकडे राहील, परंतु मैदानांच्या कोणत्याही भागांतील पाणी काढून लावण्याकरितां जीं कोणतींही कामें, अशा कोणत्याही योजनेचा भाग म्हणून किंवा त्या योजनेच्या संबंधानें, हातीं घेण्यांत येतील त्या कामांच्या खर्चाबद्दल बोर्ड जबाबदार होणार नाहीं.

केनेडी सी फेस.

(३) क परिशिष्टांतील केनेडी सी फेस म्हटलेल्या जमिनींच्या संबंधानें बोर्डास, १० व्या कलमाअन्वयें जाहीर करण्यांत येईल त्या तारखेपासून तीस वर्षांच्या मुदतीपर्यंत, किंवा त्यापुढें ज्या मुदतीपर्यंत यांत खालीं ठरविल्याप्रमाणें परत घेण्याचा अधिकार सरकारानें चालविला नसेल त्या मुदतीपर्यंत, कोणत्याही वेळीं खालीं सांगितल्याप्रमाणें करण्याचा अधिकार आहे, म्हणजे—

(अ) सदरहू सगळ्या जमिनींचा किंवा त्यांच्या कोणत्याही भागाचा खुल्या जागेदाखल कायमचा विनियोग करण्याचा, किंवा

(ब) पूर्वीं सरकारची स्पष्ट मंजुरी घेऊन, सदरहू सगळ्या जमिनींचा किंवा त्यांच्या कोणत्याही भागाचा इमारतीच्या कारणांकडे विनियोग करण्याचा.

सदरहू जमिनींच्या ज्या कोणत्याही भागाचा, सदरहू तीस वर्षांची मुदत संपेपर्यंत, खुल्या जागेप्रमाणें कायमचा विनियोग करण्यांत आलेला नसेल, किंवा ज्यांचा विनियोग करण्याविषयीं सदरहू शेवटल्या रकमेंत सांगितल्याप्रमाणें मंजुरी मिळालेली नसेल, तो भाग कोणत्याही वेळीं परत घेण्याचा सरकारास अखत्यार आहे.

सदरहू जमिनींचा जो कोणताही भाग जोंपर्यंत इमारतीच्या कारणाकडे विनियोग केल्यावांचून राहील तोंपर्यंत त्याचा भोगवटा, कलम ९४ (१) (क) याअन्वयें बोर्डानें केलेल्या कोणत्याही पोटकायद्यांतील ठरावांस पात्र राहून, कोणत्याही तात्पुरत्या कारणासाठीं करण्याचा सरकारास अधिकार आहे.

कूपरेज प्लाट व सेक्रेटेरियट प्लाट.

(४) परिशिष्ट क यांत कूपरेज प्लाट व सेक्रेटेरियट प्लाट अशा निरनिराळ्या नांवांनीं सांगितल्या आहेत त्या जमिनींच्या संबंधानें म्हटलें म्हणजे, बोर्डाला कोणत्याही वेळीं, सरकारची मंजुरी पूर्वीं घेऊन, सदरहू सगळ्या जमिनींचा किंवा त्यांच्या कोणत्याही भागाचा सदरील शेवटच्या पोटकलमाच्या रकमा (अ) व (ब) यांत सांगितलेल्या कारणांपैकीं कोणत्याही कारणाकडे विनियोग करण्याचा अधिकार आहे.

सदरहू जमिनींच्या ज्या कोणत्याही भागाचा विनियोग करण्यास सदरीं सांगितल्याप्रमाणें मंजुरी मिळालेली नसेल तो भाग कोणत्याही वेळीं कोणत्याही सरकारी कारणासाठीं परत घेण्याचा सरकारास अधिकार आहे; आणि

सदरहू जमिनींच्या ज्या कोणत्याही भागाचा इमारतीच्या कारणांकडे विनियोग केलेला नसेल त्याचा भोगवटा, कलम ९४ (१) (क) याअन्वयें बोर्डानें केलेल्या कोणत्याही पोटकायद्यांतील ठरावांस पात्र राहून, कोणत्याही वेळीं कोणत्याही तात्पुरत्या कारणासाठीं करण्याचा सरकारास अधिकार आहे.

पोटकलमें (२), (३) व (४) यांत सांगितलेल्या जमिनींची डागडुजी व व्यवस्था बोर्डानें ठेवणें.

(५) पोटकलमें (२), (३) व (४) यांत सांगितलेल्या जमिनींचा भाग असणारी जी कोणतीही जागा सदरीं सांगितल्याप्रमाणें विनियोग केल्यावांचून किंवा परत घेतल्यावांचून वेळोवेळीं राहील, तिच्या डागडुगीबद्दल व व्यवस्थेबद्दल बोर्ड जबाबदार होईल, आणि त्यानें अशा जागेंतील व जागेवरील सर्व विद्यमान हक्क, ते ह्या आक्टाच्या ठरावांस पात्र असतील त्याप्रमाणें, राखण्यासाठीं जरूर असणारीं सर्व कृत्यें केलीं पाहिजेत किंवा करविलीं पाहिजेत; आणि अशी सगळी जागा किंवा तिचा कोणताही भाग बोर्ड पसंत करील तसें नांवाचें किंवा इतर भाडें घेऊन, कोणत्याही तात्पुरत्या कारणासाठीं परवानगी-पट्ट्यानें देण्याचा बोर्डास अधिकार आहे.

जमिनी बोर्डाकडे किती मुदतीपर्यंत राहतील तें.

(६) या कलमाअन्वयें बोर्डाकडे गेलेली मिळकत, पोटकलम (३), ची रकम (अ) यांत सांगितलेल्या कारणांकडे विनियोग केलेल्या जमिनींखेरीज परिशिष्टें क व ड यांत सांगितलेल्या सगळ्या जमिनी, किंवा त्या जमिनींच्या कोणत्याही भागाच्या संबंधानें ह्मटलें असतां तो भाग, बोर्डाकडून इमारत-पट्ट्यानें देण्यांत येई तोंपर्यंत, आणि त्यानंतर (सदरीं सांगितल्याप्रमाणें खेरीज करून) त्या सगळ्या जमिनींच्या किंवा अशा कोणत्याही भागाच्या संबंधानें जी कोणतीही जास्त मुदत खालीं सांगितलेल्या वेळीं, ह्मणजे—

(अ) बोर्डानें दिलेला पट्टा पुनः करून द्यावयाचा नसल्यास त्या पट्ट्याची मुदत संपल्यावर,

(ब) बोर्डानें दिलेल्या पट्ट्यांत तो पट्टा पुनः करून देण्याबद्दल रकम दाखल केलेली असल्यासः

(१) पट्टा पुनः करून दिला असेल, तेव्हां त्या पुनः करून दिलेल्या पट्ट्याची मुदत संपल्यावर,

(२) पट्टा पुनः करून दिला नसेल, तेव्हां दिलेल्या पट्ट्यांत ज्या परमावधीच्या मुदतीपर्यंत पट्टा पुनः करून देण्यांत येईल असें ह्मटलें असेल तिच्याइतकी मुदत संपल्यावर,

ठरविण्यांत येईल त्या जास्त मुदतीपर्यंत, ह्या कलमांतील ठरावांस पात्र राहून, बोर्डाकडे राहील:

एकंदर किती मुदतीपर्यंत अशा जमिनी पट्ट्यानें देण्याचा बोर्डास अधिकार आहे त्यासंबंधानें विशेष ठराव.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, पुनः करून द्यावयाचा नाहीं असा कोणताही पट्टा ९९ वर्षांहून जास्त मुदतीपर्यंत देऊं नये, आणि पुनः करून द्यावयाच्या पट्ट्याची मुदत व असा पट्टा ज्या मुदतीपर्यंत पुनः करून देण्यांत येईल, किंवा पुनः करून दिला जाईल असें ह्मटलें असेल, ती मुदत या दोन्ही मिळून एकंदर मुदत कोणत्याही प्रसंगीं ९९ वर्षांहून ज्यास्त असूं नये.

सार्वजनिक कारणासाठीं लागणाऱ्या जमिनी परत घेण्याचा सरकारचा व कार्पोरेशनचा अधिकार.

(७) बोर्डानें पट्ट्यानें दिलेल्या किंवा पट्ट्यानें देण्याचें कबूल केलेल्या जमिनीखेरीज इतर, क परिशिष्टांत सांगितलेली जी कोणतीही जमीन एकाद्या सार्वजनिक कारणासाठीं सरकारास पाहिजे असेल किंवा तशी ड परिशिष्टांत सांगितलेली जी कोणतीही जमीन एकाद्या सार्वजनिक कारणासाठीं कार्पोरेशनास पाहिजे असेल ती कोणत्याही वेळीं, बोर्डास साहा महिन्यांची नोटीस देऊन, परत घेण्याचा, प्रसंगाप्रमाणें,

सरकारास किंवा कार्पोरेशनास अधिकार आहे, आणि बोर्डाच्या भांडवलासंबंधी कर्जा-तून कलम ९१ (१) याअन्वयें ठरविलेल्या त्या जमिनीच्या किंमतीइतकी रकम कमी केली पाहिजे.

*बोर्डाकडे गेलेल्या जमिनी नवसाध्य करण्याबाबतच्या हक्काचा तपशील.*

६१. (१) जी तारीख १० व्या कलमाअन्वयें जाहीर करण्यांत येईल त्या तारखे-रोजीं लगेच, इ परिशिष्टांत सांगितलेल्या हद्दींच्या आंतील मलिका माआझमांची मिळकत असणारा समुद्राचा तळ नवसाध्य करण्याचा हक्क आणि सदरहू हद्दींच्या आंत ज्या जमिनी बोर्ड नवसाध्य करील त्यांवरील व त्यांतील मलिका माआझमांचा सर्व इस्टेट, हक्क, सत्ताधिकार आणि हितसंबंध हे, या अॅक्टाच्या कारणांसाठीं व यांत पुढें दिलेल्या ठरावांस पात्र राहून, बोर्डाकडे जातील व ते त्याप्रमाणें त्याकडे, त्या नवसाध्य केलेल्या सगळ्या जमिनी, किंवा त्यांच्या कोणत्याही भागासंबंधानें झटलें असतां तो भाग, बोर्डाकडून इमारतपट्ट्यानें देण्यांत येई तोंपर्यंत, आणि त्यानंतर त्या सगळ्या जमिनींच्या किंवा अशा कोणत्याही भागाच्या संबंधानें जी कोणतीही जास्त मुदत कलम ६० (६) यांत सांगितलेल्या रीतीनें ठरविण्यांत येईल त्या मुदतीपर्यंत राहतील.

*बोर्डानें जमीन नवसाध्य करण्याचें सुरू केलें नाहीं तर उपाव.*

(२) जी तारीख १० व्या कलमाअन्वयें जाहीर करण्यांत येईल तिच्यापासून वीस वर्षांची मुदत किंवा हिंदुस्थान सरकार ठरवील ती जास्त मुदत संपल्यावर जर बोर्डानें, सदरीं सांगितलेल्या हद्दींच्या आंत कोणतीही जागा नवसाध्य करण्याची सुरवात केली नाहीं तर या कलमाअन्वयें अशा जागेच्या संबंधानें बोर्डाकडे गेलेले हक्क व मिळकत हीं तावडतोब त्याकडून जाऊन पूर्णपणें मलिका माआझमांकडे पुन: येतील.

*सार्वजनिक कारणासाठीं लागणाऱ्या कोणत्याही नवसाध्य केलेल्या जमिनीचा कबजा घेण्याचा सरकारचा अधिकार.*

(३) बोर्डानें पट्ट्यानें दिलेल्या किंवा पट्ट्यानें देण्याचें कबूल केलेल्या जमिनी-खेरीज इतर जी कोणतीही नवसाध्य केलेली जमीन एकाद्या सार्वजनिक कारणासाठीं सरकारास पाहिजे असेल ती कोणत्याही वेळीं, बोर्डास सहा महिन्यांची नोटीस देऊन, कबज्यांत घेण्याचा सरकारास अधिकार आहे, आणि मग लगेच ती सरकाराकडे जाईल, आणि सरकारानें बोर्डास, कलम ९१ (२) अन्वयें ठरविलेल्या त्या जमिनीच्या किंमती-इतकी रकम दिली पाहिजे, आणि त्या जमिनीच्या संबंधानें ७०व्या कलमाअन्वयें सरकाराशीं बोर्डाची कोणतीही जबाबदारी असल्यास ती नाहींशी होईल.

*बोर्डानें दिलेल्या पट्ट्यांची मुदत संपल्यावर मिळकत प्रसंगाप्रमाणें मलिका माआझमांकडे व कार्पोरेशनकडे जाणें.*

६२. कलमें ६० (६) व ६१ (१) यांत सांगितलेली जास्त मुदत संपल्यावर, कलम ६० (२) यांत सांगितलेल्या व त्याच कलमाचें पोटकलम (३), रकम (अ), यांत सांगितलेल्या कारणाकडे विनियोग केलेल्या जमिनींखेरीज क परिशिष्टांत सांगितलेल्या जमिनींच्या, आणि ड परिशिष्टांत सांगितलेल्या जमिनींच्या आणि इ परिशिष्टांत सांगि-तलेल्या हद्दींच्या आंत नवसाध्य केलेल्या जमिनींच्या कोणत्याही भागांत कलमें ६० (१) व ६१ (१) यांअन्वयें जी मिळकत बोर्डाकडे गेलेली असेल ती, त्या जमिनींच्या ज्या भागाच्या संबंधाची अशी जास्त मुदत संपली असेल त्या भागापुरती, लगेच [बोर्डा-कडून] जाईल, आणि त्या जमिनींचा तो भाग, प्रसंगाप्रमाणें, मलिका माआझमांकडे किंवा कार्पोरेशनकडे पूर्णपणें येईल किंवा पुन: येईल, आणि प्रत्येक बाबतींत, प्रसंगा-प्रमाणें, ६७ व्या कलमाअन्वयें सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया इन् कौन्सिल यांशीं किंवा कार्पोरेशनशीं असणारी भांडवलासंबंधी कर्जाबद्दलची जबाबदारी अगर ७० व्या कलमाअन्वयें सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया इन् कौन्सिल यांशीं असणारी बोर्डाची जबाबदारी जेणेंकरून, वर सांगितल्याप्रमाणें खेरीजकरून, क परिशिष्टांत सांगितलेल्या सगळ्या जमिनी, किंवा ड परिशिष्टांत सांगितलेल्या, किंवा इ परिशिष्टांत सांगितलेल्या जागांच्या आंत नवसाध्य केलेल्या सगळ्या जमिनी, सदरीं सांगितल्याप्रमाणें गेल्या ह्मणजे अशा निरनिराळ्या जमिनींसंबंधीं बोर्डाची सदरीं सांगितल्या प्रकारची जबाबदारी सर्वस्वीं नाहींशी होईल, त्या रीतीनें आकारलेल्या रकमेनें कमी होईल.

## मिळकतीसंबंधी सामान्य अधिकार.

६३. बोर्डास, या आक्टाच्या कारणांसाठीं, जंगम व स्थावर मिळकत, ती मग शहराच्या आंत असो किंवा बाहेर असो, घेण्याचा व धारण करण्याचा अधिकार आहे, आणि तसाच त्यास, या आक्टांतील ठरावांस पात्र राहून,— बोर्डास मिळकत घेण्याचा व धारण करण्याचा अधिकार.

(१) जी कोणतीही जंगम किंवा स्थावर मिळकत बोर्डाकडे आली असेल किंवा त्यानें घेतली असेल ती भाड्यानें किंवा पट्ट्यानें देण्याचा, पट्ट्यानें देण्याचा अधिकार.

(२) क व ड परिशिष्टांत सांगितलेल्या जमिनी आणि ड परिशिष्टांत सांगितलेल्या हद्दींच्या आंत नवसाध्य केलेल्या कोणत्याही जमिनी या खेरीज करून जी कोणतीही जंगम किंवा स्थावर मिळकत त्याकडे गेलेली असेल किंवा त्यानें घेतली असेल ती मिळकत विकण्याचा व इतर रीतीनें दुसऱ्याच्या नांवीं करून देण्याचा, विकण्याचा अधिकार.

अधिकार आहे.

६४. या आक्टाअन्वयें बोर्डाकडे गेलेल्या किंवा जाणाऱ्या जमिनींच्या किंवा इमारतींच्या कोणत्याही भागाच्या विक्रीचें उत्पन्न, भांडवलासंबंधी चालू खर्च भागविण्याच्या कामीं, किंवा ९२ व्या कलमाअन्वयें बोर्डानें काढलेल्या कोणत्याही कर्जाची मुद्दल रकम, ती किंवा तिचा कोणताही भाग त्या वेळीं देणें असल्यास, फेडण्याच्या कामीं, किंवा ९९ व्या कलमाअन्वयें सिंकिंग फंडांबाबत द्यावयाच्या रकमांमध्यें भर घालण्याच्या कामीं लाविलें पाहिजे. बोर्डाकडे गेलेल्या जमिनींच्या किंवा इमारतींच्या विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग.

६५. बोर्डाला, ६० व्या कलमांतील ठरावांस पात्र राहून, क व ड परिशिष्टांत सांगितलेल्या जमिनींपैकीं किंवा ड परिशिष्टांत सांगितलेल्या हद्दींच्या आंत नवसाध्य केलेल्या जमिनींपैकीं कोणतीही जमीन या आक्टाखालील कोणत्याही योजनापत्रकाच्या कारणांकडे लावण्याचा अधिकार आहे. बोर्डाकडे गेलेल्या कित्येक जमिनी या आक्टाखालील कोणत्याही योजनापत्रकाच्या कारणांकडे लावण्याचा अधिकार.

६६. (१) क परिशिष्टांत किंवा ड परिशिष्टांत सांगितलेल्या जमिनीच्या कोणत्याही भागाचा स्ट्रीट बनविण्याच्या कामीं बोर्डानें विनियोग केला असेल तेव्हां, प्रसंगाप्रमाणें, सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांस किंवा कार्पोरेशनास बोर्डानें देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जांतून, ती जमीन ज्या प्लाटचा भाग असेल त्याच्या, प्रसंगाप्रमाणें परिशिष्ट क किंवा परिशिष्ट ड यांत दाखविलेल्या, किंमतीकडे लक्ष देऊन कलेक्टर तिची जी किंमत ठरवील तिच्याइतकी रकम कमी केली पाहिजे सदरहूप्रमाणें कामीं लावलेल्या जमिनींच्या किंमतीची व्यवस्था.

(२) ह्या कलमाखालील कलेक्टरच्या ठरावावर अपील न्यायसभेकडे चालेल. न्यायसभेकडे अपील करण्याविषयीं ठराव

### जबाबदाऱ्या.

६७. बोर्डानें— सेक्रेटरी आफ स्टेट व कार्पोरेशन यांस बोर्डानें देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जाचा तपशील.

(१) सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांस देणें असणाऱ्या भांडवलासंबंधी कर्जामध्यें रकमा घेतात त्या—

(अ) ६० व्या कलमाचें पोटकलम (७) याअन्वयें किंवा ६६ व्या कलमाअन्वयें भांडवलासंबंधी कर्जाची कोणतीही कमी केलेली रकम सोडून, क परिशिष्टांत सांगितलेल्या रकमा;

(ब) ६० व्या कलमाचीं पोटकलमें (३) व (४) यांत सांगितलेल्या ज्या कोणत्याही जमिनीचा खुल्या जागेदाखल विनियोग केला असेल तिची किंमत;

(क) ६० व्या कलमाचीं पोटकलमें (३) व (४) यांत सांगितलेल्या ज्या कोणत्याही जमिनीचा इमारतींच्या कारणांकडे विनियोग केला असेल तिची किंमत :

[ ]

रकमा (ब) व (क) याअन्वयें हिशोबीं धरावयाची जमिनीची किंमत ( असल्यास ) विनियोग केलेली जमीन ज्या प्लाटचा भाग असेल त्या सगळ्या प्लाटच्या, क परिशिष्टाच्या शेवटल्या कोष्टकांत लागू ह्मणून सांगितलेल्या, किंमतीकडे लक्ष देऊन कलेक्टरानें ठरविली पाहिजे :

न्यायसभेकडे अपील करण्याविषयीं ठराव.

या कलमाखालील कलेक्टरच्या ठरावावर अपील न्यायसभेकडे चालेल :

(२) कार्पोरेशनास देणें असणाऱ्या तशा कर्जांमध्यें रकमा येतात त्या—

६० व्या कलमाचें पोटकलम (७) याअन्वयें किंवा कलम ६६ याअन्वयें भांडवलासंबंधी कर्जाची कोणतीही कमी केलेली रकम आणि ४९व्या कलमाचें पोटकलम (३) याअन्वयें कार्पोरेशनकडे पुनः गेलेल्या कोणत्याही जमिनीची किंमत सोडून, ड परिशिष्टांत सांगितलेल्या रकमा.

बोर्डानें द्यावयाच्या व्याजाचा तपशील.

६८. (१) कलमें ६७ (१) (अ) व ६७ (२) यांत सांगितलेल्या रकमांवर सन १९०८ च्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेस ( परंतु त्या तारखेपूर्वीं नव्हे ) दरसाल दरशेंकडा ३ टक्के दरानें व्याज सुरू होईल, आणि बोर्डानें, वर सांगितल्याप्रमाणें व्याज, अनुक्रमें, सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांस व कार्पोरेशनास सन १९०९ च्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेस व त्यापुढील प्रत्येक एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेस दिलें पाहिजे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं—

(१) प्रसंगाप्रमाणें हिंदुस्थान सरकारास किंवा कार्पोरेशनास योग्य वाटल्यास त्याला, क परिशिष्टांत किंवा ड परिशिष्टांत सांगितलेल्या जमिनीच्या ज्या कोणत्याही भागाच्या संबंधानें बोर्डानें सन १९०८ च्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेरोजीं कोणताही इमारतपट्टा करून दिला नसेल किंवा अशा पट्ट्याबदलची कबुलायत करून दिली नसेल त्या भागाच्या संबंधानें या कलमाअन्वयें बोर्डानें द्यावयाच्या व्याजाच्या सुरुवातीची तारीख, जी तारीख ( अशा भागाच्या संबंधानें बोर्डाकडून जो कोणताही पट्टा किंवा अशा पट्ट्याबद्दलची कबुलायत करून देण्यांत येईल त्या पट्ट्याच्या किंवा कबुलायतीच्या तारखेपलीकडची नाहीं अशी ) प्रसंगाप्रमाणें, सरकार किंवा कार्पोरेशन ठरवील त्या तारखेपर्यंत लांबविण्याचा अधिकार आहे ;

(२) कलम ७९ (३) (ब) (२) यांत ठरविलें आहे तें खेरीज करून, कोणतेंही योजनापत्रक अमलांत आणतांना ज्या कोणत्याही जमिनीचा ६९ व्या कलमाअन्वयें खुल्या जागेदाखल विनियोग केलेला असेल, तिच्या किंमतीवर ( ही किंमत स्ट्रीट बनविण्याच्या कामीं विनियोग केलेल्या जमिनीची किंमत ठरविण्याकरितां ६६ व्या कलमांत ठरविलेल्या रीतीनें ठरवावयाची ) कोणतेंही व्याज घेतां कामा नये.

(३) प्रसंगाप्रमाणें, सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांस किंवा कार्पोरेशनास देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जांतून कोणतीही रकम कमी करण्यांत आल्यावर, या कलमाअन्वयें बोर्डानें द्यावयाचें व्याज, त्या कर्जांतून ती रकम कमी केल्याच्या तारखेपासून, त्या रकमेच्या मानानें, कमी केलें पाहिजे.

(२) कलम ६७ (१) (ब) यांत सांगितलेल्या किंमतीच्या रकमेवर, कलम ७९ (३) (ब) यांत ठरविलें आहे तें खेरीज करून, कोणतेंही व्याज द्यावयाचें नाहीं.

(३) कलम ६७ (१) (क) यांत सांगितलेल्या किंमतीच्या रकमेवर, बोर्डानें सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांस, त्याच (क) रकमेंत सांगितलेल्या विनियोगास मंजुरी मिळाल्याच्या निदान दाहा वर्षें नंतर जी तारीख सरकार ठरवील त्या तारखेपासून, दरसाल दरशेंकडा ३ टक्के दरानें व्याज दिलें पाहिजे.

६९. (१) सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांस देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जांत, सन १८९६ च्या आगष्ट महिन्याच्या १ ल्या तारखेपासून तों १० व्या कलमाअन्वयें जी तारीख जाहीर करण्यांत येईल त्या तारखेपर्यंत, क परिशिष्टांत चौपाटी एस्टेट या नांवानें सांगितलेली जमीन आंखून देण्याच्या कामीं किंवा सदरहू परिशिष्टांत काटन ग्रीन प्लाट या नांवानें सांगितलेल्या जमिनीवर आगीच्या निवारणार्थ पाण्याचे नळ घालण्याच्या कामीं सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया यांस जो खर्च झाला असेल त्याचा, आणि वर सांगितल्याप्रमाणें जी तारीख जाहीर करण्यांत येईल तिच्या अगोदर या आक्टाच्या कारणांसाठीं सरकारच्या मंजुरीनें जो आरंभींचा खर्च करण्यांत आला असेल त्याचा समावेश होतो.

सेक्रेटरी आफ् स्टेट यांस देणें असलेल्या भांडवलासंबंधी कर्जांत, सरकारास झालेले कांहीं खर्च व या आक्टासंबंधाचा प्रारंभींचा खर्च यांचा समावेश होणें.

(२) सदरीं सांगितलेल्या खर्चाबद्दल, जी तारीख १० व्या कलमाअन्वयें जाहीर करण्यांत येईल त्या तारखेरोजीं (परंतु त्यापूर्वीं नव्हे) दरसाल दरशेंकडा ३½ टक्के या दरानें व्याज सुरू होईल, आणि बोर्डानें सदरीं सांगितलेल्या रकमा सदरीं सांगितलेल्या व्याजासहित, बोर्डानें या आक्टाच्या कारणांसाठीं यांत पूर्वीं ठरविल्याप्रमाणें लोन काढल्यावर लगेच परत दिल्या पाहिजेत.

७०. (१) जमीन नवसाध्य करण्यासंबंधी कोणत्याही योजनापत्रकांत समावेश केलेल्या जागेच्या कोणत्याही भागाच्या पहिल्या पट्ट्याच्या तारखेपासून वीस वर्षांपर्यंत बोर्डास, अशा जागेच्या अग्रकिनाऱ्यावर जो माल उतरण्यांत येईल किंवा तेथून तारवावर चढविण्यांत येईल त्यावरील पट्ट्या खेरीज करून, त्या जागेपासून उत्पन्न होणाऱ्या सर्व भाड्याचा व नफ्याचा मोफत उपभोग मिळेल.

बोर्डानें, नवसाध्य केलेल्या जागांपासून उत्पन्न होणाऱ्या भाड्याचा व नफ्याचा पहिल्या वीस वर्षांपर्यंत मोफत उपभोग घेणें आणि त्यानंतर बाजार-किंमतींतून नवसाध्य करण्याचा खर्च वजा करून तिच्या बाकी रकमेवर व्याज देणें.

(२) त्यानंतर बोर्डानें दरसाल एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेरोजीं सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांस, नवसाध्य केलेल्या जागांच्या बाजार-किंमतींतून त्या नवसाध्य करण्याचा खर्च वजा करून जी रकम येईल तिच्यावर दरशेंकडा तीन टक्के या दरानें व्याज दिलें पाहिजे.

७१. सदरील शेवटल्या कलमाच्या कारणांसाठीं —

सदरील शेवटल्या कलमाच्या कारणांसाठीं "बाजार-किंमत" व "नवसाध्य करण्याचा खर्च" या संज्ञांच्या व्याख्या.

(१) "बाजार-किंमत" याचा अर्थ, व्याजाचा पहिला हप्ता देणें होईल त्या वेळीं कलेक्टर, नवसाध्य केलेल्या जागांची इमारतीच्या कारणांसाठीं जी रास्त फ्रीहोल्ड किंमत ह्मणून ठरवील ती बाजार-किंमत होय असें समजावें: मात्र सडकांनीं, धक्यांनीं [व्हार्फनीं] व घोडे-रस्त्यांनीं व्यापिलेल्या जागा व समुद्रकांठाच्या बाजूनें जी कोणतीही जागा संरक्षणाच्या कारणांसाठीं खुल्या जागेदाखल राखून ठेवणें जरूर असेल ती, आणि कलम ६१ (३) याअन्वयें सरकारानें जी कोणतीही जमीन कबज्यांत घेतली असेल ती, ह्या सदरहू किंमत ठरवितेवेळीं वगळल्या पाहिजेत: ह्या पोट-कलमाखालील कलेक्टरच्या ठरावावर अपील न्यायसभेकडे चालेल.

(२) "त्या नवसाध्य करण्याचा खर्च" याचा अर्थ, प्रारंभींचा खर्च व काम चालू असल्या मुदतींत देखरेखीबद्दल व व्याज व सिंकिंग फंड यांच्या

बोजाबद्दल लागणारी रकम (ही प्रत्येक योजनापत्रकावरहुकूम काम पुरें झाल्याच्या तारखेपर्यंत आकारली पाहिजे) यांसुद्धां, त्या जागांचा ज्यांमध्यें समावेश केलेला असेल तीं योजनापत्रकें अमलांत आणण्याचा एकंदर खर्च, असा समजावा.

## भाग ६.—महसूल व खर्च.

### म्युनिसिपल फंडांतून द्यावयाची रकम.

कमिशनरानें बोर्डास एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस द्यावयाच्या पैशाची रकम.

७२. (१) कमिशनरानें, तारीख १ माहे एप्रिल सन १९०० रोजीं व तदनंतर दरेक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस, म्युनिसिपल आक्टाचें कलम १४३ (१) (अ) यांत सांगितलेल्या इमारती शिवाय करून शहरांतील सर्व इमारतींच्या व जमिनींच्या कर आकारावयाच्या एकंदर किंमतीवर शेंकडा दोन टक्क्यांहून जास्त नाहीं इतकी ठोक रकम म्युनिसिपल फंडांतून बोर्डास दिली पाहिजे.

(२) सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांकडे असणाऱ्या व मुंबई बंदरचे ट्रस्टी यांकडे असणाऱ्या शहरांतील इमारती व जमिनी यांची कर आकारावयाची किंमत ही, या कलमाच्या कारणांसाठीं, म्युनिसिपल आक्टाचीं कलमें १४४ व १४९ यांतील ठरावांअन्वय त्यांची जी कर आकारावयाची किंमत ठरविली असेल तिचे अनुक्रमें आठदशांश व नऊदशांश होत असें समजावें.

ह्या कलमांत उपयोग केलेल्या संज्ञांच्या व्याख्या.

७३. (१) ह्या कलमाच्या कारणांसाठीं—

"भिळकतीवरील कर."

(अ) "भिळकतीवरील कर" ह्या संज्ञेचा अर्थ, पाण्याचा कर व फायर ब्रिगेडच्या कारणांबद्दलचा पुरवणीचा सामान्य कर शिवाय करून आणि गेल्या शेवटल्या कलमाअन्वयें द्यावयाची ठोक रकम ज्यावरून आकारावयाची तो दर शिवाय करून, म्युनिसिपल आक्टाचें कलम १४० याअन्वयें घ्यावयाचें मिळकतीवरील कर असा समजावा;

"जागा."

(ब) "जागा" ह्या शब्दांत—

(१) परिशिष्टें क व ड यांत सांगितल्या जागांचा,

(२) सुधारणेसंबंधी किंवा स्ट्रीटासंबंधी योजनापत्रकाअन्वयें बोर्डानें कोणत्याही वेळीं घेतलेल्या जागांचा किंवा कलम २८ (१) (फ) याच्या अखेरच्या भागांत सांगितलेल्या हद्दींच्या आंत सर्वांशीं किंवा अंशतः असलेल्या जागांचा,

(३) जमीन नवसाध्य करण्यासंबंधी योजनापत्रकाअन्वयें बोर्डानें नवसाध्य केलेल्या जागांचा,

समावेश होतो असें समजावें;

"कर आकारावयाची किंमत वाढणें."

(क) "कर आकारावयाची किंमत वाढणें" याचा अर्थ, जागांमध्यें वेळोवेळीं समावेश झालेल्या इमारतींच्या व जमिनींच्या कर आकारावयाच्या किंमतींत—

(१) ज्या इमारतींचा व जमिनींचा, हा आक्ट ठरल्याच्या तारखेस, पोटरकम (ब) (१) यांत सांगितलेल्या जागांमध्यें समावेश केलेला असेल त्या इमारतींच्या व जमिनींच्या बाबतींत, त्यांची त्या तारखेस असलेली कर आकारावयाची किंमत,

(२) ज्या इमारतींचा व जमिनींचा, त्यांच्या संबंधानें कलम २७, ३२ किंवा ३९ ह्याअन्वयें जाहिरनामा प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस पोटरकमा (ब) (२) व (ब) (३) यांत सांगितलेल्या जागांमध्यें समावेश केलेला असेल त्या इमारतींच्या व जमिनींच्या बाबतींत, त्यांची सदरीं शेवटीं सांगितलेल्या तारखेस असलेली कर आकारावयाची किंमत,

बाद करून बाकी राहील ती रकम असा समजावा;

[ ]

(ड) "कर आकारावयाची किंमत कमी होणें" याचा अर्थ, "कर आकारावयाची किंमत वाढणें" याची सदरीं जी व्याख्या केली आहे, तिच्या उलट समजावा.

"कर आकारावयाची किंमत कमी होणें."

(२) बोर्डानें, तारीख १ माहे एप्रिल सन १९०० नंतर आणि तदनंतर दरेक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर होईल तितक्या लवकर खालील तपशिलाचा एक तक्ता तयार करून कमिशनराकडे पाठविला पाहिजे. तो तपशील येणेंप्रमाणें:—

प्रसंगाप्रमाणें, कमिशनरानें बोर्डास किंवा बोर्डानें कमिशनरास द्यावयाच्या पैशाची रकम ठरविणें.

(अ) खालील रकम बोर्डाच्या खातीं जमा दाखवावी:

जागांमध्यें समावेश केलेल्या इमारतींवर व जमिनींवर वेळोवेळीं घ्यावयाच्या मिळकतीवरील करांच्या रकमेंत, कर आकारावयाची किंमत वाढल्यामुळें कांहीं रकम वाढलेली असल्यास ती;

(ब) खालील रकमा बोर्डाच्या खात्यीं खर्च दाखवाव्या:

(१) जागांमध्यें समावेश केलेल्या इमारतींवर व जमिनींवर वेळोवेळीं घ्यावयाच्या मिळकतीवरील करांच्या रकमेंत, कर आकारावयाची किंमत कमी झाल्यामुळें कांहीं रकम कमी झालेली असल्यास ती: मात्र तारीख ३१ माहे मार्च सन १९०४ रोजीं संपणारें सरकारी साल संपल्याशिवाय ह्यासंबंधानें खर्च दाखवितां कामा नये;

(२) ह्या कलमांत सांगितलेल्या जमेकडील रकमा वसूल करण्याचा खर्च: हा, सदरहू सालीं शहरचे मिळकतीवरील कर वसूल करण्याच्या कामीं खरोखर दर शेंकडा आलेल्या खर्चाप्रमाणें आकारावयाचा;

(३) कलम ४९ ह्याच्या ठरावांअन्वयें कार्पोरेशनकडे गेलेल्या स्ट्रीटांची डागडुगी करण्याचा व त्यांवर दिवे लावण्याचा व पाणी शिंपण्याचा व ते साफ करण्याचा खर्च: हा खर्च, शहरांतील सार्वजनिक स्ट्रीटांची डागडुजी करण्याच्या व त्यांवर दिवे लावण्याच्या व पाणी शिंपण्याच्या व ते साफ करण्याच्या खर्चाचा जो सरासरी दर ह्मणून सदरहू सालाच्या म्युनिसिपल हिशोबांत दाखविलेला असेल तो दर त्या स्ट्रीटांच्या क्षेत्रफळास लागू करून आकारावा व त्यांतून अशा स्ट्रीटांच्या संबंधानें ट्राम्वे कंपनीकडून कार्पोरेशनास आलेलें कोणतेंही भाडें बाद करावें;

(४) मोऱ्या व मोऱ्यांचीं कामें व सार्वजनिक संडास, मुतऱ्या व त्यांसारख्या सोई यांची डागडुजी ठेवण्याबद्दलचा व तीं साफ करण्याबद्दलचा आणि जागांमध्यें समावेश केलेल्या इमारतींच्या व जमिनींच्या संबंधानें म्युनिसिपल आक्टाचें कलम ६१, रकमा (क) व (प) यांत सांगितलेलीं कार्पोरेशनचीं इतर कर्तव्यें करण्याबद्दलचा खर्च: हा खर्च एका पक्षीं, अशीं कर्तव्यें करण्याबद्दल कार्पोरेशनला जो खरोखर खर्च आला असेल त्याहून, किंवा दुसऱ्या पक्षीं, पोटकलम (२) (अ) ह्याअन्वयें मिळकतीवरील करांचा बोर्डाच्या खातीं जमा करावयाचा जो भाग म्युनिसिपल आक्टाचें कलम १४० (ब) याअन्वयें वसूल करण्याजोगा असेल त्या भागाहून जास्त असतां कामा नये.

(३) सदरील शेवटच्या पोटकलमांत सांगितलेल्या तक्त्यांत दाखविलेली जमा आणि खर्च यांमधल्या तफावतीचा, प्रसंगाप्रमाणें, कमिशनरानें बोर्डाला, किंवा बोर्डानें कमिशनराला, दरेक सालच्या डिसेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेस रकम देऊन

जमा व खर्च यांमधील तफावतीचा निकाल.

निकाल केला पाहिजे, आणि त्या पोटकलमांत ज्या बाबतींची व्यवस्था सांगितली आहे, त्यांच्यां संबंधानें बोर्ड व कमिशनर यांच्या दर्म्यान कोणतीही तकरार उत्पन्न झाल्यास तिचा निकाल न्यायसभेनें केला पाहिजे.

## सरकारानें द्यावयाच्या रकमा.

सन १८९७ च्या आगष्ट महिन्यानंतर कित्येक जमिनींपासून उत्पन्न झालेला नफा सरकारानें बोर्डास देणें.

७४. परिशिष्ट फ ह्यांत सांगितलेल्या किंवा उल्लेख केलेल्या जमिनींपासून, तारीख ३१ माहे आगस्ट सन १८९७ नंतरचें सरकारास उत्पन्न झालेलें सर्व भाडें व नफा, कलम १० अन्वयें जाहिर करण्यांत येईल त्या तारखेपासून ९९ वर्षांच्या मुदतीपर्यंत, सरकाराकडून बोर्डास देण्यांत येईल.

## हिशोबांचे विभाग.

व्यवस्थेचा खर्च कांहीं मुदतीपर्यंत भांडवलखातीं लिहिणें आणि तदनंतर भांडवल व महसूल यांच्या दर्म्यान वांटून देणें.

७५. (१) कलम १० अन्वयें जाहीर करण्यांत येईल त्या तारखेपासून पंधरा वर्षांच्या मुदतीपर्यंत, किंवा हिंदुस्थान सरकार पसंत करील त्या जास्त मुदतीपर्यंत, चेअरमन, आक्टिंग चेअरमन, ट्रस्टी व यादींत दाखल केलेले कामगार लोक, यांचे पगार व नेमणुका, आणि कलम ४८ (९) यांत सांगितलेला खर्च व इतर सगळा आनुषंगिक खर्च यांसुद्धां व्यवस्थेबद्दलचा खर्च, भांडवलखातीं लिहिला पाहिजे.

तदनंतर सदरहू प्रकारचा खर्च, सरकारच्या मंजुरीस पात्र राहून, बोर्ड ठरवील त्याप्रमाणें भांडवल खातें व महसूल खातें यांमध्यें वांटून दिला पाहिजे.

भांडवलाच्या हिशोबांत, दरेक योजनापत्रकाबद्दलचा आणि परिशिष्ट क व परिशिष्ट ड यांत सांगितलेल्या जमिनी सुधारण्याबद्दलचा व जमीन नवसाध्य करण्याबद्दलचा खर्च निरनिराळा दाखविणें.

(२) भांडवलाच्या हिशोबांत, दरेक योजनापत्रकाच्या संबंधानें बोर्डास झालेला एकंदर खर्च (त्या मानानें व्यवस्थेबद्दलच्या खर्चासुद्धां) निरनिराळा दाखविला पाहिजे, आणि त्याचप्रमाणें —

(अ) बोर्डाकडे गेलेल्या व परिशिष्ट क यांत सांगितलेल्या जमिनींची सुधारणा,

(ब) बोर्डाकडे गेलेल्या व परिशिष्ट ड यांत सांगितलेल्या जमिनींची सुधारणा,

(क) परिशिष्ट इ यांत सांगितलेल्या हद्दींच्या आंत असणाऱ्या कोणत्याही जागा नवसाध्य करणें,

यांच्या संबंधानें झालेला खर्चही भिन्नभिन्न दाखविला पाहिजे.

बोर्डाकडे आलेला सर्व पैसा सामान्य हिशोबाच्या खातीं जमा करणें.

७६. कलमें ७२, ७३ व ७४, यांअन्वयें आलेल्या रकमा आणि ह्या आक्टाअन्वयें बोर्डाकडे गेलेल्या किंवा जाणाऱ्या जमिनींचें किंवा इमारतींचें भाडें व त्यांच्या विक्रीच्या उत्पन्नाव्यतिरिक्त इतर सर्व उत्पन्न, यासुद्धां बोर्डाकडे आलेला सर्व पैसा, सामान्य हिशोबाच्या खातीं जमा केला पाहिजे.

सामान्य हिशोबाच्या खातीं जमा केलेला पैसा खर्चाच्या कोणत्या बाबींकडे लाविला पाहिजे तें.

७७. (१) सामान्य हिशोबाच्या खातीं जमा केलेला पैसा बोर्डानें ट्रस्टादाखल आपल्याकडे ठेवून, ह्यांत पुढें ठरविलें आहे तें खेरीजकरून, खालील खर्चाच्या बाबी भागविण्याच्या कामीं लावला पाहिजे. त्या बाबी येणेंप्रमाणें:—

(अ) कलमें ६२ तागाईत ६६ (हीं दोन्ही धरून) यांअन्वयें देणें असलेल्या व्याजाच्या व सिंकिंग फंडाच्या बोजाबद्दलच्या सर्व रकमा आणि कलमें ६८ व ७० यांअन्वयें देणें असलेल्या व्याजाच्या बोजाबद्दलच्या सर्व रकमा;

(ब) ह्या आक्टाअन्वयें बोर्डाकडे गेलेल्या किंवा जाणाऱ्या जमिनींचें भाडें व इतर उत्पन्न वसूल करण्याबद्दल निराळें एस्टाब्लिशमेंट ठेवण्याचा कांहीं खर्च असल्यास तो;

41

(क) मिळकतींच्या देखरेखीसाठीं किंवा महसुलाच्या इतर कारणांसाठीं जरूर असलेल्या, यादींत दाखविलेल्या कामगार लोकांत येत नाहींत अशा, लहानसान व इतर एस्टाब्लिशमेंटांचा खर्च;

(ड) कलम ७६ यांत ठरविल्याप्रमाणें बोर्डानें व्यवस्थेबद्दलच्या खर्चाची जी रक्कम महसुलाच्या खातीं वांटून दिली असेल ती; आणि

(इ) बोर्डाकडे गेलेल्या जमिनींवर व इमारतींवर म्युनिसिपल आक्टाअन्वयें द्यावयाच्या पट्ट्यांसंबंधानें व करांसंबंधानें बोर्डानें दिलेल्या सर्व रकमा.

(२) सामान्य हिशोबाच्या खातीं जमा असलेल्या कोणत्याही रकमा, भांडवला-संबंधी चालू खर्च भागविण्यासाठीं देण्याचा बोर्डास अधिकार आहे, आणि ह्याप्रमाणें दिलेल्या कोणत्याही रकमा, त्या ज्या सालीं दिलेल्या असतील त्या सालाच्या हिशोबांत दाखवून निकाल केला पाहिजे. सामान्य हिशोबाच्या खातीं जमा असलेल्या रकमा, भांडवलासंबंधी चालू खर्च भागविण्यासाठीं देण्याचा अधिकार.

७८. सामान्य हिशोबांत समावेश केलेल्या सर्व रकमा, खालील बाबतींच्या संबंधाच्या असतील त्याप्रमाणें, त्या हिशोबांत भिन्नभिन्न दाखविल्या पाहिजेत. त्या बाबती येणेंप्रमाणें:— सामान्य हिशोबांत, परिशिष्ट क व परिशिष्ट ड यांत सांगितलेल्या जमिनींसंबंधी व नवसाध्य केलेल्या जमिनींसंबंधी रकमा भिन्नभिन्न दाखविणें.

(१) बोर्डाकडे गेलेल्या व परिशिष्ट क यांत सांगितलेल्या जमिनी.

(२) बोर्डाकडे गेलेल्या व परिशिष्ट ड यांत सांगितलेल्या जमिनी.

(३) परिशिष्ट इ यांत सांगितलेल्या हद्दींच्या आंत असणाऱ्या कोणत्याही जागा नवसाध्य करणें.

(४) बोर्डाकडे जाणाऱ्या इतर जमिनी व इमारती.

## शिलकांची व्यवस्था.

७९. (१) कोणत्याही सालाच्या शेवटीं सामान्य हिशोबांत जमेकडे जी कोणतीही शिलक निघेल तिचा विनियोग, ह्यांत पुढें दिलेल्या विशेष ठरावास पात्र राहून, ह्या आक्टाअन्वयें बोर्डाकडे गेलेल्या किंवा जाणाऱ्या जमिनींच्या विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग करण्याकरितां जी रीत कलम ६४ ह्यांत सांगितली आहे, त्या रीतीनें केला पाहिजे. जमेकडील शिलकांचा विनियोग, भांडवलासंबंधाचा चालू खर्च भागविण्याच्या कामीं किंवा लोनांसंबंधानें कर्ज कमी करण्याच्या कामीं करणें.

(२) कोणत्याही सालाच्या शेवटीं सामान्य हिशोबांत खर्चाकडे जी कोणतीही शिलक निघेल ती भांडवलखातीं खर्चीं लिहिली पाहिजे आणि ती, कलमें ९२ तागाईत ९४ (हीं दोन्ही धरून) ह्यांतील ठरावांअन्वयें लगत पुढें काढावयाच्या लोनांत तिच्या रकमेचा समावेश करून भरून काढली पाहिजे, मात्र ह्या कलमाअन्वयें ज्या रकमा भांडवलखातीं खर्चीं लिहिण्यांत येतील त्यांची एकंदर बेरीज, बोर्डाच्या भांडवलासंबंधी एकंदर कर्जाच्या शेंकडा १९ टक्क्यांहून जास्त होतां कामा नये. खर्चाकडील शिलका भांडवल खातीं लिहिणें.

(३) मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा खर्चाकडील व जमेकडील सर्व शिलकांचा एक निराळा हिशोब ठेवला पाहिजे, आणि कलम १० अन्वयें जाहीर करण्यांत येईल त्या तारखेनंतरचें दहावें सरकारी साल संपल्यावर जेव्हां जेव्हां आणि जितके वेळां, मागील सरकारी सालाच्या शेवटापर्यंत तयार केलेल्या सदरहू प्रकारच्या हिशोबांत जमेकडे निवळ शिलक निघेल, तेव्हां तेव्हां व तितके वेळां, त्या निवळ शिलकेचा खालीं लिहिल्याप्रमाणें विनियोग केला पाहिजे:— दहाव्या वर्षानंतरच्या नफ्याच्या विभागाबद्दल विशेष ठराव.

(अ) ती शिलक, कलमें ७२ व ७३ ह्यांअन्वयें त्या सालीं कमिशनरानें बोर्डाला दिलेल्या एकंदर रकमेहून ज्यास्त नसल्यास, ती कार्पोरेशनास दिली पाहिजे;

(ब) ती शिलक, कमिशनरानें बोर्डाला सदहूप्रमाणें दिलेल्या एकंदर रकमे-हून जास्त असल्यास, तिचा विनियोग—

(१) पहिलें, कमिशनराकडून बोर्डास सदहूप्रमाणें देण्यांत आलेल्या एकंदर रकमेइतकी रकम कार्पोरेशनास देण्याच्या कामीं केला पाहिजे;

(२) दुसरें, जी रकम दरसाल दिली असतां व दर शेंकडा ३ टक्के व्याजानें लाविली असतां, ती पहिल्यानें दिल्याच्या तारखेपासून ६० वर्षांमध्यें, परिशिष्ट क यांत सांगितलेल्या ज्या कोणत्याही जमिनीचा खुल्या जागे-दाखल विनियोग केला असेल त्या जमिनीच्या, कलम ६७ याअन्वयें व कलम ६८, पोटकलम (१), विशेष ठराव (२), याअन्वयें ठरविलेल्या किंमतीबाबद्चें बोर्डास भांडवलासंबंधी असलेलें कर्ज फिटेल ती रकम सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल ह्यांस देण्याच्या कामीं किंवा देण्याकडे केला पाहिजे;

(३) तिसरें, सरकार व कार्पोरेशन यांस नफ्यादाखल समान हिशांनीं देण्याच्या कामीं केला पाहिजे: मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, ह्या पोटरकमेअन्वयें सरकारास द्यावयाची रकम कोणत्याही प्रसंगीं, बोर्डाकडे गेलेल्या व परिशिष्ट क यांत सांगितलेल्या जमिनींच्या संबंधानें व परिशिष्ट इ यांत सांगितलेल्या हद्दींच्या आंत असणाऱ्या नवसाध्य केलेल्या कोणत्याही जागांच्यासंबंधानें त्या वर्षामध्यें बोर्डास उत्पन्न झालेल्या भाड्यापासून जो एकंदर निवळ नफा झालेला असेल त्याच्या निमेहून जास्त असतां कामा नये, आणि जेव्हां, ह्या विशेष ठरावाअन्वयें सदरहू नफ्याच्या अर्ध्या रकमेहून कमी रकम सरकारास मिळेल तेव्हां अशा नफ्यापैकीं सगळी शिलक कार्पोरेशनास दिली पाहिजे.

### जबाबदाऱ्या पुऱ्या करण्याबद्दल हमी.

*बोर्डानें व्याज न दिल्यास किंवा सिंकिंग फंडाच्या रकमा व्याजीं न लाविल्यास काय करावें.*

८०. कलमें ९२ व ९४ ह्यांअन्वयें बोर्डानें द्यावयाचें कोणतेंही व्याज अगर कलम ६७ अन्वयें बोर्डानें, प्रसंगाप्रमाणें, सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांस किंवा कार्पोरेशनास द्यावयाची कोणतीही रकम बोर्डानें दिली नाहीं तर, किंवा कलम ९९ ह्याअन्वयें जरूर असल्याप्रमाणें बोर्डानें कोणतीही रकम दिली नाहीं किंवा निराळी काढून व्याजीं लाविली नाहीं, तर मुंबईच्या अकौंटंट जनरलानें, किंवा त्या त्या वेळीं सदरहू अकौंटंट जनरलाच्या हुद्याचीं कामें करणाऱ्या दुसऱ्या अमलदारानें, सदरहूप्रमाणें जी रकम देणें किंवा निराळी काढून व्याजीं लावणें जरूर असेल, ती रकम दिली पाहिजे किंवा निराळी काढून व्याजीं लाविली पाहिजे, आणि जी रकम सदरहूप्रमाणें सदरहू अकौंटंट जनरलाकडून देण्यांत येईल किंवा निराळी काढून व्याजीं लावण्यांत येईल, ती रकम कमिशनरानें ताबडतोब म्युनिसिपल फंडांतून सदरहू अकौंटंट जनरलास दिली पाहिजे, आणि मग, सरकार ह्यासंबंधानें पसंत करील तसा व सदरीं ठरविल्याप्रमाणें कमिशनरानें जी रकम म्युनिसिपल फंडांतून काढलेली असेल तिची भरपाई करण्यास पुरेसा होईल असा कोणताही विशेष कर बसविण्याचा कार्पोरेशनास अखत्यार आहे.

असा विशेष कर, म्युनिसिपल आक्टाअन्वयें वेळोवेळीं घ्यावयाच्या करांच्यातिरिक्त असला पाहिजे.

*सदरील शेवटल्या कलमांत सांगितल्याप्रमाणें कमिशनरानें पैसा न दिल्यास काय करावें.*

८१. (१) कलम ७२ किंवा ७३ यांत किंवा सदरील शेवटल्या कलमांत फर्माविल्याप्रमाणें कमिशनरानें पैसा दिला नाहीं तर म्युनिसिपल फंड किंवा कार्पोरेशननें घ्यावयाजोगा कोणताही कर जप्त करण्याचा सरकारास अधिकार आहे, आणि मग

म्युनिसिपल ॲक्टाच्या ९९ व्या कलमाचीं पोटकलमें (२) व (३) यांतील ठराव, जरूर असतील त्या सर्व फेरफारांनिशीं, अशा जतीस लागू होतील असें समजावें, आणि शिवाय, गेल्या शेवटल्या कलमांत ठरविल्याप्रमाणें एकादा विशेष कर बसविण्यास कार्पोरेशनला सांगण्याचा सरकारास अधिकार आहे.

(९) सदरील शेवटच्या कलमाअन्वयें कमिशनरानें दिलेल्या किंवा सदरहू कलमाअन्वयें द्यावयाच्या असून ह्या कलमाअन्वयें घेतलेल्या कोणत्याही पैशाचा बोजा बोर्डाच्या मिळकतीवर, नफ्याचा कोणताही विभाग होण्यापूर्वी, पडेल.

*बोर्डानें द्यावयाच्या रकमा न दिल्यास बोर्डाचा महसूल जप्त करण्याचा सरकारास अधिकार आहे.*

८२. कलम ८० ह्यांत सांगितल्याप्रमाणें, बोर्डानें कोणतीही रकम दिली नाहीं किंवा सदरीं सांगितल्याप्रकारें निराळी काढून पुन व्याजीं लाविली नाहीं, तर बोर्डाचें भाडें व इतर उत्पन्न जप्त करण्याचा सरकारास अधिकार आहे, आणि मग म्युनिसिपल ॲक्टाच्या ९९ व्या कलमाचीं पोटकलमें (२) व (३) यांतील ठराव, जरूर असतील त्या सर्व फेरफारांनिशीं, अशा जप्तीस लागू होतील असें समजावें.

## वार्षिक अंदाज.

*उत्पन्नाचा व खर्चाचा वार्षिक अंदाज चेअरमननें तयार करणें.*

८३. (१) चेअरमननें, दरसाल फेब्रुआरी महिन्यांत भरावयाच्या बोर्डाच्या एका विशेष सभेंत, लगत पुढच्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेरोजीं सुरू होणाऱ्या सालाबद्दलचा बोर्डाच्या उत्पन्नाचा व खर्चाचा अंदाज, बोर्ड वेळोवेळीं फर्मावील त्या तपशिलानिशीं व नमुन्याप्रमाणें बोर्डापुढें मांडिला पाहिजे.

(२) अशा अंदाजांत बोर्डाच्या सर्व जबाबदाऱ्या योग्य रीतीनें पुऱ्या करण्याकरितां आणि हा ॲक्ट चांगल्या रीतीनें अमलांत आणण्याकरितां तजवीज केलेली असली पाहिजे आणि तो पुरा करून छापला पाहिजे, आणि त्याची एक एक प्रत ज्या सभेपुढें तो मांडावयाचा ती भरण्यापूर्वीं निदान निवळ दहा दिवस दरेक ट्रस्टीकडे टपालानें किंवा इतर रीतीनें पाठविली पाहिजे.

*असे अंदाज बोर्डानें मंजूर करणें किंवा दुरुस्त करणें.*

८४. ह्याप्रमाणें बोर्डास सादर केलेल्या अंदाजाचा त्यानें विचार केला पाहिजे, आणि त्यांत फेरफार केल्यावांचून किंवा आपणास योग्य वाटतील ते फेरफार करून तो त्यानें मंजूर केला पाहिजे.

*अंदाज मंजुरीसाठीं सरकारास सादर करणें.*

८५. बोर्डानें याप्रमाणें मंजूर केलेला अंदाज सरकारास सादर केला पाहिजे. सरकारास योग्य वाटेल तर त्याला, तो अंदाज पोंहचल्यानंतर एका महिन्याच्या आंत कोणत्याही वेळीं, तो किंवा त्याचा कोणताही भाग नापसंत करून तो सुधारण्याकरितां परत पाठविण्याचा अधिकार आहे. सरकारानें तो अंदाज याप्रमाणें परत पाठविला तर बोर्डानें लौकर तो सुधारण्याच्या कामास लागलें पाहिजे, आणि याप्रमाणें सुधारलेला तो अंदाज सरकारास पुनः सादर केला पाहिजे. त्या अंदाजाची एक नकल कार्पोरेशनच्या अध्यक्षाकडे पाठविली पाहिजे.

*बोर्डाच्या रचनेच्या तारखेनंतरचे पहिले अंदाज सादर करण्याविषयीं व त्यांची व्यवस्था करण्याविषयीं तात्पुरता ठराव.*

८६. कलम १० अन्वयें जी तारीख जाहीर करण्यांत येईल तिच्यानंतर योग्य होईल तितक्या लवकर बोर्डाची एक विशेष सभा भरली पाहिजे, आणि चेअरमननें अशा विशेष सभेंत सदरीं सांगितलेल्या तारखेच्या दिवशीं त्या सरकारी सालाचा जो भाग बाकी राहिलेला असेल त्याबद्दलचा अंदाज बोर्डापुढें मांडिला पाहिजे, आणि मग गेल्या शेवटल्या तीन कलमांत ठरविलेल्या रीतीनें त्या अंदाजाची व्यवस्था केली पाहिजे.

*जरूर असेल तेव्हां पुरवणीचे अंदाज तयार करून सादर करण्याचा अधिकार आहे.*

८७. बोर्डास, ज्या सालाबद्दल असा कोणताही अंदाज मंजूर करण्यांत आला असेल, त्या सालामध्यें कोणत्याही वेळीं एकादा पुरवणीचा अंदाज तयार करवून आपणापुढें सादर करविण्याचा अधिकार आहे. असा दरेक पुरवणीचा अंदाज अव्वल वार्षिक अंदाज असल्याप्रमाणेंच, त्याचा बोर्डानें विचार करून तो मंजूर केला पाहिजे, आणि सरकारास सादर केला पाहिजे, आणि त्याची एक नकल कार्पोरेशनच्या अध्यक्षाकडे पाठविली पाहिजे.

भारी निकडीच्या प्रसंगांवांचून किंवा कोर्टाच्या हुकुमनाम्याचा वलगडा करण्याचा असल्यावांचून ५,००० रुपयांहून जास्त अशी कोणतीही रकम कोणत्या तरी अंदाजांत सामील केलेली असल्याशिवाय न खर्चणें.

८८. (१) भारी निकडीच्या प्रसंगाखेरीज पांच हजार रुपयांहून जास्त असणारी कोणतीही रकम बोर्डानें किंवा बोर्डाच्या वतीनें, अशी रकम त्या त्या वेळीं अमलांत असणाऱ्या व सरकारानें अखेर पसंत केलेल्या कोणत्या तरी अंदाजांत सामील केलेली असल्यावांचून, किंवा मुंबईच्या हैकोर्टाच्या हुकुमनाम्याअन्वयें किंवा न्यायसभेच्या निवाड्याअन्वयें बोर्डानें द्यावयाच्या रकमेंत सामील केलेली असल्यावांचून, खर्च करतां कामा नये.

(२) पांच हजार रुपयांहून जास्त असणारी कोणतीही रकम भारी निकडीच्या प्रसंगीं याप्रमाणें खर्च केली तर, त्याबद्दलच्या हकीकतीचा रिपोर्ट चेअरमनानें सरकारास लगेच केला पाहिजे व त्यासोबत, अशा जास्त खर्चाची रकम ज्या रीतीनें भरून काढण्याचें बोर्डानें योजिलें असेल तिजबद्दल खुलासा पाठविला पाहिजे.

## हिशोबांची रुजुवात.

हिशोब, सरकारी हिशोबतपासनिसांनीं दरसाल दोनदां रुजू घेणें व तपासणें.

८९. (१) बोर्डाच्या जमाखर्चाचे हिशोब, दरसाल दोनदां सरकारापुढें मांडले पाहिजेत आणि ते, सरकार वेळोवेळीं नेमील तशा हिशोबतपासनिसांनीं रुजू घेतले पाहिजेत व तपासले पाहिजेत.

दस्तऐवज हजर करण्यास हुकुम करण्याचा हिशोबतपासनिसांस अधिकार आहे.

(२) अशा रुजुवातीच्या व तपासणीच्या कारणांसाठीं हिशोबतपासनिसांस, त्यांस जरूर वाटतील तीं सर्व बुकें, खतें, करार, व्हौचर आणि इतर सर्व दस्तऐवज व कागदपत्र आपणापुढें हजर करण्याविषयीं लेखी समन्स करून फर्माविण्याचा, आणि अशीं कोणतींही बुकें, खतें, करार, हिशोब, व्हौचर, दस्तऐवज किंवा कागदपत्र ज्या कोणत्याही मनुष्यापाशीं असतील किंवा जो त्यांबद्दल जबाबदार असेल, त्याला अशा कोणत्याही रुजुवातीच्या व तपासणीच्या वेळीं किंवा ती ज्या पुढच्या वेळेवर ठेविली असेल त्या वेळीं आपणापुढें हजर होण्याविषयीं, आणि त्यांच्या संबंधानें इकरार करून त्यावर सही करण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

त्यांना मुशाहिरा सरकारानें ठरविणें.

त्यांचा रिपोर्ट हिशोबांच्या तेरिजासहित सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध करणें.

(३) सदरहू हिशोबतपासनिसांस, सरकार ठरवील तो मुशाहिरा बोर्डानें दिला पाहिजे, आणि त्याची रकम सामान्य हिशोबाच्या खातीं खर्ची घातली पाहिजे; आणि सदरहू रुजुवात व तपासणी पुरी झाल्यानंतर चवदा दिवसांच्या आंत, हिशोबतपासनिसांनीं त्या हिशोबांबाबत आपला रिपोर्ट बोर्डाकडे पाठविला पाहिजे, आणि त्यानें तो, त्या हिशोबांच्या तेरिजासह मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध करविला पाहिजे. हिशोबतपासनिसांच्या रिपोर्टाची व हिशोबांच्या तेरिजाची एक प्रत कार्पोरेशनच्या अध्यक्षाकडे पाठविली पाहिजे.

## बाब ७.—बोर्डाचे अमलदार व नोकर यांविषयीं.

### कामगार लोक किती असावे ते.

अमलदार व नोकर आणि त्यांचा पगार व नेमणुका यांची यादी बोर्डानें मंजूर करणें.

९०. ह्या आक्टाच्या कारणांकरितां जे अमलदार व नोकर ठेवणें जरूर व योग्य आहे, असें बोर्डास वाटेल त्यांची एक यादी त्यानें वेळोवेळीं तयार करून मंजूर केली पाहिजे. अशा यादींत, बोर्ड अशा दरेक अमलदाराकरितां किंवा नोकराकरितां मंजूर करील तो पगार, फी व नेमणुका यांची रकम व स्वरूप हीं नमूद केलीं पाहिजेत:

काहीं वर्गांच्या लोकांस, कित्येक कारणांव्यतिरिक्त अमलदार व नोकर न समजणें.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, कारागीर, पोर्टर व मजूर, आणि पोर्टर व मजूर यांचे मुकादम हे, ह्या कलमाच्या किंवा लगत पुढच्या कलमाच्या (त्याचीं पोटकलमें (५), (६) व (७) खेरीज करून) किंवा ९२ व्या कलमाच्या अर्थाप्रमाणें, अमलदार किंवा नोकर आहेत असें कधींही समजूं नये.

बोर्डानें खालील गोष्टींबाबत नियम करणें :—

९१. (१) बोर्डानें वेळोवेळीं खालील गोष्टींबाबत नियम केले पाहिजेत :—

रजा देण्याचें नियमन करण्याबाबत;

(१) बोर्डाच्या अमलदारांस व नोकरांस रजा देण्याचें नियमन करण्याबाबत;

रजेबद्दलच्या नेमणुका देण्याविषयीं अधिकार देण्याबाबत;

(२) सदरहू अमलदारांस व नोकरांस किंवा त्यांपैकीं कित्येकांस, ते रजेनें गैरहजर असतांना, नेमणुका देण्याविषयीं अधिकार देण्याबाबत;

(३) असे कोणतेही अमलदार किंवा नोकर रजेनें गैरहजर असतील त्या मुदतींत त्यांबद्दल काम करण्यासाठीं नेमलेल्या मनुष्यांस द्यावयाचा मुशाहिरा ठरविण्याबाबत ; — ऑफिशिएटिंग नेमणुकांची रकम ठरविण्याबाबत ;

(४) अशा सर्व अमलदारांच्या व नोकरांच्या नोकरीच्या मुदतींचें नियमन करण्याबाबत; — नोकरीच्या मुदतीचें नियमन करण्याबाबत ;

(५) अशा अमलदारांस व नोकरांस, किंवा त्यांपैकीं कोणत्याही असामीस नोकरी सोडल्यावर, ज्या शर्तीअन्वयें ग्राचुइटी किंवा कंप्याशनेट अलावन्सें मिळतील त्या शर्ती, आणि अशा ग्राचुइटींची किंवा कंप्याशनेट अलावन्सांची रकम ठरविण्याबाबत: — नेमणुका देण्याची शर्ते ठरविण्याबाबत ;

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा अमलदारांनीं व नोकरांनीं नोकरी सोडल्यावर, सदरीं सांगितल्याप्रकारच्या ग्राइचुटी किंवा कंप्याशनेट अलावन्सें मिळण्याचा हक्क त्या सर्वांस प्राप्त होईल किंवा त्यांपैकीं कोणत्या असामीस प्राप्त होईल हें ठरविणें बोर्डाच्या नजरेवर आहे ;

(६) ह्या आक्टाअन्वयें नेमिलेल्या अमलदारांनीं व नोकरांनीं बोर्डाच्या पसंतीनें स्थापलेल्या कोणत्याही प्राव्हिडेंट फंडांत किंवा अशा अमलदारांच्या व नोकरांच्या हितासाठीं बोर्डानें कोणताही प्राव्हिडेंट फंड स्थापला तर त्यांत, कांहीं ठरविलेल्या दरांनीं व कांहीं ठरविलेल्या शर्तीस पात्र राहून, वर्गणी भरण्याविषयीं अधिकार देण्याबाबत ; — प्राव्हिडेंट फंडांत वर्गणी भरण्याविषयीं अधिकार देण्याबाबत ;

(७) आपली कामगिरी बजावीत असतांना, अशा ज्या कोणत्याही अमलदारांस किंवा नोकरांस इजा होईल त्यांस, किंवा असे जे कोणतेही अमलदार किंवा नोकर मरण पावतील त्यांच्या मागें असणाऱ्या नातलगांस, ज्या शर्तींवर पेन्शनें, ग्राच्युइटी अगर कंप्याशनेट अलावन्सें देतां येतील त्या शर्ती ठरविण्याबाबत. — जखमांबद्दलचीं पेन्शनें किंवा कंप्याशनेट अलावन्सें द्यावयाच्या शर्ती ठरविण्याबाबत ;

## नेमणूक करणें वगैरेचे अधिकार.

९२. (१) दर महिना तीनशें रुपयांहून जास्त पगार नसणाऱ्या बोर्डाच्या अमलदारांस व नोकरांस नेमण्याचा, बढती देण्याचा, सस्पेंड करण्याचा, बर्तर्फ करण्याचा, दंड करण्याचा, कमी जागेवर घालण्याचा किंवा रजा देण्याचा अधिकार चेअरमननें, आणि इतर दरेक बाबतींत बोर्डानें, सदरहू नियमांतील आणि कलम ९० अन्वयें बोर्डानें तयार केलेल्या त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या यादींतील ठरावांस पात्र राहून, चालविला पाहिजे. — नेमणुका वगैरे कोणी करणें.

(२) बोर्डाच्या कोणत्याही अमलदारास किंवा नोकरास, अशा अमलदाराच्या किंवा नोकराच्या स्वतःच्या गैरवर्तणुकीच्या कारणाखेरीज इतर रीतीनें नोकरीवरून काढण्याचा, किंवा अशा अमलदारांस किंवा नोकरांस पेन्शनवर, ग्राच्युइटीवर किंवा कंप्याशनेट अलावन्सवर नोकरी सोडून जाण्याची परवानगी देण्याचा अधिकार, सदरीं सांगितलेल्या ठरावांस पात्र राहून, फक्त बोर्डानेंच चालविला पाहिजे.

९३. (१) बोर्डानें, सदरील शेवटल्या तीन कलमांपैकीं कोणत्याही कलमाअन्वयें केलेला प्रत्येक हुकुम किंवा नियम, तो बोर्डाच्या सेक्रेटरीस किंवा एन्जिनियरास किंवा चीफ अकौंटंटास लागू असेल तितक्यापुरता, सरकारच्या पूर्वमंजुरीस पात्र राहील. — कित्येक अमलदारांचा पगारवेगेरसंबंधाचे हुकुम, सरकारच्या मंजुरीस पात्र करणें.

(२) ह्या कलमांत "एन्जिनियर" ह्या शब्दाचा अर्थ, बोर्डाच्या नेहेमीच्या कामगार मंडळीमध्यें सर्वांत वरच्या दर्जाचा एन्जिनियर असा होतो, आणि तसेंच ज्या कोणत्याही वरिष्ठ अमलदारास बोर्डाचा कन्सल्टिंग एन्जिनियर ह्मणून वेळोवेळीं नेमण्यांत येईल तो अमलदार असाही होतो. — "एंजिनियर" या शब्दाची व्याख्या.

## बाब ८ — पोटकायदे.

९४. (१) बोर्डाला खालील बाबतींकरितां वेळोवेळीं पोटकायदे करण्याचा अखत्यार आहे :— — पोटकायदे करण्याचा बोर्डास अखत्यार आहे.

(अ) बोर्डाचे अधिकार व कर्तव्यें कमिट्यांकडे सोंपविण्याचें नियमन करण्याकरितां;

(ब) ह्या आक्टाअन्वयें त्यानें कामावर ठेविलेल्या मनुष्यांच्या समजुतीकरितां ;

(क) कलम ६० (२), (३) व (४) अन्वयें बोर्डाकडे गेलेल्या जमिनींची व्यवस्था व उपयोग करण्याकरितां ;

(ड) कलम १७ अन्वयें कोणत्याही ट्रस्टीस द्यावयाच्या फीची कमाल रकम ठरविण्याकरितां ;

(इ) कोणत्याही योजनापत्रकाअन्वयें गरीब किंवा कामकरी वर्गाच्या लोकांसाठीं बांधिलेलीं रहावयाचीं घरेंवगैरेची व्यवस्था, उपयोग व नियमन करण्याकरितां ;

(फ) सामान्यतः, ह्या आक्टाचे उद्देश सिद्धीस नेण्याकरितां.

(२) तसेंच, सदरहूप्रमाणे बोर्डानें केलेले कोणतेही पोटकायदे वेळोवेळीं फिरविण्याचा, बदलण्याचा किंवा रद्द करण्याचाही बोर्डास अख्त्यार आहे.

पोटकायदे पसंत व प्रसिद्ध करणें.

९५. (१) कोणताही पोटकायदा किंवा पोटकायद्यांत केलेला कोणताही फेरफार अगर तो कायदा रद्द करण्याचा ठराव सरकाराकडून पसंत करण्यांत येऊन ती पसंती मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध करण्यांत येई तोंपर्यंत, अमलांत येणार नाहीं ; आणि कोणताही पोटकायदा किंवा पोटकायद्यांत केलेला कोणताही फेरफार अगर तो कायदा रद्द करण्याचा ठराव सदरील गॅझेटांत लागोपाठ तीन आठवड्यांपर्यंत प्रसिद्ध केला जाईल तोंपर्यंत सरकाराकडून पसंत केला जाणार नाहीं.

(२) सदरहू गॅझेटांत जाहिरनामा देऊन त्याच्याद्वारें, ह्या कलमाच्या व सदरील शेवटल्या दोन कलमांच्या ठरावांअन्वयें करून प्रसिद्ध केलेला कोणताही पोटकायदा किंवा नियम कोणत्याही वेळीं रद्द करणें सरकारास कायदेशीर होईल.

पोटकायद्यांच्या भंगाबद्दल शिक्षा.

९६. बोर्डास, कलम ९४ अन्वयें केलेल्या पोटकायद्यामध्यें, त्यांच्या भंगाबद्दल ज्या शिक्षा त्यास योग्य वाटतील त्या ठरविण्याचा अख्त्यार आहे : मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, पोटकायद्याच्या कोणत्याही एका भंगाबद्दलची शिक्षा शंभर रुपयांहून जास्त असूं नये, आणि एकसारख्या चालू असणाऱ्या भंगाच्या बाबतींत, अशा भंगाची नोटीस तो भंग केल्याबद्दल अपराधी असणाऱ्या मनुष्यास बोर्डानें दिल्यानंतरच्या दरेक दिवसाबद्दल द्यावयाची कोणतीही शिक्षा पन्नास रुपयांहून जास्त असूं नये.

पोटकायदे प्रदर्शित करणें.

९७. बोर्डानें सदरहू पोटकायदे इंग्रजी, मराठी व गुजराथी या भाषांमध्यें छापवून सोईवार ठिकाणीं टांगून ठेवविले पाहिजेत.

## भाग ९.—शिक्षा.

बोर्डाशीं केलेल्या करारामध्यें हितसंबंध असण्याबद्दल.

९८. जो कोणताही मनुष्य बोर्डाचा ट्रस्टी किंवा अमलदार किंवा नोकर असून बोर्डाशीं, बोर्डानें किंवा बोर्डाच्या वतीनें केलेल्या कोणत्याही करारांत किंवा सोंपलेल्या कोणत्याही कामांत कोणताही भाग किंवा हितसंबंध, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें, संपादन करील, त्यानें हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा ह्याच्या १६८ व्या कलमाअन्वयें शिक्षा करण्याजोगा अपराध केला आहे असें मानलें पाहिजे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, जो कोणताही मनुष्य नालायक नाहीं असें किंवा ज्याचा कोणत्याही करारांत किंवा कामांत भाग किंवा हितसंबंध आहे म्हणून समजूं नये असें १४ व्या कलमाचें पोटकलम (२) याअन्वयें ठरविलेलें आहे, त्याला ह्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

९९. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या २१ व्या कलमाच्या अर्थाप्रमाणें सरकारी नोकर नाहीं असा, ह्या आक्टाअन्वयें कामावर ठेविलेला जो कोणताही मनुष्य, कोणतेंही हुद्द्यासंबंधाचें काम करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल अगर आपल्या हुद्द्याचीं कामें करण्यामध्यें कोणत्याही मनुष्यावर मेहरबानी किंवा इतराजी करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल अगर बोर्डाशीं, किंवा सरकारी नोकर ह्या नात्यानें कोणत्याही सरकारी नोकराशीं किंवा सरकाराशीं वग चालवून कोणत्याही मनुष्याचें हित किंवा अहित करण्याबद्दल किंवा करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल, कोणत्याही मनुष्याकडून स्वतःकरितां किंवा इतर कोणत्याही मनुष्याकरितां कायदेशीर मुशाहिन्याखेरीज इतर कांहीं बक्षिसादाखल घेईल किंवा मिळवील, किंवा घेण्याचें कबूल करील किंवा मिळविण्याचा प्रयत्न करील, तो, सरकारी नोकरानें केलेल्या तशाच अपराधाबद्दल हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा यांत जी शिक्षा सांगितली आहे, त्याच शिक्षेस पात्र होईल. कायद्याविरुद्ध कांहीं घेण्याबद्दल.

१००. ज्या कोणत्याही मनुष्यास, कलम ८९ (२) अन्वयें कोणत्याही हिशोबतपासनिसाकडून, आपल्यापुढें हजर होण्यास, किंवा कोणतींही बुकें, खतें, करार, हिशोब, व्हौचर, दस्तऐवज अगर कागदपत्र हजर करण्यास किंवा कोणताही इकरार करण्यास अगर त्यावर सही करण्यास जेव्हां योग्य रीतीनें हुकुम करण्यांत येईल, तेव्हां त्यानें तसें करण्यास नाकारिलें किंवा हयगय केली, तर त्यास अशा हयगयीच्या किंवा इनकाराच्या दरेक बाबतींत शंभर रुपयेंपर्यंत दंड होईल. हिशोबतपासनिसापुढें हजर होण्यास वगैरे नाकारण्याबद्दल किंवा हयगय करण्याबद्दल.

१०१. ह्या आक्टाच्या किंवा कलम ९४ ह्याअन्वयें केलेल्या कोणत्याही पोटकायद्याच्या विरुद्ध केलेल्या सर्व अपराधांचा इन्साफ हातीं घेण्याचा अधिकार प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटास आहे. या आक्टाविरुद्ध केलेल्या अपराधांचा इन्साफ हातीं घेण्याचा अधिकार.

कोणत्याही अपराध्याकडून वसूल केलेल्या सर्व दंडाच्या व नुकसानीबद्दलच्या रकमा बोर्डास दिल्या पाहिजेत.

## बाब १०.—किरकोळ.

१०२. जेव्हां जेव्हां कोणत्याही कारणासाठीं या आक्टाअन्वयें नेमलेला कोणताही दिवस रविवारीं किंवा सार्वजनिक सुटीच्या दिवशीं येईल, तेव्हां तेव्हां, त्या दिवशीं करावयाचें ह्मणून नेमिलेलें काम त्या रविवारच्या किंवा सार्वजनिक सुटीच्या लगतच्या पुढच्या दिवशीं केलें पाहिजे. कोणत्याही कारणासाठीं नेमिलेला दिवस रविवारीं किंवा सार्वजनिक सुटीच्या दिवशीं येईल तर त्याबद्दल ठराव.

१०३. ह्या आक्टांत सांगितलेलीं अंतरें आडव्या सपाटीवर सरळ रेषेनें मोजिलीं पाहिजेत. अंतरें मोजण्याबाबत.

१०४. ह्या आक्टाअन्वयें केलेल्या किंवा केली आहे असें दिसणाऱ्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही मनुष्यावर चालवावयाचा दावा किंवा इतर काम, त्या मनुष्यास करावयाच्या दाव्याबद्दल किंवा इतर कामाबद्दल आणि त्याच्या कारणाबद्दल एका महिन्याची आगाऊ लेखी नोटीस दिल्याशिवाय, आणि तसेंच अशा दाव्याचें किंवा इतर कामाचें कारण उत्पन्न झाल्यापासून साहा महिन्यांनंतर, सुरू करतां कामा नये. दाव्यांची मुदत.

[ ]

## परिशिष्ट अ.

( कलम ४७ पहा. )

**या आक्टाअन्वयें जमिनी घेण्याच्या कामाचें नियमन करण्याबाबतचे सन १८९४ च्या जमीन घेण्याविषयींच्या आक्टाचे अंश.**

भाग १.—प्रथमारंभींचे ठराव : कलम ३ च्या रकमा (ड), (ई) व (फ) खेरीज करून.

भाग २.—जमीन घेणें: कलम ४ चें पोटकलम (१), कलम ६, आणि कलम १७ चें पोटकलम (२), हीं खेरीज करून.

भाग ३.—कोर्टास लिहून पाठविणें व त्यावर काम चालविण्याची रीतिः कलम २३ चें पोटकलम (२) आणि कलम २४ च्या रकमा (६) व (७) खेरीज करून.

भाग ४.—मोबदल्याची वांटणी.

भाग ५.—पैका देणें.

भाग ६.—जमिनीचा थोडक्या मुदतीपर्यंत भोगवटा.

भाग ८.—किरकोळ : कलम ५४ खेरीज करून.

---

## परिशिष्ट ब.

(कलम ५८ पहा.)

**डिबेंचरचा नमुना.**

**मुंबई शहर सुधारण्यासाठीं ट्रस्टी.**

तारीख सन १८ .

मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदेकानू करणाऱ्या मंडळीचा, "सन १८९८ चा मुंबई शहर सुधारण्याबाबत आक्ट" या नांवाचा सन १८९८ चा आक्ट नंबर यापरत्वें आह्मी मुंबई शहर सुधारण्यासाठीं ट्रस्टी हे. अ. ब. राहणार यानें आह्मांस दिलेल्या रुपये च्या रकमेऐवजीं सदरहू यास, किंवा त्याच्या हुकुमाप्रमाणें, याच्या तारखेनंतर रुपये ची सदरहू रकम, आणि तारीख रोजीं आणि तारीख रोजीं असें दर सहा महिन्यांनीं दरसाल दरशेंकडा प्रमाणें व्याज देण्याबद्दल वचन देतों.

आमच्या सामायिक शिक्कयानिशीं दिला असे, आज तारीख माहे सन १८९ .

(सामायिक शिक्का.)

(चेअरमन व दोन ट्रस्टी यांच्या सह्या.)

---

## परिशिष्ट क.

### ज्या जमिनी मलिका माआझमांची मिळकत असून बोर्डाकडे जातात त्या जमिनी दाखविणारें.

( कलम ६० पहा. )

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | किंमत, रकम. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | **मैदानें.** ( ठेविलेला प्लान अ. ) | चौरस वार. | रु. | |
| १ (अ) ते (न) धरून. | ... | १७६५, ३८००, ३९०१, ३३८९ व दुसरे. | यांत, खालीं सांगितलेल्या चतुःसीमेंतील मलिका माआझमांकडे गेलेल्या रिकाम्या जमिनीचे भाग येतात. त्या चतुःसीमा येणेंप्रमाणें :—**उत्तरेस,** जी. आय्. पी. रेलवेच्या परळ स्टेशनापासून वरळी गांवास जाणारा रस्ता; **दक्षिणेस,** अंशतः महालक्ष्मी व अंशतः बेलासिस रोड; **पूर्वेस,** बी. बी. ॲण्ड सी. आय्. रेलवे; आणि **पश्चिमेस,** समुद्र ... ... ... ... | ... | ... | ह्या प्लाटच्यासंबंधानें बोर्डाच्या भांडवलासंबंधी कर्जावर बोजा ठेविलेला नाहीं. |
| | | | **केनेडी सी फेस.** (ठेविलेला प्लान ब.) | | | |
| २ | ... | ८४२६ | (अ) चतुःसीमाः **उत्तरेस,** चर्नी रोड लेव्हल क्रासिंगकडे जाणारा रस्ता; **दक्षिणेस,** चर्चगेट स्ट्रीट स्टेशनाची उत्तर सीमा; **पूर्वेस,** बांबे बरोडा ॲण्ड सेंट्रल इंडिया रेलवे; आणि **पश्चिमेस,** समुद्र ... ... ... | ३३९१२ | ... | ह्या जागेंतील जो भाग हल्लीं घोडेरस्त्याकरितां व पायरस्त्याकरितां वापरला जातो तो भाग खेरीज करून, व जोंपर्यंत तो भाग तसा वापरला जाईल तोंपर्यंत, कलम ६७च्या कारणांकरितां सरासरी किंमतः— (अ) खुल्या जागेदाखल विनियोग केल्यास दर चौरस वारास रुपये ९. (ब) इमारतीच्या कारणांसाठीं विनियोग केल्यास, दर चौरस वारास रुपये १०. |
| | | | (ब) चतुःसीमाः **उत्तरेस,** चर्च गेट स्ट्रीटची दक्षिण बाजू; **दक्षिणेस,** बोट हौस पुलास जाणाऱ्या दक्षिणचे रस्त्याची पश्चिमेकडील उतरण; **पूर्वेस,** बांबे बरोडा ॲण्ड सेंट्रल इंडिया रेलवे; आणि **पश्चिमेस,** समुद्र ... ... | ८३८२१ | ... | |

परिशिष्ट क.—(पुढें चालू.)

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | किंमत, रकम. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | **कूपरेज प्लाट.** (ठेविलेला प्लान क.) | चौरस वार. | रु. | |
| ३ | ... | ९९६३ | याच्या चतुःसीमा : उत्तरेस, ब्यांडस्टाण्ड सर्कल; दक्षिणेस, वोडहौस रोड ; पूर्वेस, मेयो रोडची पश्चिम बाजू दक्षिणेकडे वाढवून काढलेली रेषा; आणि पश्चिमेस, क्वीन्स परेड रोड ... ... ... ... | ६६१७८ | ... | कलम ६७ च्या कारणांकरितां सरासरी किंमत दर चौरस वारास रुपये १०. |
| | | | **सेक्रेटेरियट प्लाट.** (ठेविलेला प्लान क.) | | | |
| ४ | ... | ८४३४ | याच्या चतुःसीमा : उत्तरेस, एल्फिन्स्टन कालेज व न्यू सेक्रेटेरियट; दक्षिणेस व पश्चिमेस, मेयो रोड; आणि पूर्वेस, हार्नबी रोड ... | १७७०० | ... | कित्ता. कित्ता. दर चौरस वारास रुपये १९. |
| | | | **मरीन लैन्स एस्टेट.** (ठेविलेला प्लान ड.) | | | |
| ५ | ... | ८४९२, ८४९३ | याच्या चतुःसीमा : उत्तरेस, अंशतः सरकारी बंगला नंबर ४१ च्या कंपौंडाची दक्षिण बाजू व अंशतः सरकारचा ठराव नंबर २ सी. डब्ल्यू—४, तारीख ३ जानेवारी सन १८८१ यावरून लष्करी कारणांसाठीं राखून ठेवलेल्या प्लाट "क" ची दक्षिण सीमा; दक्षिणेस, चर्च गेट स्ट्रीट; पूर्वेस, एस्प्लेनेड व मेयो रोड; आणि पश्चिमेस, मरीन लैन्स रोड (मरीन स्ट्रीट) ... ... ... | १२२१६३ | १२२१६३० | |
| | | | **वेलिंग्टन् लैन्स प्लाट.** (ठेविलेला प्लान क). | | | |
| ६ | ... | ९९६२, ९९६३ | याच्या चतुःसीमा : उत्तरेस, मेयो रोड ; दक्षिणेस, वोडहौस रोड ; पूर्वेस, हार्नबी रोड; आणि पश्चिमेस, मेयो रोडची पश्चिमबाजू | | | |

परिशिष्ट क.—(पुढें चालू.)

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | किंमत, रकम. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | चौरस वार. | रु. | |
| | | | दक्षिणेकडे वाढविली ह्मणजे जी रेषा, या परिशिष्टाच्या ३ ऱ्या नंबराखालीं वर्णन केलेल्या प्लाटची पूर्वेकडील सीमा होते ती रेषा ... | ४२३९४ | ४२३९४० | |
| | | | **वोडहौस रोड प्लाट.** | | | |
| | | | ( ठेविलेला प्लान क. ) | | | |
| ७ | ... | ९९६१ | हा वोडहौस रोड व कुलाबा काझवे रोड यांच्या दर्म्यान असून, उत्तरेस हे रस्ते जेथें एकमेकांस मिळाले आहेत तेथपासून दक्षिणेस बांबे अँण्ड बरोडा रेलवेच्यी व जी. आय्. पी. चीं सायडिंग्स आणि ट्रामवे कंपनीचें आवार यांच्या हद्दींपर्यंत पसरलेला ; मात्र यांत एल्फिन्स्टन कालेजांतील विद्यार्थ्यांच्या राहण्याच्या जागांचें स्थान येत नाहीं ... ... | ९९६२९ | ९९६२९० | |
| | | | **कॉटन ग्रीन प्लाट.** | | | |
| | | | (ठेविलेला प्लान क.) | | | |
| ८ | ... | ९९६१ | ज्याच्या चतुःसीमा, उत्तरेस बांबे ॲण्ड बरोडा रेलवेचें आवार, दक्षिणेस खासगी जमीन, व पूर्वेस कुलाबा काझवे, अशा आहेत तो त्रिकोणाकृति प्लाट ... ... ... | १३१०९ | १३१०९० | |
| | | | **साल्यूटिंग ब्याटरी प्लाट.** | | | |
| | | | (विलेला प्लान क.) | | | |
| ९ | ... | | याच्या चतुःसीमा : उत्तरेस, अपालो बंदर रोड ; दक्षिणेस, लान्सडौन रोड ; पूर्वेस, ब्याटरी स्ट्रीट ; आणि पश्चिमेस, कुलाबा काझवे ... ... ... ... | ९६०० | २८०००० | |

परिशिष्ट क.—(पुढें चालू.)

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | किंमत, रकम. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | चौरस वार. | रु. | |
| | | | **क्रेसेंट सैट.** | | | |
| | | | ( ठेविलेला प्लान क. ) | | | |
| १० | ... | ८४३३ | ज्याच्या समोर सेलर्स होम व एल्फिन्स्टन कालेज हीं असून, उत्तरेस राम्पार्ट रो आहे, तो अर्ध वर्तुलाकृति प्लाट ... ... .. | ३१९५७ | ७९८९२६ | |
| | | | **ओल्ड टाउन बराक्सच्या दक्षिणेकडील प्लाट.** | | | |
| | | | (ठेविलेला प्लान ड.) | | | |
| ११ | ... | ९३०९ | याच्या चतुःसीमाः उत्तरेस, ज्यांत कमिसेरियट व पे आफिसें आहेत तीं टाउन बराक्स; दक्षिणेस व पूर्वेस, मिंट रोड; आणि पश्चिमेस, बझार गेट स्ट्रीट ... ... ... | २१६६ | ६४९८० | |
| | | | **हार्नबी रोड प्लाट.** | | | |
| | | | ( ठेविलेला प्लान इ.) | | | |
| १२ | ... | ८४६३, ८४६४ | वाडबी व हार्नबी रोड यांच्या दर्म्यान असून, याचा उत्तरभाग हे रस्ते व्हिक्टोरिया टर्मिनसच्या समोर जेथें एकमेकांस मिळतात तेथपासून एस्प्लेनेड व हार्नबी रस्ते एकमेकांस मिळतात तेथपर्यंत आहे, व दक्षिणभाग फ्रीअर फौन्टनच्या समोर आहे, मात्र त्यांत आधींच पट्ट्यानें दिलेल्या जागा येत नाहींत व खालीं सांगितलेल्या इमारतींच्या जागाही येत नाहींत, त्या इमारती येणेंप्रमाणें :<br>जॉन कॉनन हाय् स्कूल,<br>फ्रीअर फ्रेचर स्कूल,<br>अलेक्झान्ड्रा नेटिव्ह गर्ल्स इंग्लिश इन्स्टिट्यूशन,<br>टेलिग्राफ सिग्नलर्स कार्टर्स,<br>काथिड्रल बॉइज् हाय् स्कूल,<br>कित्ता गर्ल्स कित्ता,<br>कित्ता चापलेन्स कार्टर्स,<br>कोटांतील धर्मार्थ दवाखाना: | | | |

परिशिष्ट क.—(पुढें चालू.)

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबरशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | किंमत, रकम. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | चौरस वार. | रु. | |
| | | | तरी सरकारी कोंडवाडे आणि एन्जिनीयर्स स्टोअर्स हे हल्लीं ज्या जागीं आहेत त्या जागा येतात, मात्र सदरहू कोंडवाडे व स्टोअर्स दुसरी एकादी जी जागा सरकार पसंत करील त्या जागीं बोर्डाच्या खर्चानें नेण्यांत येतील तोंपर्यंत सदरहू जागेचा निर्विवाद उपयोग करण्याचा हक्क सरकारास आहे—बोर्डाकडे आलेला प्लाट खालीं सांगितल्याप्रमाणें आहे— | | | |
| | | | रिकाम्या जागा ... ... ... | ७१०९१ | १४२१०२० | |
| | | | **क्राफर्ड मार्केटच्या दक्षिणेचा त्रिकोणाकृति प्लाट.** | | | |
| | | | (ठेविलेला प्लान ड.) | | | |
| १३ | ... | ८४७४ | याच्या चतुःसीमा: दक्षिणेस क्राफर्ड मार्केट; पूर्वेस पाल्टन रोड; आणि पश्चिमेस हार्नबी रोड ... ... ... ... | ९९६९ | १९९३८० | |
| | | | **डिस्पेन्सरी प्लाट.** | | | |
| | | | (ठेविलेला प्लान ड.) | | | |
| १४ | ... | ८४७८ | याच्या चतुःसीमा: उत्तरेस जाफर सुलेमानचा दवाखाना; दक्षिणेस मुक्ति फौजेचें ठिकाण; पूर्वेस जी. आय्. पी. रेल्वे; आणि पश्चिमेस हार्नबी रोड ... ... ... | १६९२ | ३३८४० | |
| | | | **म्युनिसिपल आफिसच्या उत्तरेचा प्लाट.** | | | |
| | | | (ठेविलेला प्लान ड.) | | | |
| १५ | ... | ८४७३ | याच्या चतुःसीमा: उत्तरेस सार्वजनिक रस्ता; दक्षिणेस खासगी रस्ता; पूर्वेस हार्नबी रोड; आणि पश्चिमेस कार्पोरेशनला पट्यानें दिलेली जमीन ... ... ... | ६६०० | १९८००० | |

परिशिष्ट क.—(समाप्त.)

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | किंमत, रकम. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | चौरस वार. | रु. | |
| | | | **चौपाटी एस्टेट.** | | | |
| | | | ( ठेविलेला प्लान फ. ) | | | |
| १६ | ... | ७२९८ | (१) चतुःसीमाः उत्तरेस, अंशतः गिब्स रोडास जाऊन मिळणारा सार्वजनिक मार्ग व अंशतः खासगी मिळकती ( सर्व्हे नंबर ७२९९–७३०२ ); दक्षिणेस, अंशतः क्विन्स रोड, अंशतः बॉडी गार्ड लैनींकारितां राखून ठेविलेला प्लाट व अंशतः शिडी रस्ता; पूर्वेस गांवदेवी रस्ता; आणि पश्चिमेस, उत्तरेकडील हद्दीचा सार्वजनिक मार्ग जेथें गिब्स रोडला मिळतो तेथून शिडी रस्त्यापर्यंत जाणारी विषम रेषा :— | | | |
| | | | (अ) टेंकडीच्या उतरणीची जमीन... | ९२६७९ | ... | |
| | | | (ब) इमारती जमीन ... ... | ८२४७३ | ८२४७३० | |
| | | ७३०६ | (२) चतुःसीमा : उत्तरेस खासगी मिळकत; दक्षिणेस चौपाटी रोड; पूर्वेस व पश्चिमेस खासगी मिळकत ... ... ... | ७१९० | ७१९०० | |
| | | | **दादर येथील पोलीस लैनींचा प्लाट.** | | | |
| | | | ( ठेविलेला प्लान ग.) | | | |
| १७ | ... | १२६२ १अ–४<br>१२६३ | याच्या चतुःसीमाः उत्तरेस व पूर्वेस खासगी जमिनी; दक्षिणेस दादर रोड; आणि पश्चिमेस जी. आय्. पी. रेलवे ... | ९२३४ | ९२३४० | |
| | | | ( ठेविलेला प्लान ह.) | | | |
| १८ | ... | २४८६<br>२४८७<br>३७<br>८<br>१०१<br>६१<br>९० | परळ एस्टेट ... ... ... ...<br>मात्र बॉडी गार्ड लैनी व ब्याण्डस्मेन्स क्वार्टर्स या इमारतींचें सामान काढून नेण्याचा हक्क सरकारास असून तो, १० व्या कलमाअन्वयें जाहीर करण्यांत येईल त्या तारखेपासून १२ महिन्यांच्या आंत चालविण्यांत आला पाहिजे. | ३३०४६९ | ९९१४०७ | |
| | | | एकूण रकम रुपये... | ... | ७२६०९९२ | |

# परिशिष्ट ङ·

## परिशिष्ट ड.

(कलम ६० पहा.)

ज्या जमिनी कार्पोरेशनची मिळकत असून बोर्डाकडे गेल्या आहेत त्या दाखविणारें.

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबरार्शी जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | रकम. | एकंदर रकम. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | **कॉनाट रोड एस्टेट.** | | | | |
| | | | (ठेविलेला प्लान आय्.) | | | | |
| | | | **वार्ड इ.** | | | | |
| १ | ... | ... | ज्याच्या उत्तरेस रिकामी जमीन, दक्षिणेस ससेक्स रोड, पूर्वेस खासगी मिळकत, आणि पश्चिमेस परळ रोड आहे तो प्लाट— | | | | |
| | | | प्लाट् अ, ब व क ... ... | १,१६९ | ... | १०,९२१ | ... |
| | | | ,, इ, फ, ग व ह ... ... | १,९२८ | ... | ७,६४० | ... |
| | | | सडकेसाठीं राखून ठेवलेली जागा .. | १,२९६ | ... | ६,४८० | ... |
| | | | प्लाट् आय्, के, ल व म ... .. | २,८१७ | ... | १४,०८९ | ... |
| ब | ... | ... | ब निशाणीचा प्लाट. ... ... | १०,००२ | ... | ९०,०१० | ... |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ... | ... | ज्याच्या उत्तरेस ससेक्स रोड, दक्षिणेस कानाट रोडच्या बाजूच्या खासगी मनुष्यांना विकत दिलेल्या जमिनी, पूर्वेस मिस्तर तय्यबअली महंमदअली यांस विकत दिलेली जमीन, आणि पश्चिमेस परळ रोडच्या बाजूचे खासगी मनुष्यांना विकत दिलेले प्लाट आहेत तो प्लाट— | | | | |
| | | | प्लाट नंबर ६ ते १६ धरून.... .. | ४,२६३ | . | २१,५७८ | ... |
| ३ | ... | ... | ज्याच्या उत्तरेस रिकामी जमीन, दक्षिणेस कानाट रोड, पूर्वेस घोडपदेवरोड, आणि पश्चिमेस ससेक्स रोड आहे तो प्लाट— | | | | |
| | | | प्लाट नंबर १९ ते ४० धरून. .. | १९,७५२ | | ७८,७६० | |
| | | | एकंदर, कॉनाट रोड एस्टेट. | | ३६,८२७ | | १,९३,०७४ |
| | | | **आग्रिपाडा एस्टेट.** | | | | |
| | | | ( ठेवलेले प्लान ज आणि के.) | | | | |
| | | | **वार्ड ड.** | | | | |
| ४ | ३८८०(१) | ३४१० | आर्थर रोड ... .... ... ... | ७,७५० | ... | २५,१८८ | ... |
| ५ | ३८७९ | ३४०९ | कित्ता ... ... .... .. | ६,९९६ | ... | १७,४९० | ... |

परिशिष्ट ड—(पुढें चालू.)

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ आणि वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | रकम. | एकंदर रकम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | आग्रीपाडा एस्टेट—पुढें चालू. | | | | |
| | | | वार्ड ई—पुढें चालू. | | | | |
| ६ | ४२९७(९) | १/३९१६ | | २,७९२ | ... | ६,८८० | ... |
| ७ | ७२०३ ते ७२०६ | १/३४९९<br>१/३४९६ | | ८,९७९ | ... | २६,९२९ | ... |
| ८ | ४९४४,४९४७<br>४९४८,४२६४ | ३४८३ | | २,४६८ | ... | ९,२९९ | ... |
| ९ | ४९२०,४९३९<br>४९४३,४२६३ | १ अ/३४८४ | | २,३०६ | ... | १३,००० | ... |
| १० | ४९६७ | ३४८९ | | १७,७४० | ... | ६२,०९० | ... |
| ११ | ४२६८ | १/३४८१ | | १,७४० | ... | ६,०९० | ... |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | ४२५७ (२)<br>४३५२,४३५३<br>४२७० | १अ.१ब.१क.१ड./३४८५<br>१अब. १अक. ४/३४८६<br>१ अ. ते १ फ./३४८७ | आग्रीपाडा. ... ... ... | १०,५६० | ... | ४४,८९३ | ... |
| १३ | ४०९७ ते ४०९९ | १·२·३·५/३५२८<br>१/३५०६ | | *५७,७०८ | ... | १,७३,१२४ | ... |
| १४ | ४४३०(१) | १·३/३५२७ ३५२५<br>१·२·३ व ५/३५२९<br>१/३५०५ | | *२४५,१०७ | ... | ७,३५,३११ | ... |
| १५ | ४४५७–५९ | १/३५३३ | रिपन रोड ... ... ... ... | १९,२९७ | ... | ६९,४६९ | ... |
| १६ | ४०६६–६७ | १क/३५०८ | आर्थर रोड ... ... ... ... | *७,७०४ | ... | २७,९६६ | ... |
| १७ | ४०७२–७४ | १/३५३१ | रिपन रोड ... ... ... ... | ५,९०८ | ... | १७,७२४ | ... |
| १८ | ४५६६ | २ अ/३४८७ १/३४८६<br>४/३४८२ | हेन्स रोड ... ... ... ... | ६,३९३ | ... | २७,१७० | ... |
| क | ... | ... | आग्रीपाडा ... ... ... ... | २,६९० | ... | ५,३८० | ... |
| ड | ... | ... | डी-लाइल रोड ... ... ... | ५,१९६ | ... | २४,०७२ | ... |
| इ | .... | ... | आर्थर रोड... ... ... ... | *१,५२५ | ... | ६,१०० | ... |
| | | | एकंदर, आग्रीपाडा एस्टेट ... ... | | ४१,२८१ | | १२,९८,१३७ |

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबरांशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ आणि वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | रकम. | एकंदर रकम. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | माटुंगा येथील जमिनी (ठेवलेला प्लान ळ). वार्ड फ. | | | | |
| १९ | ७८०४ | ८०९ | | *३,५५८ | ... | ३,५५८ | ... |
| | ७७८१ | प १६ / ९२६ | | | | | |
| | प / ७७८० | प १७ / ९२६ | | | | | |
| | प / ७७७९ | प १८ / ९२६ | | | | | |
| | प / ७७७८ | प १९ / ९२६ | | | | | |
| २० | प / ७७९७ | प २ / ९२७ | | *३,७९१ | ... | ५,६८७ | |
| | प / ७७७३ | प १ / ९२४ | | | | | |
| | प / ७७७२ | प २ / ९२४ | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प/७७६७ | १६/९२४ | | | | | | |
| २१ | ७७७० | ४ अ/९२४ | | | | | | |
| २२ | ७८०० | डब्ल्यू १/९२८ | | | *४८ | ... | | |
| २३ | | डब्ल्यू १/९२८ | | | *३१३ | ... | | |
| २४ | प/७६९२, प/७७८४(१) | प ८१/९२९, प १३/९२६ | नवा दादर–माटुंगा रोड | ... | ९९ | ... | | |
| २५ | ७७८२, प/७७८३ | प १४ डब्ल्यू १९/९१६ | | | *१,२९६ | ... | ९,४६९ | .. |
| २६ | ७७६९ | डब्ल्यू ४/९२४ | | | *८९८ | ... | | |
| २७ | ७७६८ | डब्ल्यू ९/९२४ | | | *६९२ | ... | | |
| २८ | ७७३० | डब्ल्यू ९३/९२९ | | | *४११ | ... | | |
| २९ | ७७३३, ७७३५ | डब्ल्यू ९१ आणि ९९/९२९ | | | *८०६ | ... | | |
| | प/७७०० | डब्ल्यू १, २/९२१ | | | *११० | ... | | |
| ३० | प/७७३९ | डब्ल्यू ९१ अ/९२९ | | | *७६१ | ... | | |
| ३१ | ७७३६ | डब्ल्यू ९२/९२९ | | | *७७७ | ... | | |

[ ]

| दिलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | रकम. | एकंदर रकम. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | मांटुंगा येथील जमिनी—पुढें चालू.<br>वार्ड फ-पुढें चालू. | | | | |
| ३२ | ७७३१ | डब्ल्यू ५४/९२५ | | *१४५ | ... | | |
| ३३ | प/७७२९ | प ८०/९२५ | | *८५३ | ... | | |
| ३४ | ७७०७ | प ८०/९२५ | | १६७ | ... | | |
| ३५ | प/७७०७ | प ८०/९२५ | | *२३८ | ... | | |
| ३६ | ७७२८ | डब्ल्यू ८० अ/९२५ | | १५३ | ... | | |
| ३७ | प/७७२५ | प ७९/९२५ | | ४७ | ... | | |
| ३८ | नाहीं. | ९२५ | | *५६० | ... | | |
| ३९ | ७४३० | डब्ल्यू ४/८६२ | | *२२ | ... | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४० | ७४२९ | डब्ल्यू ५ / ८६२ | नवा दादर–माटुंगा रोड ... ... | *२८५ | ... | १२,२७९ | ... |
| ४१ | ७४१७, ७४२२ | डब्ल्यू १व२ अ / ८६३ | | ५७५ | ... | | |
| ४२ | ७३९९ | डब्ल्यू ३ / ८७१ | | ६८३ | ... | | |
| ४३ | ७४०५ | डब्ल्यू १ / ८६९ | | *३८४ | ... | | |
| ४४ | ७४०६ | डब्ल्यू २ / ८६९ | | *२९९ | ... | | |
| ४५ | ७४१२ | डब्ल्यू १ / ८६६ | | *२,७९८ | ... | | |
| ४६ | ७४०४ | डब्ल्यू १ / ८७० | | *२६५ | ... | | |
| ४७ | ७४०२ | डब्ल्यू ३ / ८७० | | *२६६ | ... | | |
| ४८ | ७४०७ | डब्ल्यू ५ / ८७० | | *५९१ | ... | | |
| ४९ | ७४०३ | डब्ल्यू २ / ८७० | | *५३० | ... | | |
| ५० | ७४०८ | डब्ल्यू ४ / ८७० | | ६५१ | ... | | |
| ५१ | प / ७१३१ | प १ / ८७२ | | *६,७६६ | ... | | |
| ५२ | ७०३० | ८७२ | | *३९५ | ... | | |

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ आणि वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. रकम. | किंमत. एकंदर रकम. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | माटुंगा येथील जमिनी—पुढें चालू.<br>वार्ड फ—पुढें चालू. | | | | |
| ९३ | ७०३१, ७०३२<br>७०३७ | प१ व २ डब्ल्यू / ८७२<br>डब्ल्यू ९ / ८७७ | | *६,३४२ | ... | २२,९०४ | ... |
| ९४ | ७३८९<br>७३९०<br>७३९१ | डब्ल्यू १ अ / ८७४<br>डब्ल्यू १ / ८७३<br>डब्ल्यू २ / ८७३ | | *३,१३९ | ... | | |
| ९५ | ... | डब्ल्यू ३ / ८७३ | | ८६ | ... | | |
| ९६ | ७०४९ | डब्ल्यू १ / ८७७ | | ९९ | ... | | |
| ९७ | ७०४२ | डब्ल्यू ४ / ८७७ | | *९३ | ... | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५८ | ७०४४ | डब्ल्यू २/८७७ | | *१,०९८ | ... | | |
| ५९ | ७०४३ | डब्ल्यू ३/८७७ | | *१,७८८ | ... | १९,३९६ | ... |
| ६० | ७०४९ | डब्ल्यू १/९०६ | | *४,११९ | ... | | |
| ६१ | ७०५० | डब्ल्यू २/९०६ | | | | | |
| ६२ | ७०५१, ७०५६ | डब्ल्यू १ व २/९०५ | नवा दादर–माटुंगा रोड. | *२,०८४ | ... | | |
| ६३ | ७०५४ | डब्ल्यू ७/९०५ | | ३९७ | ... | | |
| ६४ | ७०५५, ७०६२ | डब्ल्यू ३, ४, व ५/९०५ | | *२,४९१ | ... | | |
| ६५ | प/६८३५ | प ४/११०९ | | *२१,५४२ | ... | | |
| ६६ | ७१३० | डब्ल्यू ४/११११ | | *३७१ | ... | ५४,३३४ | ... |
| ६७ | ७१३१ | डब्ल्यू ५/११११ | | ४७६ | .... | | |
| ६८ | प/७१२१,७१२२ | प १, डब्ल्यू २/१११४ | | २,१६२ | ... | | |
| ६९ | ७२८९ | डब्ल्यू १/११४३ | | *५०३ | ... | | |

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | रकम. | एकंदर रकम. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | माटुंगा येथील जमिनी—पुढें चालू.<br>वार्ड फ—पुढें चालू. | | | | |
| ७० | ७१६२ | डब्ल्यू १ / ११७३ | | *१०९ | ... | | |
| ७१ | ७१६१ | डब्ल्यू २ / ११७३ | | १०८ | ... | | |
| ७२ | ७१६३ | डब्ल्यू / ११७२ | | *२,१८९ | ... | ५४,३३४ | ... |
| ७३ | ६८२४ | १२३८ | | *१८३ | ... | | |
| ७४ | प / ६८२३ | प १ / १२३८, डब्ल्यू २ / १२३७ | | *६,१६१ | ... | | |
| ७५ | ६८२५ | डब्ल्यू १ / १२३९ | | ९६१ | ... | | |
| ७६ | ६७८३ | डब्ल्यू ७ / १२४२ | | ४१९ | ... | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७७ | ६७८९ | डब्ल्यू २ / १२४२ | नवा दादर-माटुंगा रोड. | *३,४५३ | ... | १३,४२३ | ... |
| | ६८१८,६८१९ | डब्ल्यू ३, डब्ल्यू ४ / १२३६ | | | | | |
| ७८ | प / ६७९१ | प १ / १२३५ | | *८,८७७ | ... | | |
| ७९ | ६७९४ ६७९७ | डब्ल्यू २, डब्ल्यू ५ / १२३३ | | *८४७ | ... | | |
| ८० | ६७९९ | डब्ल्यू ७ / १२३३ | | *१,११८ | ... | | |
| ८१ | प / ६४४९, ६४५० | प २ / ११९५ | | *१,०३५ | ... | ६,१६४ | ... |
| ८२ | ६६३५ | ७ / १२०६ | | *७६२ | ... | | |
| ८३ | ६६३६ ते ६६३९ | डब्ल्यू २,३,४,५ / १२०६ | | *३९१ | ... | | |
| ८४ | प / ६८१४ | प २ / १२३२ | | *२,९४८ | ... | ५,१५९ | ... |
| | ६८१३ | डब्ल्यू ३ / १२३२ | | | | | |
| | ६६२४ | डब्ल्यू १ / १२०९ | | | | | |
| | प / ६६२३ | प २ / १२० | | | | | |

परिशिष्ट ड—(पुढें चालू).

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ आणि वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | रकम. | एकंदर रकम. |
| १. | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | माटुंगा येथील जमिनी—पुढें चालू. वार्ड फ—पुढें चालू. | | | | |
| | प/६६३४ | प ७ अ/१२०६ | | | | | |
| | ६६३३ | ८/१२०६ | | | | | |
| | ६४९२ | १/११९९ | | | | | |
| ८५ | ६६४०,६६३२ | डब्ल्यु १–९/१२०६ | | *१,१९६ | ... | १,४४९ | ... |
| ८६ | प/६४९४ | प १/११९४ | | *१,०६६ | ... | २,६६९ | ... |
| ८७ | प/७९७ (२) ८२९ (२) ८३० व ७९८ | प १/२०८९ | | *२,८२३ | ... | २४,३४४ | ... |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८८ | ६९९१ | १० / १२१३ | | *३,२६३ | ... | | |
| ८९ | ७६९ | प १ / २०८० | | *१२,१७९ | ... | | |
| | ७६६ | डब्ल्यू २ / २०८० | | | ... | | |
| ९० | ७६६ | प ३ / २०८० | | ... | ... | २३,२३३ | ... |
| ९१ | ७६८ | प १ / २०२४ | | *४,९२० | ... | | |
| ९२ | प / ७७९ (१) | प १ / २०२६ | नवा दादर–माटुंगा रोड. | *१,१२३ | ... | १,१२३ | ... |
| ९३ | प / ७७९(२) | प १ अ / २०२६ | | | | | |
| | ७४३ (१) | प १ / २०३१ | | ८,३७६ | ... | ४,१८८ | ... |
| | ७४३ (३ अ) | | | | | | |
| | ७४४ | अ / २०३० | | | | | |
| ९४ | | | | | | | |
| ९५ | | | | *१,३६७ | .... | | |
| ९६ | प / ७४२ | प १ / २०३९ | | | | | |
| ९७ | | | | *९४८ | ... | १६,०९४ | ... |
| ९८ | | | | *८१३ | ... | | |

परिशिष्ट ड.—(पुढें चालू.)

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ आणि वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. रकम. | किंमत. एकंदर रकम. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | माटुंगा येथील जमिनी—पुढें चालू. वार्ड फ-पुढें चालू. | | ... | | |
| ९९ | प/७४२ | प २/२०३५ | | *१,२०४ | .... | ५,४१८ | ... |
| १०० | प/६६७ | प १/२०३६ | | *७१७ | ... | २,१९१ | ... |
| १०१ | ६८०० | १२/१२३२ | | ६०६ | ... | १,१४२ | ... |
| १०२ | ६८०२ | डब्ल्यू १०/१२३२ | | ५३६ | ... | | |
| १०३ | ७१०९ | डब्ल्यू ६/१११९ | | ६७९ | ... | ६१० | ... |
| १०४ | ७११२ | डब्ल्यू २/१११७ | | ३३८ | ... | | |
| १०५ | ७७८ | २/२०२७ | | *५०० | ... | ५०० | ... |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०६ | ७७७ | १/२०२७ | | *६१० | ... | ६१० | ... |
| १०७ | ७७६,७७९ | ३-४/२०२७ | | *२,११४ | ... | २,११४ | ... |
| १०८ | ७६९ | २/२०२८ | | *७६७ | ... | ७६७ | ... |
| १०९ | ७७० | १/२०२८ | | *३,३२५ | ... | ३,३२५ | ... |
| ११० | ७४०१,७४००<br>७४२३ ते ७४२८<br>७४२२ | ५,१-२/८७१<br>४,५,६,७,८,९/८६३<br>२ अ/८६३ | नवा दादर-माटुंगा रोड ... | *५,७३७ | ... | ५,७३७ | ... |
| १११ | ७३२७ | २/११३० | | १,३३१ | ... | ७९९ | ... |
| ११२ | ७२४९<br>७२४१,७२४३<br>७२५१<br>७१३७-३८<br>७२८८(१-२),<br>७२८७,११६४ | ५/११५१<br>६/११५२, ४/११५२<br>३/११५१<br>४-५/११७४<br>२-३/११४३ | | *८,९५० | ... | ६,७१३ | ... |

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | रक्कम. | एकंदर रक्कम. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | माटुंगा येथील जमिनी—पुढें चालू. | | | | |
| | | | वार्ड फ—पुढें चालू. | | | | |
| ११३ | ७२८८(१) ७१६५,७१६७ | २/११४३, २-४/११७१ | | *३,६२७ | ... | २,७२० | ... |
| ११४ | ७१११,७११३ | १-३/१११७ | | ३,७२३ | ... | २,२३४ | ... |
| | ७११८ | २/१११६ | | | | | |
| ११५ | ७२३६,६७६७ | २/११५३, १/१२४३ | | ६,७१२ | ... | ५,०३४ | ... |
| | ६६८४,६६८३ | ३/१२५४, २/१२५४ | | | | | |
| | ६७४१,६७८४ | ५/१२४७, ६/१२४२ | | | | | |
| | ६६७८,६६७२ | ४/१२५५, ६/१२४३ | | | | | |
| | ७३१९ | २/११३२ | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११६ | ७२४४, ७२३९; ६७९५–९६, ६७९८; ६८२०, ६७४३; ६६७५–७६, ६७७८, ६७८२ | $\frac{३}{११५२}$, $\frac{५}{११५३}$; $\frac{३, ४, ६}{१२३३}$; $\frac{४}{१२३७}$, $\frac{३}{१२४७}$; $\frac{६–७}{१२५५}$ आणि $\frac{१–५}{१२४१}$ | | *९,४१९ | ... | ४,०६० | ... |
| ११७ | ७३१८ | $\frac{१}{११३२}$ | | ३,८०४ | .... | २,२८२ | ... |
| ११८ | ७४०९ | ८६८ | नवा दादर–माटुंगा रोड. | *२,१८७ | ... | २,१८७ | ... |
| ११९ | ७११९, ७११६, ७११५ | $\frac{१–४}{१११६}$, $\frac{४}{१११७}$ | | २,१९७ | ... | १,०९८ | ... |
| १२० | ६८१६ | $\frac{१}{१२३६}$ | | *२,९८३ | ... | १,६४१ | ... |
| १२१ | ७३२५, ७३२३ | $\frac{४}{११३०}$, $\frac{१}{११३१}$ | | ३,४३६ | ... | २,०६२ | ... |
| १२२ | ७१०७ | $\frac{२}{१११९}$ | | १,०३७ | ... | ७७७ | ... |
| १२३ | ६८०३ (१) | $\frac{७ अ}{१२३२}$ चा पश्चिमेकडील भाग. | | ३०९ | ... | २३२ | .... |
| १२४ | ६८०१ | $\frac{११}{१२३२}$ | | ५५९ | ... | ४१९ | ... |

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | रकम. | एकंदर रकम. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | माटुंगा येथील जमिनी—पुढें चालू. | | | | |
| | | | वार्ड फ—पुढें चालू. | | | | |
| १२५ | ६८२१, ६५७९ ६७९२ | ३/१२३७, १/१२३३ आणि १/१२३४ | | *२,२४० | ... | १,६८० | ... |
| १२६ | ७१२५,७१२६ | १–२/१११२ आणि १-२/१११० चा पश्चिमेकडील भाग. | | *३,७३२ | ... | २,७९९ | ... |
| १२७ | ७८०४ | १/८०८ | | *५२९ | ... | ३९६ | ... |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२८ | ७२४२,७२९४ ७१७२,६७८३ ७२६९ | ९/११९२, ९/११९० १/११६९, ७/१२४२ १/११४८ | नवा दादर–माटुंगा रोड. | ६,९८२ | ... | ९,९३४ | ... |
| १२९ | ७१६६ (१) ७१२७ (२) ७१६० (२) | ३/११७१ ११११ चा पश्चिमेकडील भाग व ३/११७३ चा उत्तरेकडील भाग. | | *९,८१८ | ... | ६,८७३ | ... |
| १३० | ७११९,७१०८ ७१०६,७१०४ | ९/१११६, १/१११९ ९/१११९, ३/१११९ | | ३,९८४ | ... | २,९८८ | ... |
| १३१ | ७१७९ (१) | ३/११६७ | | *३,०२३ | ... | २,२६७ | ... |
| १३२ | ७३२६,७३२४ | ३/११३०, २/११३१ | | ३,५९३ | ... | २,६९४ | ... |
| १३३ | ६६४२ (१) ६६४१ | १ अ/१२०४ चा उत्तरेकडील सर्व भाग १:/१२०९ पर्यंत. १ अ/१२०४ | | *३,७१० | ... | २,७८३ | ... |

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. रकम. | किंमत. एकंदर रकम. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | माटुंगा येथील जमिनी—पुढें चालू.<br>वार्ड फ–पुढें चालू. | | | | |
| १३४ | ६७९३ | २/१२३४ | | *३२३ | ... | २४२ | ... |
| १३५ | ७७७१ | ३/९२४ | | ६६० | ... | ६६० | ... |
| १३६ | ७८०१,७८०२ | २–३/९२८ | | *८४५ | ... | ६३४ | ... |
| १३७ | ७०९३,७०९५ | ५-६/९०५ | | *२,५६६ | ... | २,५६६ | ... |
| १३८ | ६८१७ | २/१२३६ | | *१,८५५ | ... | १,३९१ | ... |
| | ६६७९ (१),<br>६६४१ | ३/१२५५, १/१२०५ | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३९ | ६६९१,६६९२ | $\frac{२-३}{११९९}$ यांच्या पूर्ववाजूस, तसेंच त्याच्या वाजूस वगैरे. | नवा दादर—माटुंगा रोड. | ... | *३,७३९ | ... | | |
| | ६६४२(१) | १२०३ | | | | | | |
| १४० | ७०१९ | $\frac{७}{८७७}$ | | | *५७६ | ... | ४३२ | ... |
| १४१ | ७०४०,७०४१, ७०३८ | $\frac{५,६}{८७७}$, व $\frac{८}{८७७}$ | | | ८८३ | ... | ६६२ | ... |
| १४२ | ७१८२ (२) | ११६६ | | | *४४८ | ... | | |
| १४३ | ७१७९ (१) ७१८१ | $\frac{३}{११६७}$ | | | *१,३६१ | ... | | |
| | ७१९७ | ११६३ | | | ५ | ... | १,५५९ | ... |
| १४४ | ७१९४ते९६ | $\frac{१,२,३}{११६४}$ | | | | | | |
| १४५ | ७१७३–७८ | $\frac{१,२,३,४,५,६}{११६८}$ | | | *२६५ | ... | | |
| १४६ | ७८२८ | $\frac{५}{८१०}$ | | | १,११३ | ... | ३८९ | ... |
| १४७ | ७८४७,७८४९ | $\frac{११}{८१३}$, $\frac{८}{८११}$ आणि दुसरे. | | | ८९५ | ... | ३१३ | ... |
| १४८ | ७८२६–२७ | $\frac{३-४}{८१०}$ | | | २,१३५ | ... | ७४७ | ... |
| १४९ | ७९२४ | $\frac{१०}{८११}$ | | | ४५१ | ... | १५८ | ... |

## परिशिष्ट ड.--(समाप्त).

| ठेविलेल्या प्लानांत दाखविलेल्या नंबराशीं जुळणारा प्लाटचा अनुक्रम नंबर. | वार्ड नंबर. | सर्व्हे नंबर. | प्लाटचें स्थळ व वर्णन. | क्षेत्रफळ. | एकंदर क्षेत्रफळ. | किंमत. रकम. | किंमत. एकंदर रकम. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | चौरस वार. | चौरस वार. | रु. | रु. |
| | | | माटुंगा येथील जमिनी—समाप्त. | | | | |
| | | | वाड फ—समाप्त. | | | | |
| १९० | ७८४ | ६/८१२ | | ९६२ | ... | १९७ | ... |
| १९१ | ७३९८, ७३२९; ७३३०, ७३३१; ७७३२ | १/११२७, १/११२९,; २/११२९, ३/११२९; ४/११२९ | नवा दादर—माटुंगा रोड. ... | ६,८२९ | ... | ९,१२२ | ... |
| फ | ... | ... | दादर रोड ... ... ... | ८,१८९ | ... | ७,८७६ | ... |
| ग | ... | ... | माटुंगा ... ... ... ... | १३,१८९ | ... | ९,७७० | ... |
| ह | ... | ... | लेडी जमसेटजी रोड ... .. | ७,३८७ | ... | १४,०६० | ... |
| | | | एकंदर, माटुंगा येथील जमिनी... | ... | २,९८,३७६ | ... | ३,४९,३४८ |
| | | | कुल एकंदर... | ... | ७,४८,०१८ | ... | १८,४०,९९९ |

* या परिशिष्टांत दाखविलेल्या रकमांतून, ठेविलेल्या प्लानांत दाखविल्याप्रमाणें रस्त्यांकरितां ज्यांच्या कांहीं भागांचा विनियोग केलेला आहे अशा फुली केलेल्या प्लाटांबद्दल, कांहीं रकम वजा करण्यांत येईल.

## परिशिष्ट इ.

(कलम ६१ पहा.)

**कोणत्या हद्दींच्या आंत समुद्राचा तळ नवसाध्य करण्याचा हक्क बोर्डाकडे जातो तें दाखविणारें.**

कुलाबा.—बोडहौस पुलाच्या दक्षिण चढावाच्या पायथ्यासमोरील बिंदूपासून कुलाब्याच्या पश्चिम बाजूनें दक्षिणेकडे कुलाबा पॉइन्टच्या अगदी शेवटापर्यंत जाणारा भरतीच्या सीमेखालील अग्रकिनारा.

वाळकेश्वर व महालक्ष्मी.—वरळी फोर्टपासून मलबार पॉइन्टपर्यंत जाणारा मुंबई टापूचा भरतीच्या सीमेखालील पश्चिम अग्रकिनारा.

---

## परिशिष्ट फ.

(कलम ७४ पहा.)

**सन १८९७ च्या सप्टेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेच्या व कलम १० अन्वयें जी तारीख जाहीर केली जाईल त्या तारखेच्या दर्म्यान सरकारानें पट्ट्यानें दिलेल्या क परिशिष्टांतील जमिनी दाखविणारें.**

| स्थळ. | प्लाटचें वर्णन. | क्षेत्रफळ. | पट्ट्याच्या अटी. |
|---|---|---|---|
| हार्नबी रोड प्लाट. | चतु:सीमा: उत्तरेस, जॉन कॉनान हाय स्कूल; दक्षिणेस व पूर्वेस कॉनान रोड; आणि पश्चिमेस एस्प्लेनेड रोड. | चौरस वार.<br>३२६८.३३ | दर चौरस वारास दर साल एक आणा भुइभाडें यादरानें नव्याण्णव वर्षे; तो पुढें आणखी नव्याण्णव वर्षांच्या मुदतीपर्यंत नवीन करितां येईल. |
| व १० व्या कलमा | अन्वयें जाहीर केलेल्या | तारखेपूर्वी पट्ट्यानें देण्यांत येतील | त्या इतर जमिनी. |

आलीजाह नेक नामदार गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमावरून,

सी. जी. एच्. फासेट,

मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदेकानू करणाऱ्या मंडळीचे सेक्रेटरी.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख २९ माहे आगस्ट, सन १८९८.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

## लवादीसंबंधी कायदा सुधारण्याबाबत आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी न्यायाच्या कोर्टाकडे न जातां कबुलायतीवरून लवादांकडे सोंपण्या- संबंधी कायदा सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरवि- ण्यांत येत आहे :—

१. (१) या आक्टास सन १८९९ चा हिंदुस्थानचा लवादीसंबंधी आक्ट असें ह्मणावें.

लहान सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

२. हा आक्ट, ज्या बाबतींमध्यें, लवादांकडे सोंपलेली विषयाची बाबत दाव्याचा विषय असेल तर, दावा इलाका शहरांत करतां येईल, त्याच बाबतींमध्यें मात्र लागू होईल:

लागू होणें.

परंतु असें ठरविलें आहे कीं स्थानिक सरकार, स्थानिक सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, हा आक्ट इतर कोणत्याहि प्रदेशास, तो प्रदेश इलाका शहर असल्याप्रमाणें, लागू होईल असें जाहिर करण्यास मुखत्यार आहे.

३. दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा याचीं ५२३ पासून ५२६ पर्यंत कलमें हीं, यावरून इलाका शहरांच्या संबंधानें रद्द केलीं आहेत, आणि ज्या कोण- त्याहि प्रदेशास हा आक्ट, सदरील शेवटल्या कलमाअन्वयें जाहिरनामा प्रसिद्ध करून, यापुढें लागू करण्यांत येईल त्या प्रदेशाच्या संबंधानें त्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून रद्द करण्यांत येतील.

रद्द करण्याबाबत.

मात्र असें ठरविलें आहे कीं या आक्टांतील कोणत्याहि ठरावावरून, या आक्टाच्या सुरवातीच्या वेळीं इलाका शहरांत किंवा सदरीं सांगितल्याप्रमाणें तो लागू केल्याच्या तारखेरोजीं कोणत्याहि प्रदेशांत चालू असलेल्या कोणत्याहि लवादीस बाध येणार नाहीं, परंतु या आक्टाचे ठराव, पूर्वी केलेल्या कोणत्याहि कबुलायतीअन्वयें, प्रसंगाप्रमाणें या आक्टाच्या सुरुवातीनंतर किंवा हा आक्ट लागू केल्यानंतर, सुरू केलेल्या प्रत्येक लवादीस लागू होतील.

४. या आक्टांत, विषयावरून किंवा संदर्भावरून बाध येत नसेल तर,—

व्याख्या.

(अ) "कोर्ट" या शब्दाचा अर्थ इलाका शहरांत हैं कोर्ट आणि, इतर ठिकाणीं, जिल्हा जज्जाचें कोर्ट असा आहे; आणि

(ब) "सोंपण्याबाबतचा करार" या शब्दांचा अर्थ, हल्लींच्या किंवा पुढील मत- भेदाच्या बाबती लवादांकडे सोंपण्यासाठीं केलेली लेखी कबुलायत असा आहे; त्या कबुलायतींत मग लवादाचें नांव लिहिलेलें असो अगर नसो.

५. सोंपण्याबाबतच्या करारांत निराळा इरादा दर्शविलेला नसेल तर तो करार कोर्टाच्या परवानगीशिवाय इतर रीतीनें रद्द करतां येणार नाहीं.

सोंपण्याबाबतचा करार कोर्टा- च्या परवानगीशिवाय इतर री- तीनें रद्द करतां येत नाहीं.

६. सोंपण्याबाबतच्या करारांत निराळा इरादा दर्शविलेला नसेल तर त्या करारांत, पहिल्या परिशिष्टांत नमूद केलेले ठराव त्या कराराअन्वयें लवादांकडे सोंपलेल्या चौकशीच्या कामास लागू असतील तेथवर, त्या ठरावांचा समावेश होतो असें समजावें.

सोंपण्याबाबतच्या करारांमध्यें गर्भित रीतीनें येणारे ठराव.

तिसऱ्या मनुष्यानें नेमलेल्या लवादाकडे चौकशीचें काम सोंपणें.

७. सोंपण्याबाबतच्या करारांतील पक्षकार अशी कबुलायत करण्यास मुखत्यार आहेत कीं त्या करारांत लिहिलेल्या मनुष्यानें नेमावयाच्या लवादाकडे किंवा लवादांकडे चौकशीचें काम पाठवावें.

उदाहरण.

सोंपण्याबाबतच्या करारांतील पक्षकार अशी कबुलायत करण्यास मुखत्यार आहेत कीं त्या कराराच्या विषयाच्या संबंधानें त्यांच्यामध्यें जो कोणताहि वाद उपस्थित होईल तो कलकत्याच्या चेंबर ऑफ् कॉमर्सनें नेमलेल्या लवादाकडे सोंपण्यांत यावी.

कित्येक बाबतींत लवाद, सरपंच किंवा तिसरा लवाद नेमण्याचा कोर्टाचा अधिकार.

८. (१) खालीं लिहिलेल्या बाबतींपैकीं कोणत्याहि बाबतींत—

(अ) चौकशीचें काम फक्त एकाच लवादाकडे सोंपवावें असें सोंपण्याबाबतच्या करारांत ठरविलें असून सगळे पक्षकार, मतभेद पडल्यानंतर, लवादाच्या नेमणुकीच्या संबंधानें एकमत होत नसतील तेव्हां;

(ब) नेमलेला लवाद काम करण्यास इनकार करील किंवा काम करण्यास असमर्थ असेल अगर मरण पावेल, आणि त्याची रिकामी झालेली जागा न भरण्याचा इरादा होता असें सोंपण्याबाबतच्या करारावरून दिसत नसून ती रिकामी झालेली जागा पक्षकार न भरतील तर;

(क) पक्षकार किंवा दोन लवाद यांना सरपंच किंवा तिसरा लवाद नेमण्याची मोकळीक असून ते त्याची नेमणूक न करतील तेव्हां;

(ड) नेमलेला सरपंच किंवा तिसरा लवाद काम करण्यास इनकार करील किंवा काम करण्यास असमर्थ असेल अगर मरण पावेल, आणि त्याची रिकामी झालेली जागा न भरण्याचा इरादा होता असें सोंपण्याबाबतच्या करारावरून दिसत नसून ती रिकामी झालेली जागा पक्षकार किंवा लवाद न भरतील तेव्हां;

कोणताहि पक्षकार, प्रसंगाप्रमाणें, इतर पक्षकारांना किंवा लवादांना, एक लवाद, सरपंच किंवा तिसरा लवाद नेमण्याबाबत लेखी नोटीस देण्यास मुखत्यार आहे.

(२) सदरहू नोटीस दिल्यानंतर निवळ सात दिवसांच्या आंत सदरहू नेमणूक करण्यांत न आली तर कोर्टास, नोटीस देणाऱ्या पक्षकाराची अर्जी आली असतां, एक लवाद, सरपंच किंवा तिसरा लवाद नेमण्याचा अख्त्यार आहे; आणि याप्रमाणें नेमलेला लवाद, सरपंच किंवा तिसरा लवाद सगळ्या पक्षकारांच्या संमतीनें नेमण्यांत आला असल्याप्रमाणेंच त्याला, त्या सोंपलेल्या चौकशीच्या कामाच्या संबंधानें काम करण्याचा व निवाडा करण्याचा अधिकार आहे.

कित्येक बाबतींत रिकामी झालेली जागा भरण्याचा पक्षकाराचा अधिकार.

९. चौकशीचें काम दोन लवादांकडे सोंपवावें व दरेक पक्षकारानें त्यांपैकीं एकेक नेमावा असें सोंपण्याबाबतच्या करारांत ठरविलें असेल तेव्हां, त्या करारांत निराळा इरादा दर्शविलेला नसेल तर —

(१) नेमलेल्या दोन लवादांपैकीं कोणताहि एका लवादानें काम करण्यास इनकार केल्यास किंवा तो काम करण्यास असमर्थ असल्यास अगर मरण पावल्यास, त्याला ज्या पक्षकारानें नेमला होता तो पक्षकार त्याच्या जागीं नवीन लवाद नेमण्यास मुखत्यार आहे;

(२) सदरहूप्रमाणें चौकशीचें काम सोंपल्यावर, एका पक्षकारानें आपला लवाद नेमून दुसऱ्या पक्षकारास त्याचा लवाद नेमण्याबद्दल लेखी नोटीस दिल्यानंतर तो कसूर

करणारा पक्षकार निवळ सात दिवसपर्यंत आपला अवल लवाद किंवा वर सांगितल्या-प्रमाणें बदली लवाद न नेमील तर, ज्या पक्षकारानें लवाद नेमला असेल तो पक्षकार त्या लवादाला त्या चौकशीच्या कामांत एकट्याच लवादाप्रमाणें काम करण्यासाठीं नेमण्यास मुखत्यार आहे, आणि तो लवाद (दोन्ही पक्षकारांच्या) संमतीनें नेमला असल्याप्रमाणें त्याच्या निवाड्यावरून दोन्ही पक्षकार बद्ध होतील;

मात्र असें ठरविलें आहे कीं या कलमास अनुसरून केलेली कोणतीहि नेमणूक रद्द करण्यास कोर्ट मुखत्यार आहे.

१०. (१) सोंपण्याबाबतच्या कराराअन्वयें काम करणाऱ्या लवादांस किंवा सर-पंचास, त्या करारांत निराळा इरादा दर्शविलेला नसेल तर,— लवादाचे अधिकार.

(अ) साक्षीदारांना समन्स काढून तपासण्याच्या आणि दस्तऐवज हजर करण्यासाठीं प्रोसेस करण्याच्या संबंधानें दिवाणी कोर्टाचे सगळे अधिकार आहेत;

(ब) कायद्याचा जो कोणताहि प्रश्न गर्भित असेल त्यावर कोर्टाचा अभिप्राय घेण्यासाठीं स्पेशल केस लिहून पाठविण्याचा अधिकार आहे; आणि

(क) सोंपण्याबाबतचा करार किंवा निवाडा लिहिण्यांत कोणत्याहि आक-स्मिक हस्तदोषामुळें किंवा वर्जनामुळें घडलेली कोणतीहि चूक अगर दोष दुरुस्त करण्याचा अधिकार आहे.

(२) या आक्टाअन्वयें लवादापुढें किंवा लवादांपुढें चाललेलें दरेक काम, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या अर्थाप्रमाणें न्यायाचें काम आहे असें समजलें पाहिजे.

११. (१) लवादांनीं किंवा सरपंचानें निवाडा केला म्हणजे त्यांनीं त्यावर सही केली पाहिजे, आणि त्यांतील कोणताहि पक्षकार किंवा त्याच्या वतीनें दावा सांगणारा कोणताहि मनुष्य यानें दरखास्त केली असतां तो निवाडा किंवा त्याची सहीची नक्कल कोर्टांत दाखल करविली पाहिजे; आणि याप्रमाणें दाखल केल्याची नोटीस, सोंपण्या-बाबतच्या करारांतील पक्षकारांस दिली पाहिजे. निवाड्यावर सही करून तो दाखल करणें.

(२) लवादांनीं किंवा सरपंचानें कलम १०, पोट-कलम (१), रकम (ब) अन्वयें स्पेशल केस लिहून पाठविली असेल तेव्हां त्यावर कोर्टानें आपला अभिप्राय लिहून दिला पाहिजे; आणि तो अभिप्राय निवाड्यांत ज्यास्त दाखल केला पाहिजे व तो त्या निवा-ड्याचा भाग आहे असें समजलें पाहिजे.

१२. निवाडा करण्याची मुदत पुरी झालेली असली अगर नसली तथापि, निवाडा करण्याची मुदत वेळोवेळीं कोर्टाच्या हुकुमानें वाढविण्याचा अधिकार आहे. निवाडा करण्याची मुदत वाढविण्याचा कोर्टाचा अधिकार.

१३. (१) कोर्टास, वेळोवेळीं, निवाड्याचा फिरून विचार होण्यासाठीं तो निवाडा लवादांकडे किंवा सरपंचाकडे परत पाठविण्याचा अधिकार आहे. निवाडा परत पाठविण्याचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) अन्वयें निवाडा परत पाठविला असेल तेव्हां कोर्टानें इतर रीतीनें फर्माविलें नसेल तर लवादांनीं किंवा सरपंचानें, तो निवाडा परत पाठवि-ण्याच्या हुकुमाच्या तारखेनंतरच्या तीन महिन्यांच्या आंत नवीन निवाडा केला पाहिजे.

१४. (१) सोंपण्याबाबतच्या करारावरून केलेला निवाडा सदरील ठरावांअन्वयें कोर्टांत दाखल करण्यांत आला म्हणजे तो त्या कोर्टाच्या हुकुमनाम्याप्रमाणें अमलांत आण-ण्याचा अधिकार आहे: निवाडा दाखल करण्यांत आला म्हणजे तो हुकुमनाम्या-प्रमाणें अमलांत आणतां येतो.

मात्र इतकेंच कीं एकाद्या लवादानें किंवा सरपंचानें गैरवर्तणूक केली असेल अगर एकादी लवादी किंवा निवाडा गैरवाजवी रीतीनें मिळविण्यांत आला असेल तेव्हां तो निवाडा रद्द करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

(२) निवाडा कांहीं शर्तीवर किंवा वैकल्पिक रीतीनें करण्याचा अधिकार आहे.

उदाहरण.

एका हिऱ्याच्या आंगठीच्या मालकीसंबंधी वाद लवादांकडे सोंपला आहे. निवाड्यांत असा ठराव करण्याचा अधिकार आहे कीं ती आंगठी ज्या पक्षकाराच्या कबज्यांत आहे त्यानें दुसऱ्या पक्षकारास एक हजार रुपये द्यावे, परंतु जर ती आंगठी चौदा दिवसांत परत देण्यांत आली तर त्यानें सदहू रकमेच्या ऐवजीं पांच रुपये द्यावे.

लवादास किंवा सरपंचास दूर करण्याचा अधिकार.

१५. लवादानें किंवा सरपंचानें गैरवर्तणूक केली असेल तेव्हां त्याला दूर करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

खर्च.

१६. या आक्टाअन्वयें करावयाचा कोणताहि हुकुम, तो हुकुम करणाऱ्या अधिकाऱ्यास योग्य वाटतील तशा खर्चासंबंधी शर्तीवर किंवा इतर प्रकारें, करण्याचा अधिकार आहे.

नमुने.

१७. दुसऱ्या परिशिष्टांत नमूद केलेले नमुने किंवा त्यांसारखे नमुने, दरेक बाबतींतील हकीकतीप्रमाणें जे फेरफार करण्याची जरूर पडेल त्या फेरफारांनिशीं, त्यांत जीं जीं कारणें नमूद केलीं असतील त्या त्या कारणांसाठीं वापरण्याचा अधिकार आहे, आणि ते वापरण्यांत आले तर त्यांबदल तक्रार घेतां कामा नये.

कानू करण्याचा हे कोर्टाचा अधिकार.

१८. हैं कोर्ट खालील गोष्टींच्या संबंधानें या आक्टास अनुसरून कानू करण्यास मुखत्यार आहे—

(अ) निवाडे दाखल करण्याच्या संबंधानें आणि त्यांमुळें किंवा त्यांच्या अनुषंगानें चालणाऱ्या सर्व कामांच्या संबंधानें;

(ब) स्पेशल केसी दाखल करण्याच्या व ऐकून घेण्याच्या संबंधानें आणि त्यांमुळें किंवा त्यांच्या अनुषंगानें चालणाऱ्या सर्व कामांच्या संबंधानें; आणि

(क) साधारणपणें, या आक्टाअन्वयें कोर्टांत चालविलेल्या सर्व कामांच्या संबंधानें.

सन १८७७ च्या १ ल्या आक्टाच्या २१ व्या कलमाची सुधारणूक.

१९. सन १८७७ चा विशेष न्यायाचा आक्ट याच्या २१ व्या कलमांत "दिवाणी काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्यांत" या शब्दांनंतर "व सन १८९९ च्या हिंदुस्थानच्या लवादीसंबंधी आक्टांत" हे शब्द दाखल करावे, आणि "तक्रार" या शब्दाच्या ऐवजीं "हल्लींचे व यापुढें उपस्थित होणारे मतभेद" हे शब्द दाखल करावे.

मलीका माआझमांस लागू असणें.

२०. या आक्टाचे ठराव मलिका माआझमांस लागू आहेत असें समजावें.

---

## पहिलें परिशिष्ट.

(कलम ६ पहा.)

### सोंपण्याबाबतच्या करारांत गर्भित असणारे ठराव.

१. चौकशीचें काम सोंपण्याची दुसरी कोणतीहि रीति ठरविली नसेल तर, तें काम फक्त एकाच लवादांकडे सोंपलें पाहिजे.

२. चौकशीचें काम दोन लवादांकडे सोंपलें असेल तर, ज्या मुदतींत निवाडा करण्याचा त्या दोघां लवादांस अधिकार असेल त्या मुदतींत कोणत्याहि वेळीं सरपंच नेमण्यास ते मुखत्यार आहेत.

३. लवादांनीं आपला निवाडा, लवादीचें काम चालू केल्यानंतर किंवा सोंपण्याबाबतच्या करारांतील कोणत्याहि पक्षकारानें लेखी नोटीस देऊन काम करण्याविषयीं सांगितल्यानंतर तीन महिन्यांच्या आंत, अगर आपल्या सहीच्या कोणत्याहि लेखावरून निवाडा करण्याची मुदत वेळोवेळीं ज्या पुढल्या तारखेपर्यंत लवाद वाढवितील त्या तारखेरोजीं किंवा तत्पूर्वीं, लेखी केला पाहिजे.

४. लवादांनीं, आपली ठरलेली मुदत किंवा वाढविलेली मुदत निवाडा न करतां पुरी होऊं दिल्यास, किंवा आपण एकमत होऊं शकत नाहीं अशी लेखी नोटीस सोंपण्याबाबतच्या करारांतील कोणत्याहि पक्षकारास किंवा सरपंचास दिल्यास, सरपंच त्या लवादांच्या ऐवजीं लवादीचें काम ताबडतोब चालू करण्यास मुखत्यार आहे.

५. सरपंचानें आपला निवाडा, लवादांचा निवाडा करण्याची नेमलेली अवल मुदत किंवा वाढविलेली मुदत संपल्यानंतर एक महिन्याचे आंत, अगर आपल्या सहीच्या कोणत्याहि लेखावरून निवाडा करण्याची मुदत वेळोवेळीं ज्या पुढल्या दिवसापर्यंत सरपंच वाढवील त्या दिवशीं किंवा तत्पूर्वीं, केला पाहिजे.

६. लवादांकडे चौकशीचें काम सोंपणाऱ्या पक्षकारांनीं व त्यांच्या वतीनें दावा सांगणाऱ्या सर्व मनुष्यांनीं, त्या त्या काळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याच्या ठरावांस पात्र राहून, वादांतील बाबतींच्या संबंधानें, शपथेवर किंवा प्रतिज्ञेवर, लवादांपुढें किंवा सरपंचापुढें जबानी दिली पाहिजे, आणि त्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें पात्र राहून, अनुक्रमें त्यांच्या कबज्यांतील किंवा अधिकारांतील जीं कोणतींहि बुकें, खतें, कागद, हिशेब, लेख व दस्तऐवज मागण्यांत किंवा मागविण्यांत येतील तीं सर्व लवादांपुढें किंवा सरपंचापुढें हजर केलीं पाहिजेत, व लवादीचें काम चालू असेल त्या मुदतींत लवाद किंवा सरपंच ज्या दुसऱ्या गोष्टी करण्याविषयीं फर्मावील त्या सर्व गोष्टी केल्या पाहिजेत.

७. लवादीच्या साक्षीदारांना, लवादास किंवा सरपंचास योग्य वाटेल तर, शपथेवर किंवा प्रतिज्ञेवर तपासलें पाहिजे.

८. लवादांनीं किंवा सरपंचानें करावयाचा निवाडा अखेरचा असेल, आणि तो अनुक्रमें पक्षकारांना व त्यांच्या वतीनें दावा सांगणाऱ्या मनुष्यांना लागू असेल असें समजावें.

९. लवादीचा खर्च देवविणें तो लवादांच्या किंवा सरपंचाच्या मर्जीवर राहील, आणि लवाद किंवा सरपंच हा, तो खर्च किंवा त्याचा कोणताहि भाग कोणास, कोणी व कोणत्या रीतीनें द्यावा तें फर्मावण्यास मुखत्यार आहे, व याप्रमाणें द्यावयाच्या खर्चाची रकम किंवा तिचा कोणताहि भाग नक्की करण्यास किंवा ठरविण्यास मुखत्यार आहे आणि सालिसिटर व कूळ यांच्या दरम्यान द्यावयाचा खर्च देवविण्यास मुखत्यार आहे.

---

## दुसरें परिशिष्ट.

(कलम १७ पहा.)

### नमुना १.

### एकच लवादाकडे सोंपण्याबाबतचा करार.

**सन १८९९ च्या हिंदुस्थानच्या लवादीसंबंधी आक्टाच्या बाबतींत :—**

ज्या अर्थी अ. ब. राहणार ——————— व क. ड. राहणार ——————— यांच्या दरमियान मतभेद उपस्थित झाला असून तो हल्लीं चालू आहे;

त्या अर्थीं आह्मी, सदरहू अ. ब. व क. ड. हे, आमच्या दरमियानच्या मतभेदाच्या सर्व बाबती क्ष. य. याच्या निवाड्यासाठीं सोंपण्याचें या लेखावरून कबूल करतों.

(सही) अ. ब.

क. ड.

तारीख माहे सन १८९ .

## नमुना २.

### विवक्षित वाद एकाच पंचाकडे सोंपण्याबाबतचा करार.

**सन १८९९ च्या हिंदुस्थानच्या लवादीसंबंधी आक्टाच्या बाबतींत :—**

ज्या अर्थी अ. ब. राहणार———————व क. ड. राहणार———————यांच्या दरमियान ———————च्या संबंधानें मतभेद उपस्थित झाला असून तो हल्लीं चालू आहे;

त्या अर्थी आम्ही, सदरहू अ. ब. व क. ड. हे, मतभेदाच्या सदरहू बाबती क्ष. य. याच्या निवाड्यासाठीं सोंपण्याचें या लेखावरून कबूल करतों.

(सही) अ. ब.

तारीख माहे सन १८९ . क. ड.

---

## नमुना ३.

### पुढें उपस्थित होणारे मतभेद लवादांकडे सोंपण्याबाबतच्या कबुलायतीवरून एकाच लवादाची नेमणूक.

**सन १८९९ च्या हिंदुस्थानच्या लवादीसंबंधी आक्टाच्या बाबतींत :—**

ज्या अर्थी सन १८ च्या———————महिन्याच्या———————तारखेच्या, अ. ब. राहणार———————व क. ड. राहणार———————यांच्या दरमियान केलेल्या, लेखी कबुलायतींत असें ठरविलें आहे कीं त्या कबुलायतींतील पक्षकारांच्या दरमियान उपस्थित होणारा मतभेद त्या कबुलायतींत सांगितलेल्या लवादांकडे सोंपवावे;

आणि ज्या अर्थीं सदरहू पक्षकारांच्या दरमियान सदरहू ठरावाच्या अर्थाप्रमाणें मतभेद उपस्थित झाला असून तो हल्लीं चालू आहे;

त्या अर्थीं आम्ही, सदरहू पक्षकार अ. ब. व क. ड. हे, मतभेदाच्या सदरहू बाबती क्ष. य. याच्या निवाड्यासाठीं या लेखावरून सोंपवितों.

(सही) अ. ब.

तारीख माहे सन १८९ . क. ड.

---

## नमुना ४.

### लवादानें सोंपण्याबाबतच्या करारावर शेरा लिहून मुदत वाढविणें.

**सन १८९९ च्या हिंदुस्थानच्या लवादीसंबंधी आक्टाच्या, आणि अ. ब. राहणार———————व क. ड. राहणार———————यांच्या दरमियानच्या लवादीच्या, बाबतींत:—**

यांतील (किंवा वरील) सोंपण्याबाबतच्या करारावरून माझ्याकडे सोंपलेल्या मतभेदाच्या बाबतींच्या संबंधानें मी आपला निवाडा करण्याची मुदत या लेखावरून सन १८९ च्या महिन्याच्या तारखेपर्यंत वाढवितों.

(सही) क्ष. य.

तारीख माहे सन १८९ . लवाद.

---

## नमुना ५.

### स्पेशल केस.

**सन १८९९ च्या हिंदुस्थानच्या लवादीसंबंधी आक्टाच्या, आणि अ. ब. राहणार———————व क. ड. राहणार———————यांच्या दरमियानच्या लवादीच्या, बाबतींत:—**

खालील स्पेशल केस, सदरहू आक्टाचें कलम १०, पोट-कलम (१), रकम (ब) याअन्वयें *———————च्या अभिप्रायासाठीं लिहून पाठविली आहे:—

* येथें कोर्ट निर्दिष्ट करावें.

(येथें थोडक्यांत निरनिराळ्या पारिग्राफांत मुद्दे लिहावे आणि त्या पारिग्राफांस अनुक्रम नंबर द्यावे.)

सदरहू कोर्टाच्या अभिप्रायासाठीं कायद्याचे प्रश्न आहेत ते येणेंप्रमाणें:—

पहिला, ————————————————————

दुसरा, ————————————————————

(सही) क्ष. य.,

तारीख माहे सन १८९ . लवाद.

---

**नमुना ६.**

**निवाडा.**

**सन १८९९ च्या हिंदुस्थानच्या लवादीसंबंधी आक्टाच्या, आणि अ. ब. राहणार ———— व क. ड. राहणार ———— याच्या दरमियानच्या लवादीच्या, बाबतींत:—**

ज्याअर्थी सन १८९ च्या ———— महिन्याच्या ———— तारखेच्या, अ. ब. राहणार ———— व क. ड. राहणार ———— यांच्या दरमियान केलेल्या, लेखी कबुलायतीस अनुसरून सदरहू अ. ब. व क. ड. यांनीं आपणांमधील (किंवा जसें असेल तसें) मतभेदाच्या सर्व बाबती मी क्ष. य. याकडे सोंपल्या आहेत,

त्या अर्थीं मी, सदरहू क्ष. य. हा, माझ्याकडे सोंपलेल्या बाबतींचा योग्य रीतीनें विचार करून, या लेखावरून खालीं लिहिल्याप्रमाणें आपला निवाडा करतों:—

मी हुकुम करतों कीं—

(१) ————————————————————

(२) ————————————————————

(सही) क्ष. य.,

तारीख माहे सन १८९ . लवाद.

---

**हेतु व कारणें यांचें निरूपण.**

हा मसुदा सन १८८९ च्या इंग्लंदच्या लवादीसंबंधी आक्टाच्या धोरणावर तयार केला असून तो, रंगून, कराची व कानपूर येथील चेम्बर ऑफ् कॉमर्सकडून लिहून आलेल्या कित्येक सूचनांवरून तयार केला आहे. याप्रमाणें केलेल्या योजनेच्या संबंधानें अभिप्राय घेण्यांत आले असून तिला, बंगाल, मद्रास व मुंबई येथील चेम्बर ऑफ् कॉमर्स, बंगालची न्याशनल चेम्बर आफ् कॉमर्स आणि ब्रिटिश इंडियन असोसिएशन यांच्या सहित सर्वांकडून पुष्टी मिळाली आहे.

२. हल्लींचा लवादीसंबंधी कायदा पुरता नसल्यामुळें हा कायदा करणें भाग पडलें आहे. या विषयासंबंधी जे ठराव कराराविषयींच्या व विशेष न्यायाच्या आक्टांमध्यें हल्लीं आढळून येतात त्यांवरून इतकें होतें कीं ज्या कोणत्याहि मनुष्यानें, जो कोणताहि वाद त्याच्या व एकाद्या दुसऱ्या मनुष्याच्या दरमियान उपस्थित होईल तो लवादांकडे सोंपण्याचा करार केला असेल, तो मनुष्य त्याप्रमाणें करण्यास इन्कार करील तर, त्या करारावरून त्यानें जी बाबत सदरहूप्रमाणें लवादांकडे सोंपण्याची प्रथम कबुलायत केली त्या बाबतीच्या संबंधानें त्याला त्यानंतर दावा आणतां येत नाहीं. परंतु हे ठराव नकाररूपाचे असून व्यवहारांत निरुपयोगी आहेत, कारण, नियम म्हटला म्हणजे, इन्कार करणारा मनुष्य दुसऱ्या पक्षकाराच्या अटोक्यांत न येण्याच्या हेतूनें केवळ स्वस्थ बसून राहिला म्हणजे पुरे आहे. दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्यांत या बाबतींत पाहिजेत तसे ठराव कांहीं अंशीं आहेत हें खरें, परंतु मुद्याच्या कलमांत उणीवा आहेत, त्या अशा कीं—

(१) तीं कलमें, लवादांकडे सोंपण्याबाबतच्या कबुलायतीच्या वेळीं उपस्थित झाले असतील त्याच फक्त वादांस लागू असून, तदनंतर उपस्थित होणाऱ्या वादांस लागू नाहींत अशी समजूत आहे; आणि

(२) त्या कलमांत असें ठरविलें आहे कीं लवादांकडे सोंपण्याबाबतच्या कबुलायतींत विवक्षित लवादाचें नांव लिहिलें पाहिजे किंवा कोर्टानें लवाद नेमला पाहिजे.

३. यांपैकीं पहिली उणीव, मुंबईच्या हैकोर्टाच्या फुल बेंचानें जो नुक्ताच फाझलभाई मेहरली चीनॉय विरुद्ध धि बॉम्बे आण्ड् पर्शिया स्टीम नाव्हिगेशन कंपनी, लिमिटेड, या मुकदम्यांत ( इं. ला. रि. २० मुंबई २३२ ) ठराव करून, त्यांत सदरहू कायदा पुढें उपस्थित होणाऱ्या वादांसहि लागू होतो असा निर्णय केला त्या ठरावावरून कांहीं अंशीं दूर झाली आहे. परंतु सदरहू दुसरी उणीव कायम राहिली आहे व त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, उदाहरणार्थ "बंगालच्या चेम्बर ऑफ् कॉमर्सनें नेमावयाच्या मनुष्याच्या लवादीकडे" सोंपण्याबाबतच्या कबुलायतीच्या बाबतींत उघडपणें कांहींच ठराव नाहीं. शिवाय, मुंबईच्या जज्जांनीं केलेल्या ठरावास अनुसरून इतर हैकोर्टें चालतील याबद्दल संशयच आहे आणि मुंबईच्या हैकोर्टाच्या सदरहू ठरावावरूनच असें दिसून येतें कीं सदरहू कायद्याच्या ३७ व्या बाबींतील जे ठराव रद्द करण्याचें योजिलें आहे त्या ठरावांच्या संबंधानें ला रिपोर्टांमध्यें परस्परविरुद्ध असे पुष्कळ निर्णय आढळून येत असल्यामुळें ते ठराव सुधारणें जरूर आहे.

४. सदरहू मसुदा अशा प्रकारें तयार केला आहे कीं तो प्रथमतः इलाका शहरांस लागू पडेल आणि तो इतर ठिकाणीं लागू करणें इष्ट वाटल्यास तो त्याप्रमाणें लागू करतां येईल.

(सही) एम्. डी. चामर्स.

तारीख ३१ माहे आगस्ट, सन १८९८.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.